Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

भिषग्विलास पुस्तकमाला

आयुर्वेदीय औषधि-गुणधर्मशास्त्र

CHECKED
Initial

भाग दुसरा

(सिद्धौषधें-संयुक्तकल्प)

आवृत्ति तिसरी १९३६

वैद्यपंचानन गंगाधरशास्त्री गुणे,
अहमदनगर

किंमत १॥ रुपया =॥

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

❀ ओ३म् ❀

पुस्तक-संख्या .... ५५ग/३ (व

पंजिका-संख्या २०८६८

पुस्तक पर सर्व प्रकार की निशानियां लगाना वर्जित है। कोई महाशय १५ दिन से अधिक देर तक पुस्तक अपने पास नहीं रख सकते। अधिक देर तक रखने के लिये पुनः आज्ञा प्राप्त करनी चाहिये।

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

भिषग्विलास पुस्तकमाला

आयुर्वेदीय औषधि-गुणधर्मशास्त्र

भाग दुसरा

(सिद्धौषधें-संयुक्तकल्प)

न मात्रामात्रमप्यत्र किंचिदागमवर्जितम् ।

ग्रंथकर्ता

वैद्यपंचानन गंगाधरशास्त्री गुणे

प्रमुख आयुर्वेद महाविद्यालय-अहमदनगर,
संपादक-भिषग्विलास,
चिकित्सक--आयुर्वेदाश्रम फार्मसी लिमिटेड.

(सर्व हक्क ग्रंथकर्त्यांनीं आपल्या स्वाधीन ठेवले आहेत.)

प्रकाशक-वै. पं. गंगाधरशास्त्री गुणे, अहमदनगर.
मुद्रक-शं. रा. दाते, लोकसंग्रह छापखाना, ६२४ सदाशिव पुणें.

आवृत्ति तिसरी १९३६

किंमत १॥ रुपया

ऋते ज्ञानान्न मुक्तिः
पुस्तक सं० ५५ म ३(२१)
आगत सं० २०८८८ C
तिथि० २२.४.२००१
गुरुकुल ग्रन्थालय कांगड़ी.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

शास्त्रं ज्योतिः प्रकाशार्थं दर्शनं बुद्धिरात्मनः ।
ताभ्यां भिषक् सुयुक्ताभ्यां चिकित्सन्नापराध्यति ।
चिकित्सिते त्रयः पादाः यस्माद्वैद्यव्यपाश्रयाः ।
परं प्रयत्नमातिष्ठेद्भिषक् स्वगुण संपदि ।। च. सू. अ. ९
अतोऽभियुक्तः सततं सर्वमालोच्य सर्वथा ।
तथा युंजीत भेषज्यमारोग्याय यथा ध्रुवम् । अ. हृ. अ. १२
ज्ञानबुद्धिप्रदीपेन योनाऽविशति योगिवत् ।
आतुरस्यान्तरात्मानं न स रोगांश्चिकित्सति ।।
अष्टांगसंग्रह अ. २३

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

औषधि गुणधर्मशास्त्र

भाग दुसरा–संयुक्तकल्प

तिसऱ्या आवृत्तीची प्रस्तावना

परममंगल श्रीकृष्णचंद्राच्या कृपेनें दुसऱ्या भागाची ही नवीन आवृत्ति प्रकाशित करण्याचा सुप्रसंग येत आहे. शास्त्रीय पुस्तकांना हें असलें भाग्य लाभण्याचें आपल्या महाराष्ट्रांत तरी हें नवलच होय. दुसरा भाग अगदीं संपल्यास बरेच दिवस झाले. कांहीं कौटुंबिक आपत्ती, कांहीं अंशीं सारखी कार्यव्यापृतता व सर्वांत जास्त म्हणजे त्रिधातु–त्रिदोष–मीमांसा ग्रंथ–लेखन यांमुळें आतांपर्यंत आम्हांस याच्याकडे पहाण्यास वेळच झाला नाहीं. परंतु ह्या पुस्तकाला मागणी फार आणि म्हणून त्यांतले त्यांत वेळ काढून औ. गु. धर्मशास्त्राचा हा दुसरा भाग मुद्रित करून प्रकाशित आहोंत.

ह्या भागांत नवीन मजकूर थोडा थोडा जागजागीं घातला आहे. कांहीं ठिकाणचीं चुकीचीं मुद्रणें दुरुस्त केलीं आहेत. एकन्दरींत पूर्ण सुधारून हा भाग प्रसिद्ध करण्यांत येत आहे.

चि. रा. पु. वि. धामणकर–आयुर्वेदाश्रम फार्मसी लि. चे व्यवस्थापक व चि. डॉ. अ. वि. केतकर M. B.; B. S. आयुर्वेद महाविद्यालयांतील शारीरशास्त्राचे अध्यापक, यांनीं आपला वेळांत वेळ काढून, प्रुफें तपासण्याचें व इतर काम केलें नसतें, तर हा भाग आणखीही कांहीं दिवस धूळ खात पडला असता. त्यांनीं केलेल्या मनःपूर्वक सहाय्याबद्दल मी त्यांचा अत्यन्त ऋणी आहें.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

लोकसंग्रह छापखान्याचे श्री. शंकर रामचंद्र उर्फ मामासाहेब दाते यांनीं विशेष लक्ष देऊन ग्रंथ मुद्रणाचें काम केलें याबद्दल त्यांचाही मी अत्यन्त ऋणी आहें.

शेवटीं ज्या परममंगल दयाघनानें आमच्यासारख्या 'मूकांकडून' ही 'वाचाल' कृती घडवून आणली त्याचें शतशः प्रणामपूर्वक अभिवादन करून ही प्रस्तावना संपवितों.

आयुर्वेदाश्रम—
अहमदनगर
ता. २२–५–३६.

वैद्यपंचानन गंगाधरशास्त्री गुणे.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आयुर्वेदीय
औषधि गुणधर्मशास्त्र

भाग २ रा

कज्जली–दरद–कल्प (संयुक्त कल्प)

१. अगस्तिसूतराज

* पारा, गंधक १।१ भाग, हिंगूळ २ भाग, शुद्ध धोतऱ्याचें बीं २ भाग, शुद्ध अफू २ भाग, या सर्वांचा सात दिवसपर्यंत माक्याच्या रसांत (सर्वांत काळा माका श्रेष्ठ. काळचा माक्याचें पंचांग घ्यावें. काळचा माक्याचा रस काढून दोन प्रहर तो तसाच ठेवावा. नंतर वरचा वरचा रस काढून–द्रव–भावनेकरितां घ्यावा.) खल करून अर्ध गुंज प्रमाणानें गोळ्या बांधाव्यात.

प्रमाण:—पाव ते एक गुंज.

ग्रंथोक्त गुणधर्म:—

त्रिकटुमधुकयुक्तः सर्ववान्ति च शूलम्।
कफपवनविकारं वन्हिमान्द्यं च निद्राम्॥
धृतमरिचयुतो यं गुंजमात्रः प्रवाहीम्।
हरति षडतिसाराज्जीरजातीफलाभ्याम्॥ र. यो. सा. ३॥

अगस्तिसूतराज शामक, वेदनाहर, जन्तुघ्न व आंतड्यांत उत्पन्न होणारी अव्धातूची वृद्धि कमी करणारें औषध आहे. ह्याचा उपयोग पक्वातिसार व निरामग्रहणी यांत चांगल्या प्रकारें होतो. आमसंग्रहणी किंवा आमातिसार यांच्या आमावस्थेंत

---

* रसबलिसमभागं तुल्यहिंगूलयुक्तम्।
द्विगुणकनकबीजम् नागफेनेनतुल्यम्॥
सकलविहितचूर्णं भावयेद् भृंगनीरैः।
ग्रहणिजलधिशोषे सूतराजो ह्यगस्तिः॥ १
र. चं.॥ वगैरे सहा ग्रंथांत.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

याचा उपयोग करूं नये. प्रथमतः लंघन देऊन आमपाचन झाल्यानंतर मग पाहिजे तर याचा उपयोग करावा.

पक्वातिसारांत कफ, वात व तज्जन्य द्वंद्वज दोषप्रकोप असतां याचा चांगला उपयोग होतो. विशेषेंकरून मोठमोठाले जुलाब, त्याबरोबर पोटांत कळ, झटक्या-सारखी जोराची, मधून मधून येणारी, कांहीं काल बंद व पुन्हा जोरानें येणारी अशा जातीची कळ असल्यास त्या अवस्थेंत अगस्तिसूतराज उत्तम कार्य करतो. या-बरोबरच खवट, कुचकट व फेनयुक्त अशी वांति होत असल्यास त्रिकटु व मध यांबरोबर अगस्तिसूतराज द्यावा.

संग्रहणीच्या विकारांत आमावस्था नाहीशी झाल्यानंतर याचा चांगला उपयोग होतो. रोग्यास निव्वळ ताकावर ठेवून हें औषध दिल्यास कफप्रधान संग्रहणी व वातप्रधान संग्रहणी यांच्यांत चांगलाच उपयोग झाल्याचीं उदाहरणें आहेत. कफप्रधान संग्रहणींत वेदना असते, परंतु तीव्र नसते. मल घाणकट, कुचकट असा असून तो श्लेष्मल व चिकट बेडक्यासारखा असतो. ह्या स्थितींत या औषधांतील कज्जलीच्या व हिंगुळाच्या योगानें मलांतील घाण कमी होते, पित्त चांगल्या तऱ्हेनें स्रवूं लागतें, त्यामुळें अग्निमांद्य कमी होतें. धोतऱ्यामुळें अंतःस्राव अर्थात् कफयुक्त अब्धातुस्राव हे नियमित होतात. वातप्रधान संग्रहणींतील क्षोभ व शूल धोतऱ्याच्या योगानें कमी होतात व अफूच्या योगानें त्याचें पूर्ण प्रशमन होतें. वातग्रहणींतील अत्यंत भयंकर शूल त्याच्या योगानें सत्वर प्रशम पावतो. हें औषध देत असतां त्याबरोबरच बस्ति दिला असतां लवकर कार्य होतें. विशेषेंकरून अनुवासन (स्नेह*) बस्ति द्यावा. स्नेहबस्ति देणें तो तेलाचा द्यावा. ग्रहणींत अगोदरच अग्निमांद्य असल्याकारणानें इतर स्नेह उपयोगांत न आणलेले बरे.

अतिसाराच्या किंवा ग्रहणीच्या शेवटीं (अर्थात् प्रथमपासूनच उपेक्षा झाली असल्यास) सारखी वारंवार शौचाला होत राहाते. गुदमार्गाची व सबंध कोष्ठाचीच ग्राहक शक्ति अगदीं क्षीण झाल्यासारखी होते, त्यामुळें मल आंत न राहतां सारखा बाहेर येत असतो. ह्या अवस्थेंत अगस्तिसूतराजाचा उपयोग करावा. प्रवाहिकेंत (नकळत) शौचास सारखें होत राहातें, त्याचप्रमाणें शौचास होतांना कित्येक रोग्यांना अत्यंत कुंथावें लागतें. कुंथण्याचा जोर कित्येक रोग्यांत इतका वाढलेला असतो कीं, दर कुंथण्याबरोबर अंग बाहेर येतें. कांहीं कांहीं रोगी या वेदनेनें त्या अवस्थेंत मूर्च्छित पडतात. असल्या रोग्यांत अगस्तिसूतराजाचा चांगला उपयोग होतो. त्यांतील धोतऱ्यानें आंत्रांतील स्राव व आक्षेपण कमी होऊन, अफूच्या योगानें वेदनांचें तात्पुरतें शमन होतें.

---

* स्नेहबस्तिः—मात्राबस्तिहि देणें चांगलें. मात्राबस्ति २ ते ५ तोळे तेलाचा द्यावा. अनुवासनबस्तींत स्नेहमात्रा अधिक द्यावयाची असते.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मूत्रमार्गांतून शर्करा (खर) किंवा सिकता जात असतां आशयास टोंचून एक प्रकारें शूल उत्पन्न होत असतो. हा शूल कांहीं रोग्यांना फार त्रासदायक होतो. सिकता व शर्करा यांचें विद्रवण होईल, व हीं मुळांत उत्पन्नच होणार नाहींत, आणि उत्पन्न झालेलीं मूत्रमार्गानें सहज निघून जातील, अशा प्रकारची औषधयोजना, ह्या विकारांत मूलग्राही चिकित्सा होय. परंतु ह्या चिकित्सेस कित्येक वेळां फार वेळ लागतो आणि त्रासदायक शूल सारखा सुरू असतो. अशा वेळीं 'बलवान उपद्रव प्रथम जिंकावा' या न्यायानें (पश्चाच्चिकित्सेत्तूर्णं वा बलवंतमुपद्रवम् ।) हा सिकताशूल किंवा शर्कराशूल तावडतोब शमेल अशी चिकित्सा करणें जरूरीचें असतें. ह्या ठिकाणीं अगस्तिसूतराजाचा एखाद्या मूत्रल औषधाबरोबर उपयोग करावा. सारिवासव, उशीरासव, चंदनासव किंवा अरविंदासव या आसव कल्पांचा अगस्तिसूतराजाशीं संयोग जास्त फलदायी होतो. अगस्तिसूतराजानें कित्येक वेळेला स्तंभन होऊन मूत्राचें प्रमाण कमी होण्याचा संभव असतो. सबब त्याच्याबरोबर मूत्रल औषधांची योजना करणें अवश्य असतें.

यकृत् पित्त जास्त घट्ट झाल्यामळें पित्ताशयांत त्याचे खडे बनून त्यांपासून मध्यम कोष्ठांत शूल निर्माण होतो. हा शूलहि वातप्रधान असतो. याला मूळ कारण पित्ताचा स्राव कमी होणें, त्यांतील द्रवत्व कमी होणें आणि त्यामुळें तें शुष्क होऊन त्याचे खडे बनणें, हें होय. अर्थात् कारणानुरोधें चिकित्सा करावयाची म्हणजे वर लिहिलेली वस्तुस्थिति पालटून, पित्ताचे सम्यग् गुण प्रस्थापित होतील अशी तजवीज करणें जरूरीचें असतें. हें कार्य सूतशेखर, ताम्रभस्म, कारल्याचा पाला, किंवा कुटकी यांच्या योगानें चांगल्या प्रकारें घडून येतें. परंतु कांहीं रोग्यांत जबरदस्त शूल असतो. अशा वेळीं अगस्तिसूतराज देणें जास्त चांगलें.

अगस्तिसूतराजांत असलेल्या धोतरा व अफू या द्रव्यांचे उपयोग वर दिलेच आहेत. यांत असलेलीं कज्जली व हिंगूळ हीं दोन्हीं आंत्रांतील सेंन्द्रिय विषारें नाहींशीं करणारीं आहेत. ह्यांस दिलेली माक्याची भावना वातवाहिन्यांचा क्षोभ नाहींसा करणारी आहे. अगस्तिसूतराज सामान्यतः शामक, शूलनाशक, स्तंभक व आंतड्यांतील सेंद्रिय विषनाशक अशा प्रकारचें औषध आहे. याचें कार्य ग्रहणी, मूत्रमार्ग, यकृत, पित्ताशय यांवर शामक, वेदनाशामक, संग्राहक असें होतें.

दोषदूष्यें—वात, कफ व संसर्ग. **मांस, रस हीं दूष्यें.**

२. अग्निकुमार

* शुद्ध पारा व गंधक. १ भाग पारा , १ भाग गंधक यांची कज्जली करून ती २ तोळे, टांकणखार १ तोळा, बचनाग १ तोळा, मिरें ८ तोळे, शंखभस्म २ तोळे

---

* पारदं च विषं गन्धं टंकणं समभागतः ।
मरीचादष्टभागाः स्युर्द्वौ शंखवराटयोः ।। १ ।।

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

व कपर्दिका भस्म २ तोळे यांचा झांबराच्या रसांत (मोठें लिंबू) खल करून (कित्येक लोक याला झांबराच्या रसाच्या सातआठ भावना देतात) याच्या १ गुंज प्रमाणाच्या गोळ्या कराव्या.

प्रमाण:--अर्ध्या गुंजेपासून दोन गुंजांपर्यंत.

ग्रंथोक्त गुणधर्मः---

समीरणसमुद्भूतमजीर्णं च विषूचिकाम् ।
क्षणेन क्षपयत्येष कफरोगनिकृन्तनः ॥१॥ र. यो. सा. ११.
अजीर्णवातं गुदगुल्मवातं विषूचिकाद्यं विनिहन्ति सद्यः ॥ यो. र.

भावार्थः—हा रस वातापासून उत्पन्न झालेलें अजीर्ण, विषूचिका व कफरोग यांचा नाश करणारा आहे. तसेंच अजीर्णजन्य वात, गुदमार्गस्थ वातरोग, गुल्म-जन्य वातरोग, विषूचिका व इतर कोष्ठस्थ वातरोग यांचें प्रशमन करणारा आहे.

अग्निकुमाराचे मुख्यतः पाचक, अग्निप्रदीपक, वातघ्न हे गुण होत. हा आंतड्यांतील अन्नाचा विदाह व कूज नाहींसा करणारा, पोटफुगी, पोटांत शूल निघणें, आमाशय, पक्वाशय व ग्रहणी यांत वायू धरून वायू न सरणें, वेदना अतिशय होत राहणें या विकारांत फार उपयोगी आहे.

अग्निकुमार हें उष्णवीर्य औषध आहे आणि म्हणून ह्याचा उपयोग कफ-प्रधान, वातप्रधान किंवा कफवातप्रधान अजीर्णांत चांगला होतो. पित्तजन्य अजीर्णा-मध्यें अग्निकुमारासारखीं तीक्ष्णोष्णादि गुणांनीं युक्त औषधें न देणें चांगलें. यानें कांहीं उपयोग न होतां उरफाटें पित्त जास्त वाढून रोग अधिक बळावतो. कफजन्य अजीर्णांत आमलक्षणें जास्त असतां (अजीर्णं तु कफादामं तत्र शोफोऽक्षिगंडयोः ।) प्रथमतः लंघन देऊन (उपवासरूप लंघन) नंतर अग्निकुमार द्यावा. वातप्रधान अजीर्णांत पोटाच्या ठिकाणीं विष्टब्धता अधिक असते, म्हणून अग्निकुमार वारंवार दह्याच्या निवळीबरोबर देत जावा. शूल जास्त असल्यास तूप पातळ करून त्यांत अग्निकुमार देणें चांगलें.

विषूचिकेंत दोन प्रकार स्वच्छ दिसतात. एक अजीर्णजन्य व दुसरा जंतुजन्य. जंतुजन्य विषूचिकेंत अग्निकुमारापेक्षां संजीवनी, रसोनवटी, इत्यादि औषधांचा उपयोग जास्त होतो. अजीर्णजन्य विषूचिकेंत पोटांत भयंकर शूल, पोटास फुगवटी, तोंडास वारंवार पाणी सुटणें, वारंवार वांति होणें, पोट जड वाटणें हीं लक्षणें असतां अग्निकुमार द्यावा. अजीर्णजन्य विषूचिकेंत कफदुष्टीनें व पित्तदुष्टीनें वांत्या होत असतात. कफदोषापासून उत्पन्न होणाऱ्या वांतीवर अग्निकुमाराचा उपयोग चांगला होतो.

पक्वजम्बीरजैर्गाढं रसैः सप्त विभावयेत् ।
गुञ्जाद्वयमितो देयो रसो ह्यग्निकुमारकः ॥ २ ॥ यो. र.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अग्निकुमार रसाचे वैद्यकीय वाङ्मयांत एकंदर पन्नासपर्यंत पाठ आहेत.

पडसें येऊन मळमळ, वांति होईल असें वाटणें किंवा वांति होणें, वारंवार लालास्राव, त्याबरोबरच पोट फुगणें हीं लक्षणें असतां नागाच्या गोळ्यांपेक्षां अग्निकुमारानें जास्त उपयोग होतो. वारंवार पडसें येण्याची संवय व त्याबरोबर अजीर्ण किंवा अजीर्ण होऊन नंतर पडसें येणें ह्यांत अग्निकुमार हें एक चांगल्यापैकीं औषध आहे.

प्रतिश्यायानंतर उत्पन्न होणारा खोकला अथवा प्रतिश्याय न येतांहि श्वासवाहिन्यांत कफ संचित होऊन उत्पन्न होणारा खोकला व त्याचबरोबर पोट फुगणें, मळमळ, जिभेवर पांढरी बुरशी, तोंडाला चव नसणें, कांहीं खाल्लें तरी त्याचा रस बरोबर न कळणें, कटु रसाची विशेष आवड, स्निग्ध व चवदार अन्न पाहिल्याबरोबर तोंडास पाणी सुटणें हीं लक्षणें असतां अग्निकुमार द्यावा. अग्निकुमार उत्तान कफविकारांत उपयोगी पडणारें औषध आहे.

गुदमार्गाच्या अशक्तपणामुळें अतिसार उत्पन्न होतो. ह्या अतिसारांत मोठमोठाले जुलाब होतात असें नाहीं, तर थोडथोडें वारंवार शौचास होत राहातें. ही वस्तुस्थिति गुदकांडांतील स्तंभन कमी झाल्यामुळें उत्पन्न झालेली असते आणि त्याचमुळें गुदमार्ग फुगल्यासारखा जड व क्वचित् प्रसंगीं वेदनायुक्त असा असतो. गुदवाताच्या या स्थितींत अग्निकुमाराचा उपयोग होतो.

कफज गुल्म किंवा कफवातज गुल्म यांमुळें कोष्ठांत उत्पन्न होणारीं वातप्रधान लक्षणें अग्निकुमाराच्या योगानें शम पावतात. गुल्म ह्याच्या योगानें नाहींसा होत नाहीं. गुल्माकरितां स्वतंत्र निराळी चिकित्सा करावी लागते.

पोटांत कफसंचय होऊन वारंवार मळमळून वांत्या होणें. वांत्यांबरोबर गोडसें किंवा मातरट बेचव असें पाणी किंवा फेस पडणें, पोटाचा भाग जड वाटणें, कितीहि वांत्या झाल्या तरी पोटाचा जडपणा वाढतच जाणें, फुगवटी उत्पन्न होणें हीं लक्षणें असतां अग्निकुमार द्यावा. अग्निकुमारानें पित्ताचा यथोचित स्राव होऊन पोटांत सांठलेलें विकृत कफद्रव नाहींसें होतें. कित्येक वेळां लीनकफामुळें ही वांति बरेच दिवस सारखी टिकून राहाते. ह्या स्थितींत प्रथमतः अंतःपरिमार्जन * करून नंतर अग्निकुमाराची योजना करावी.

अग्निकुमाराच्या योगानें रवा, सपीट किंवा पिठाळ पदार्थ व डाळी, कडधान्यें वगैरे द्विदल धान्यें यांचें पचन चांगलें होतें. हे पदार्थ खाण्यांत आल्यापासून अजीर्ण होऊन त्यापासून मोठमोठाले जुलाब, पोटांत वात धरणें, कळ निघणें, वगैरे लक्षणें असतां अग्निकुमाराचा उपयोग करावा.

अग्निकुमारांत कज्जली—ही जंतुघ्न, योगवाही, उत्तेजक व रसायन; मिरीं—

*** अंतःपरिमार्जनः**—वांति व जलाब देणें हें आयुर्वेदीय अंतःपरिमार्जन होय.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

उत्तेजक, पाचक व अग्निदीपक; बचनाग व टंकण–हीं वातोपशामक व पोटांत वारंवार उठणारे वेठ कमी करणारीं; आणि कपर्दिकाभस्म व शंखभस्म हीं अंतःकोष्ठास शक्ति देऊन अन्नाचा विदाह शमन करणारीं अशीं औषधें आहेत. त्याचप्रमाणें झांवराच्या रसाची भावना अग्निकुमाराचा पाचक गुण वाढविण्याकरित दिलेली असते. अग्निकुमारांतील निरनिराळ्या द्रव्यांचा विचार करतां वर लिहिल्याप्रमाणें त्याचे गुणधर्म आपणांस दिसून येतात. अग्निकुमार पाचक, दीपक, शूलघ्न, उत्तेजक, रसायन व योगवाही आहे.

दोषदूष्यें:—वात, कफदोष, रस, मांस, हीं दूष्यें. अग्निकुमारानें कधींकधीं तोंड येतें. पोटांत आग होते. हीं लक्षणें होऊं लागल्यास प्रमाण कमी करावें. अगर अजीवात हें औषध बंद करावें. प्रवाळ–सत्त्व प्रतियोगी.

३. अग्नितुंडीरस

[१] शुद्ध पारा, शुद्ध गंधक, अजमोदा, हिरडा, बेहडा, आंवळकांठी, सज्जीखार, चित्रक, सैंधव, जिरें, पादेलोण, वावडिंग, मीठ, सुंठ, मिरें, पिंपळी हीं सर्व औषधें समभाग आणि सर्वांच्या समभाग शुद्ध कुचल्याचें चूर्ण घेऊन त्यांचा लबाच्या रसांत खल करावा आणि मिऱ्याएवढ्या बारीक बारीक गोळ्या कराव्या.

प्रमाण:—पाव गुंज ते अर्धी गुंज.

ग्रंथोक्त गुणधर्म (बसवराजीय):—

सा वटी वल्लयुगला सेविता जयति ध्रुवम् । वन्हिमाद्यमजीर्णं च विसूचीं ग्रहणीगदम् । शूलं कोष्ठगतं वातरोगानन्यांश्च नाशयेत् । शूलं सर्वांगजं वा पि शूलं वा परिणामजम्* । आमवातं विशेषेण हन्ति तत्वं शिवोदितम् ।

हें औषध शूलघ्न, पाचक, दीपक असून रसाजीर्णादि जुनाट व त्रासदायक विकारांत उपयोगी पडणारें आहे. कफभूयिष्ठ विकारांत, विशेषतः आमाशयस्थ कफवृद्धि होऊन कफाचें गुरुत्व, स्कन्नत्व व स्निग्धत्व हे गुण वाढल्यामुळें उत्पन्न

---

[१] शुद्धसूतं विषं गन्धमजमोदाफलत्रिकम् ।
सर्जिक्षारं यवक्षारं वन्हिसैन्धवजीरकम् ॥
सौवर्चलं विडङ्गानि सामुद्रं त्र्यूषणं तथा ।
विषमुष्टिसर्वसमां जम्बीराम्लेन मर्दयेत् ।
मरिचाभां वटीं खादेद्वन्हिमान्द्यप्रशान्तये ॥ र. चं. वगैरे १६

* परिणाम शूलः—अन्न जिरत असतां किंवा जिरल्यानंतरहि होणारा पोटशूल. भुक्ते जीर्यंति यच्छूलं तदेव परिणामजम् । हा शूल अमाशयबंधाजवळ होतो. यांतील अवष्टंभयुक्त प्रकारांत फक्त अग्नितुंडी उपयुक्त होय.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

होणाऱ्या लक्षणांत याचा विशेष उपयोग होतो. मध्यम* कोष्ठगत वातदुष्टींत वाताचें शीतत्व व चलत्व हे गुण वाढले असतां याचा उपयोग होतो.

रसाजीर्णाची संवय असलेल्या रोग्यास अन्नविद्वेष जास्त असतो. पोट नेहमीं भारावल्यासारखें असतें, चैन पडत नाहीं, पोटांत जडपणा फार असतो. तो इतका कीं, पोटांत दगड बांधल्यासारखें वाटतें, डोळे धुंद असतात, कोणत्याहि कामाची उमेद नसते, अन्नाचा परिपाक नीट होत नाहीं, ढेंकर गोड किंवा मातरट येतात, जिभेची चव जाते. जीभ चिकट किंवा मातरट पडते, कधीं कधीं व विशेषतः गोड, जड व स्निग्ध अन्न खाल्लें असतां वांति होते, वांति जेवण झाल्याबरोबर लागलीच होते, खाल्लेलें अन्न व गोडसर पाणी पडतें, आमाशयांत जी पित्तोत्पत्ति (पाचकरसोत्पत्ति) होणें जरूर, ती कमी होते. पोटाच्या आंतील पिच्छिल त्वचेवर श्लेष्म्याचें आवरण आलेलें असतें. अशा स्थितींत अग्नितुंडी हें औषध चांगलें काम करतें.

यकृताच्या अशक्ततेपासून यकृतांतील पित्त कमी प्रमाणांत स्रवतें किंवा त्याचे पाचकत्वादि गुण कमी होतात, त्यामुळें अन्नाचें बरोबर पचन होत नाहीं. मध्यम कोष्ठांत एक प्रकारचा जडपणा वाटतो. कित्येक वेळां कोष्ठांत शल उत्पन्न होतो व अपक्व अन्नाच्या योगानें अतिसारहि उत्पन्न होतो. ह्या अतिसारांत पांढरट भरभरित चोथापाणी असे वारंवार जुलाब होतात. शौचास खवट, कुचकट, दुर्गंधि असते. ह्या ठिकाणीं अग्नितुंडीचा उपयोग करावा.

यकृत्‌वृद्धीच्या विकारांत अग्नितुंडीचा उपयोग होतो. (लहान मुलांत याचा उपयोग शक्य तितका कमी करावा.) विशेषतः कफप्रधान किंवा कफवात-प्रधान यकृत्‌वृद्धींत रोग्याची त्वचा पांढरी, नखें, डोळे, ओंठ, तोंड पांढरें फटफटीत पडून गाल फुगीर व त्यांवर एक प्रकारचा तुकतुकीतपणा आलेला असतो. पाय फुगल्यासारखे तुकतुकीत व त्यांवर अत्यंत पांडुरकी आलेली असते. यकृताची कड जाड, ह्या भागांत सर्वच जाड्य आलेलें असतें, आमाशयांत (पोटांत) जडपणा, पिच्छिल स्राव, पोट जडजड वाटणें, कोष्ठांत बारीक बारीक शल, पचन अगदीं मंद व शौचास बाजरीचें पीठ कालवल्यासारखें किंवा तिळाची पेंड कालवल्यासारखें भरभरित पांढरें व चोथापाणी होतें. कोष्ठांतील शूल फारसा तीव्र असत नाहीं. परंतु त्यामुळें अस्वस्थता मात्र बरीच असते. ह्या एकंदर प्रकारांत विशेष हा कीं,

---

* मध्यमकोष्ठ यांत आमाशय पित्तधराकला, (लघ्वंत्र, क्षुद्रांत्र,) पक्वाशय, ग्रहणीबंध, मूकांत्र, ऊर्ध्वग्रहणी, तिर्यक् ग्रहणी, स्थूलग्रहणी, गुदकांड, यकृत्, प्लीहा इतक्या निरनिराळ्या अवयवसमूहांचा अंतर्भाव होतो. मकांत्राच्या बुडाशीं असलेलें आंत्रपुच्छ कोष्ठांगांत येतें. परंतु तें कोष्ठाच्या मकांत्राच्या बाहेरील अंगास आहे.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

सर्व लक्षणांत एक प्रकारचें स्तब्धत्व किंवा स्कन्नत्व, प्राप्त झालेलें असतें. रोग्याची मनःस्थितिहि त्याच तऱ्हेची असते. एक प्रकारचें बुद्धिमांद्य आलेलें असतें, मनाची विचार करण्याची शक्ति मंद होते. सर्वांगासच जडपणा वाटत असतो. ह्या एकंदर प्रकारांत अग्नितुंडीचा उत्तम उपयोग झाल्याचीं उदाहरणें आहेत. अग्नितुंडीबरोबरच कुमारीआसव, वज्रक्षार व हृद्यविरेचना*सारखीं सारक औषधें दिलीं असतां जास्त चांगला उपयोग होतो.

मध्यम कोष्ठांतील पुरःसरण क्रिया कमी झाल्यामळें अन्न जेथल्या तेथें थबकून एक प्रकारें जाड्य उत्पन्न होतें, त्याच ठिकाणांतून वायूच्या प्रेरकत्वानें व पित्तांतील उष्णतीक्ष्णादि धर्मामुळें जे निरनिराळे रस निर्माण होतात, त्यांत मंदत्व प्राप्त झाल्यामुळें, अन्नाचा सम्यक् परिपाक न होतां अन्न थोडेंफार नासूं लागतें. त्यामुळेंहि कोष्ठांत फार तीव्र नसला तरी, अस्वस्थता उत्पन्न करणारा एक प्रकारचा शूल उत्पन्न होतो. अन्न खालीं सरकत नाहीं, जेथल्या तेथें स्थिर राहातें, त्यामुळें पोटास गुबारा येऊन ताणल्यासारखें वाटतें. उद्गार किंवा अधोवायु यांची सम्यक् प्रवृत्ति होत नाहीं. तोंडास सारखी मळमळ सुटते, तोंडास पाणी सुटतें. ह्या विकारांत अग्नितुंडीचा उपयोग उत्तम होतो.

बद्धकोष्ठाचा पुष्कळ दिवसांचा विकार असून त्यामुळें लघुग्रहणी, ग्रहणीमुख व आंत्रपुच्छाजवळील भाग यांना अशक्तता आलेली असते. ह्यामुळें अर्धपक्व अन्न त्या ठिकाणीं (म्हणजे लघुग्रहणींत) वाजवीपेक्षां जास्त वेळ राहातें. त्याचें सम्यक् पुरःसरण होत नाहीं. त्यामुळें तें नासूं लागतें आणि मग त्या ठिकाणीं शूल उत्पन्न होतो, जाड्य वाटूं लागतें, लघुग्रहणीचा भाग फुगल्यासारखा होतो. ह्या विकारांत अग्नितुंडीचा उपयोग करावा.

आंत्रपुच्छविद्रधि ह्या विकारास निमित्तकारण निरनिराळ्या प्रकारचें असलें तरी, समवायी कारण दोषप्रकोप हेंच असतें. दोषांच्या अनुरोधें यांतील लक्षणांतील फरक पडलेला असतो. कफभूयिष्ठ किंवा कफवातभूयिष्ठ विद्रधींत लक्षणांची तीव्रता फार नसते, ज्वर बेताचा असतो, शूलहि बेताचाच असतो. आंत्रपुच्छाच्या ठिकाणीं म्हणजे उजव्या जांघेच्या वरच्या बाजूस जडपणा—दगड बांधल्यासारखा जडपणा आलेला असून तो भाग बराच वर उचलून आलेला असतो वारंवार मळमळ, वांत्या व त्या गोड, चिकट अशा होत असतात. कित्येक रोग्यांस. ह्या ठिकाणीं उत्पन्न होणारा शूल अत्यंत तीव्र असतो. अगदीं सहन होईनासा असतो. परंतु त्या मानानें ज्वर, दाह वगैरे लक्षणें अगदीं बेताचीं असतात. ह्या ठिकाणीं

* हृद्यविरेचनः——निशोत्तर व साकर यांच्या सम—भाग चूर्णास हृद्यविरेचन म्हणतात.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अग्नितुंडीचा उपयोग अप्रतिम झाल्याचीं उदाहरणें आहेत. जुनाट विकारांत अग्नितुंडीचा उपयोग इतकासा होत नाहीं. त्या ठिकाणीं आरोग्यवर्धिनी जास्त उपयोगी पडते.

कफजन्य उदरांत हात, पाय, डोळे, तोंड, त्वचा, नखें यांना फटफटीत पांढरेपणा आलेला असतो. जठराचा भाग जड, बराच उचलून आल्यासारखा व स्तब्ध असा असतो. त्यांत अद्यापि जलसंचय फारसा झालेला नसतो, सर्वांगास सूज आलेली, हातापायावर विशेष, हृदय क्षीण व सर्वच ठिकाणचे व्यापार मंद झाल्यामुळें सर्व शरीर जड झाल्यासारखें होतें. मूत्रोत्सर्ग नेहमींप्रमाणें नसला तरी बरा असतो. मलाचा वर्ण पांढरा किंवा पिवळटसर पांढरा असतो. ह्या स्थितींत अग्नितुंडीचा उपयोग करावा.

पक्षाघाताच्या प्रथमच्या तीव्र अवस्थेनंतर उपयोगी पडणाऱ्या औषधांत अग्नितुंडीचा समावेश करतां येण्यासारखा आहे. हातापायांत अगदीं ताकद नसून जास्त लुळेपणा आलेला, कुठलाहि पदार्थ उचलून घेण्याची स्नायूंत ताकद नसलेली, मुंग्या, जडपणा, भारावल्यासारखें वाटणें, हीं लक्षणें जास्त असलेली स्थिति असतां अग्नितुंडीचा उपयोग करावा. अग्नितुंडी व स्मृतिसागर यांतील फरक ध्यानांत ठेवण्यासारखा आहे. स्मृतिसागराचा उपयोग मन, सहस्रार (मस्तिष्क–Brain) व वातवाहिनींचीं केंद्रें यांच्यावर विशेष होतो; तर अग्नितुंडीचा उपयोग वातवाहिन्या व स्नायू यांवर विशेष होतो. वाताच्या क्षीणतेमुळें किंवा वातकफांच्या संयोगामुळें वायूचे प्रेरकत्वादि धर्म कमी होतात आणि त्यामुळें वातवाहिन्यांवरील व स्नायूंवरील ताबा कमी होतो आणि त्यामुळें लुळेपणा आलेला असतो. स्मृतिसागर उपयोगी पडणाऱ्या परिस्थितींत मनच गोंधळलेलें व विचाराक्षम असतें, त्यामुळें मस्तिष्क व केंद्रें यांतून प्रेरणा मिळत नाहीं आणि त्यामुळें त्या पक्षाचे व्यापार क्षीण झालेले असतात किंवा सम्यक् होत नाहींत.

ह्या औषधांत कुचला–उत्तेजक, वायूचें प्रेरकत्व वाढविणारा, दीपन करणारा; बचनाग–शूलघ्न, वातवाहिन्यांना शामक; कज्जली–जंतुघ्न व योगवाही; क्षार–पाचक, दीपक व कफाचें क्षरण करून पित्तप्रवृत्ति सम्यक् करणारे; जिरें, अजमोदा, वावडिंग–कफाचे गुरुता, स्कन्नत्व व मृत्स्नत्वादि धर्म नाहींसे करणारें आणि जम्बीररस–आपल्या आमलत्वानें दीपन, पाचन व पित्तोत्पादन करणारा. एकंदर द्रव्यसंयोगांचा परिणाम अग्निमांद्यनाशक असा होतो.

४. अग्निमुखरस

* पारा, गंधक व बचनाग १।१ तोळा घेऊन त्याचा आल्याच्या रसांत

* सूतं गन्धं विषं तुल्यं मर्दयेदार्दकद्रवैः ।
अश्वत्थचिंचापामार्गक्षारः क्षारौ च टंकणम् ॥

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

खल करावा; नंतर त्यांत चिंच, पिंपळ, आघाडा यांचे क्षार, जवखार, सज्जीखार, टाकणखार, जायफळ, लवंग, त्रिकटु, त्रिफळा हे ३।३ तोळे घालावेत. शंखभस्म २० तोळे, हिंग व जिरें प्रत्येकीं २।२ तोळे घेऊन त्यांचा लिंबाचा रस, महाळुंगाचा रस व इतर आम्ल द्रव्यें यांत खल करावा आणि १।१ गुंजप्रमाणाच्या गोळ्या कराव्या.

प्रमाण:--एक ते तीन गुंजांपर्यंत.

ग्रंथोक्त गुणधर्मः--

पाचनी दीपनी सद्यो जीर्णशूलविषूचिकाः ।
हिक्कां गुल्मं चोदरं च नाशयेन्नात्र संशयः ॥ र. चं. ॥

अग्निमुखरसाचें कार्य अग्निकुमार व अग्नितुंडी यांपेक्षां निराळ्या प्रकारचें आहे. वरील दोन्ही औषधांपेक्षां यांत क्षार जास्त असल्यामुळें यांचें वियोजन व शोषण यकृत्, कफस्थान्, मूत्रपिंड व मध्यम कोष्ठ यांत होतें. हें औषध पाचक, दीपक, कफस्थानीं कफाचें क्षरण करून कफ पातळ करणारें यकृत् वगैरे इंद्रियांस शक्तिदायक असें आहे.

यकृताच्या अशक्ततेपासून किंवा यकृत्पित्ताची उत्पत्ति कमी पडल्यापासून जो एक प्रकारचा अतिसार सुरू होतो, त्यास कफदुष्टि हें दोषप्रत्यनीक चिकित्सेच्या दृष्टीनें एक कारण असतें. ह्या अतिसारांत पांढरे पिठासारखे, म्हणजे पीठ काल-वल्यासारखे किंवा कित्येक वेळां खडू उगाळून त्याचें पाणी ओतल्यासारखे पांढरट, जाडसर, चोथापाणी, कुचकट, घाणकट असे जुलाब होतात. यांतील दुसरा प्रकार म्हणजे पालेभाजी धुवून पिळून काढलेल्या पाण्यासारखे किंवा पालेभाजी आंत असल्यासारखे हिरवट व चोथट व चोथापाणी असे जुलाब होतात. पहिल्या प्रकारांत अग्निमुखरसाचा उपयोग जास्त होईल, तर दुसऱ्या प्रकारांत अग्नितुंडीरसाचा उपयोग जास्त होईल. पहिल्या प्रकारांत कफदोषाचें प्राधान्य झाल्यामुळें यकृत्पित्त सम्यक् स्रवत नाहीं. हें कफप्राधान्य कमी झाल्याबरोबर यकृतपित्त सम्यक् स्रवूं लागतें आणि अतिसार नाहींसा होतो.

ह्या प्रकारच्या अतिसारांत किंवा ह्या प्रकारच्या यकृत्विकारांत जुलाबा-बरोबर वांतीहि होते. ही वांति चिकट, फेंसाळ, कळकट अशी होते. आमाशयांतील कफदुष्टीमुळें पाचक पित्ताचा स्राव बरोबर होत नाहीं. तो स्राव बरोबर न झाल्या-

---

जातीफलं लवङ्गं च त्रिकटुत्रिफला समम् ।
शङ्खक्षारं पंचपलं हिंगुजीरं द्विभागिकम् ॥
मर्दयेदम्लयोगेन गुन्जामात्रा वटी शुभा ॥ यो. र. ॥

शंखक्षारं पंचपटु—र. यो. सा. ७०

अम्लद्रव्यें:—आंबुशी, आम्लवेतस, चिंच व आमसुलें हीं अम्लद्रव्यें होत.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मुळें अन्नाचें पचनहि सम्यक् होत नाहीं. त्या योगानें अशाच प्रकारची वांति होते. हा विकार कित्येक वेळां फार जुनाटहि होतो. त्या स्थितींत अग्निमुखरसाचा चांगला उपयोग होतो.

आमाशयांत कफदुष्टि होऊन, किंवा इतर कारणांनीं, आमाशय विकृत झाल्यामुळें वारंवार उचकी उत्पन्न होते. ह्या उचकींत कफाचें स्कन्नत्व व शीतत्व हे गुण वाढलेले असतात. त्यामुळें आमाशयाचा भाग जड, शिंकें बांधल्यासारखा होऊन हिक्का (उचकी) जोराची येत राहाते. या विकारांत अग्निमुखरसाचा चांगला उपयोग होतो.

अन्नाच्या विदाहामुळें व विष्टब्धत्वामुळें उत्पन्न होणारा शूल व त्याबरोबरच पोट फुगणें, वेडेवांकडे ढेंकर येणें, पोटास व घशांत बांधल्याप्रमाणें होणें अशीं लक्षणें असून पोटांतील शूल कांहीं काल कमी व पुन: जास्ती, अति भयंकर कळा येणें असा म्हणजे झटक्यासारखा असल्यास; यांत अग्निमुखाचा उपयोग जास्त होतो. यांतील शंख, हिंग यांच्यामुळें झटक्याप्रमाणें येणारी वेदना कमी होते व बाकीच्या शामक औषधांच्या योगानें अवशिष्ट राहिलेली वेदना शम पावते.

पक्वाशय व ग्रहणीचा कांहीं भाग यांत अन्न नासूं लागून त्यांत एका प्रकारच्या जंतूच्या क्रियेची भर पडून कोष्ठांत वायूचा संचय खूप होतो. त्यायोगें आनाह व कित्येक वेळेला आध्मान अत्यंत तीव्र उत्पन्न होतें, पोटाला सारखी तडणी लागते, ती इतकी कीं, श्वासोछ्वास घेण्यासहि अडचण पडते. पोटाच्या शिंपेपर्यंत सगळ्या पोटांतून वारा भरल्यासारखा होऊन सर्व कोष्ठ अतिशय ताणतो, रोग्यास चैन पडेनासें होतें, सर्व कोष्ठभर बारीक बारीक कळा निघतात. शौचास प्रथम प्रथम चांगलेंसें होत नाहीं, अधोवायु सरकत नाहीं, मूत्राचाहि थोडासा अवरोधच असतो. ह्या स्थितींत वाताचें अनुलोमन करणारें व कोष्ठस्थ दुष्टि नाहींशी करणारें असें औषध पाहिजे असतें. केवळ विरेचनें देऊन या ठिकाणीं उपयोग होत नाहीं. अग्निमुखरसाचा वातानुलोमक व कोष्ठदुष्टिनाशक असा उपयोग होतो.

निर्जंतुक विषूचिका (महामारी किंवा पटकी नव्हे) या विकारांत सर्व कोष्ठांत सुया टोंचल्याप्रमाणें वेदना होतात. कांहीं रोग्यांस याबरोबरच मोठमोठाले पाण्यासारखे जुलाब होतात. अशा प्रकारचे जुलाब झाल्यामुळें सर्वांगास पेटके आल्यासारखे होतात व क्वचित् प्रसंगीं मूत्रावरोधहि होतो. ह्या विकारासहि कोष्ठस्थ अन्नदुष्टि हेंच कारण असतें. ह्या स्थितींत अग्निमुखरसाचा उपयोग करावा.

गुल्म ह्या विकाराची चांगली कल्पना येणें जरूरीचें आहे. गुल्म म्हणजे गोळा, तो कोणत्याही प्रकारचा असला तरी त्यास गुल्मच म्हणावयाचें असा परिपाठ असल्यामुळें गुल्मचिकित्सेंत पुष्कळ वेळां फार गोंधळ होतो. आंतड्यांतील अंतस्थ

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

भागांत वाताचा संचय व अवरोध होऊन आंतड्यांचा फुगा झाल्यामुळें तो गोळ्या-सारखा दिसतो, अशा प्रकारच्या गुल्मांत अग्निमुखरसाचा चांगला उपयोग होतो. वर आनाहाची जी अवस्था वर्णिली आहे तिची व्याप्ति सर्व कोष्ठभर असते, तर ह्या गुल्माची व्याप्ति आंत्राच्या फार थोड्या भागांत असते. बाकीच्या प्रकारांत म्हणजे कफगुल्म, रक्तगुल्म, अष्ठीला इत्यादि गुल्मरोगांत ह्याचा उपयोग होणार नाहीं.

मूत्रपिंडाच्या विकृतीमुळें मूत्रस्राव कमी व लाल रंगावर येतो. मूत्रांतून क्लेद जातो, तोंडावर आणि नंतर हातांपायांवर सूज असते, पोटाच्या कातडीवर सूज असते. ही सूज पुढें पुढें बरीच वाढून कोष्ठस्थजलसंचय बराच होतो. पातळ, पिठाळ असे वारंवार जुलाब होतात. मूत्रपिंडांतून क्लेदवहन सम्यक् न झाल्यामुळें व कोष्ठस्थ कफदुष्टीमळें हा सर्वांगशोफाचा किंवा उदराचा विकार उत्पन्न झालेला असतो. अशा प्रकारच्या विकारांत अग्निमुखरस मूत्रल औषधांबरोबर, म्हणजे गोखरू, धमासा, पित्तपापडा, अनंता, पुनर्नवा इत्यादि औषधांबरोबर दिला असतां, मूत्रपिंडांतील क्लेदवहनाचें कार्य व्यवस्थित होऊन मूत्र चांगल्या प्रकारें स्रवूं लागतें व त्यांतील मलद्रव्यें बाहेर निघून जातात. ह्या ठिकाणीं अग्निमुखरसाचें कार्य दुहेरी होतें. एक तर त्यांतील क्षारांच्या योगानें मूत्रपिंडांतील क्लेदवहन व मूत्र-स्राव हीं कार्यें घडून येतात व शंखभस्म, त्रिकटु, जिरें, हिंग, अजमोदा इत्यादि औषधांच्या योगानें अर्थातच याचें वियोजन पोट व आंतडीं यांत होत असल्यामुळें त्रयस्थ दोषांचें शमन होऊन अतिसार कमी होतो.

जुनाट खोकला व त्याबरोबर अतिसार असतां अग्निमुखरसाचा उपयोग करावा. जुनाट खोकल्याच्या आजारांत कफाचा चांगल्या प्रकारें स्राव होत नसेल, कफ अगदीं घट्ट व गांठाळल्यासारखा असेल, अतिशय खोकून खोकून थोडा व घट्ट असा कफ पडत असेल व त्याबरोबरच पोट दुखणें, अजीर्ण होणें, पोटास फुगवटी व जुलाबहि पांढरवट, कुजट असे होत असल्यास अग्निमुखरस देणें फार चांगलें होय. ह्या ठिकाणीं औषधयोजना करतांना त्याबरोबर कफस्रावी किंवा श्वासवाहिन्यांना उपशामक अशा औषधांचा म्हणजे ज्येष्ठमध, अडुळसा, रिंगणीमूळ इत्यादिकांचा ह्या औषधाबरोबर अनुपान म्हणून उपयोग करावा.

अग्निमुखरसांतील पारागंधकांची कज्जली–जंतुघ्न, रसायन; बचनाग, जाय-फळ–शामक; टाकणखार, जायफळ–हीं वातशामक; क्षार–पाचक व मूत्रल; हिंग-वातोद्रेक कमी करून त्याचें अनुलोमन करणारा, शूलघ्न व वातशामक; जिरें, लवंगा–कोष्ठस्थ विदाहनाशक; त्रिफळा–किंचित् स्तंभक व आंत्राची पुरःसरणक्रिया वाढवणारा; शंखभस्म–विदाहनाशक, स्वादुतोत्पादक, शूलघ्न, पाचक, दीपक म्हणून अतिसारनाशक. हें औषध तीक्ष्ण असल्यामुळें रक्तपित्त, रक्तार्श, उरःक्षत इत्यादि विकारांत याचा उपयोग शक्य तोंवर करूं नये.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

५. अग्निसुत (अग्निसूनु)

* कपर्दिका भस्म १ भाग, शंखभस्म २ भाग, गंधक .।. भाग, पारा .।. भाग, आणि मिऱ्याचें चूर्ण ३ भाग घेऊन सर्वांचा लिंबाच्या रसांत खल करावा. याला अग्निसुत किंवा अग्निसुतरस असें म्हणतात.

प्रमाणः—एक ते तीन गुंजांपर्यंत.

ग्रंथोक्त गुणधर्मः—

घृतेन खण्डात्सहभक्षितेन क्षीणान्नरान्हस्तिसमान्करोति ।।
समागधीचूर्णघृतेन लीढ्वा नरः प्रमुञ्चेद् ग्रहणीविकारात् ।।१।।
शोफज्वरारोचकशूलगुल्मान्पाण्डूदरार्शोग्रहणीविकारान् ।।
तक्रानुपानो जयति प्रमेहान्युक्त्या प्रयुक्तोऽग्निसुतो रसेन्द्रः ।। यो. र. ।।

हा रस अग्निमांद्यनाशक आहे. अग्निमान्द्य हा विकार कफवृद्धीमुळें व पित्तांतील द्रवादिP गुणांच्या वृद्धीमुळें उत्पन्न होतो. पित्तांतील द्रवादि गुण वाढले असतां अग्निसूनु घृताबरोबर द्यावा. हें द्रवत्व असून पित्तांतील विस्रत्व हा गुण वाढला असतां म्हणजे करपट ढेंकर, वेडीवांकडी व खंवट अशी वांति होत असतां अग्निसुत तूप व खडीसाखर यांच्याबरोबर द्यावा. अग्निमांद्यापासून क्षीणता व कृशत्व प्राप्त झालेलें असल्यास त्यांतहि वरील अनुपानांत वरील औषध द्यावें. अग्निसूनुरसाचें कार्य तिर्यग्गत दोष किंवा लीन दोषांवर होत नाहीं, उत्तान दोष असतांना याचें कार्य चांगलें होतें. म्हणून जुनाट विकारापेक्षां नवीन विकारांत याचें कार्य चांगलें होतें.

नवीनच उत्पन्न झालेला संग्रहणी रोग, यांत वारंवार भस्रट व चोथापाणी असा मल पडतो. तोंडास पाणी सुटतें, मळमळतें, पोट व आंतडीं यांत जाड्य वाटतें. अशा स्थितींत पिंपळीच्या चूर्णाबरोबर अग्निसूनु द्यावा. आंव व त्याबरोबर रक्त पडत असतांना या रसाचा उपयोग होत नाहीं. या विकारांत दोष लीन झालेले असतात. कफज संग्रहणींत किंवा कफवातज संग्रहणींत, ती नवीनच उत्पन्न झाली असतां, मात्र ह्या रसाचा उपयोग होतो.

---

* भागो दग्धकपर्दकस्य च तथा शङ्खस्य भागद्वयम् ।
भागो गन्धकसूतयोर्मिलितयोः पिष्टवा मरीचादपि ।।
भागस्य त्रितयं नियोज्य सकलं निंबूरसे मर्दितम् ।
नाम्ना वन्हिसुतो रसोऽयमचिरान्मान्द्यं जयेद्दारुणम् ।। १ यो. र. ।।
ह्यालाच र. सो. सा. त अग्निकुमार म्हटलें आहे. (क्रमांक २५)

P द्रवादिगुण—पित्तांत द्रव म्हणजे पातळपणा हा गुण असतो तसाच विस्रत्व म्हणजे आमगंधी हाहि गुण असतो.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आमाजीर्ण हें कफसमुद्भूत असतें. याची उपेक्षा झाली असतांना कित्येक वेळां अतिसार सुरू होतो. या प्रकारच्या अतिसारांत पित्ताच्या क्षीणतेमुळें व कफाच्या वृद्धीमुळें पांढरट, जड, बुळबुळीत, जाडसर वारंवार शौचास होतें. येथें अग्निसुनूचा उपयोग होतो.

ह्याच प्रकारच्या आमाजीर्णामुळें किंवा विष्टब्धाजीर्णामळें ज्वर उत्पन्न झाला असल्यास किंवा ह्या अजीर्णामुळें उत्पन्न झालेल्या ग्रहणी–अतिसारादि विकारांत ज्वर हें लक्षण किंवा ज्वर हा उपद्रव असतां अग्निसुनूचा उपयोग करावा.

हा रस ताकाबरोबर दिला असतां, अरोचक, शूल, गुल्म, पांडु, उदर व अर्श हे रोग नाहींसे होतात असें ग्रंथकर्त्यांनीं लिहिलें आहे. हे विकार जुनाट असतां त्या ठिकाणीं याचा उपयोग होईल असें आम्हांस वाटत नाहीं. हे सर्व रोग ग्रहणीच्या दुष्टीमुळें उत्पन्न झालेले असतात. कफदोषामुळें ग्रहणी दुष्ट झाली असतां व ती दुष्टि फार खोल गेलेली नसतां या औषधाचा उपयोग होतो.

अग्निसुनूमधील कज्जली–जंतुनाशक, रसायन व योगवाही; शंख व कपर्दिक–दीपक, पाचक, स्तंभक; मिरें– तीक्ष्ण, उष्ण, कटुरसात्मक, दीपक, पाचक व त्यामुळें पाचकादि पित्ताचा सम्यक् स्राव करविणारें व लिंबाचा रस–आपल्या आम्लादि रसानें पित्तस्रावी व पाचकादि गुण वाढवणारा असा आहे.

६. अमृतार्णव रस

* बचनाग, पारा, गंधक, लोहभस्म व अभ्रकभस्म (शतपुटी) हीं सर्व समभाग घेऊन त्यांना चित्रकाच्या काढ्याच्या सात भावना द्याव्या. त्याच्या दोन गुंजांपर्यंत प्रमाणाच्या गोळ्या कराव्यात.

प्रमाणः—अर्धी ते दीड गुंज.

ग्रंथोक्त गुणधर्मः—

रक्तिद्वयमितं खादेद् यथादोषानुपानतः ।
आमाशयिक रोगेषु ज्वरेषु विषमेषु च ॥ १ ॥

अमृतार्णवाचे निरनिराळे पाठ वाङ्मयांत आढळतात. पैकीं भैषज्यरत्नावलींतील हा पाठ जास्त सुटसुटीत आहे. बृहद्योगतरंगिणींतील पाठ फार मोठा व कुपिस्थ पाचनाचा आहे. रसचंडांशूमध्यें पाठ निराळ्याच प्रकारचा आहे. इतर ग्रंथांतहि निराळेच पाठ सांपडतात. त्या सर्वांत येथें दिलेला पाठ जास्त उपयोगी व अनुभविक असल्यानें त्याचे गुणधर्म विस्तारानें येथें दिलेले आहेत.

---

* अमृतं च रसंगंधं लौहमभ्रं समांशकम् ।
भावयेद्वन्हिनीरेण सप्तकृत्वः पृथक् पृथक् ॥ र. यो. सा. २०२ ॥

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आमाशयांत दोषप्रकोप होऊन तेथील पचनक्रिया बिघडून व त्या ठिकाणीं आमसंचय होऊन ज्वर उत्पन्न होतो असें आयुर्वेदाचें मत आहे; आणि याच कारणामुळें ज्वरचिकित्सेमध्यें दोषाचें पाचन करणारीं औषधें आयुर्वेदांत वापरलेलीं आहेत. या रसामध्यें चित्रकाच्या सात भावना देण्याचें रहस्यहि हेंच आहे. आमाशयांत दोषसंचय होण्यास निमित्तकारणें ज्या प्रकारचीं घडलीं असतील त्यांचाहि विचार औषधयोजना करतांना जरूर करावा लागतो. तसेंच आमाशयस्थ दोषापासून केवळ ज्वर उत्पन्न होईल असेंच नसून दोषदूष्यादिकांच्या संयोगानें इतर व्याधीहि निर्माण होतील. त्या दृष्टीनें या औषधाच्या गुणधर्मांचा विचार केला पाहिजे.

केवळ सामदोषापासून अग्निमांद्य उत्पन्न होऊन ज्वरोत्पत्ति झाल्यास, त्रिभुवनकीर्ति, आनंदभैरव इत्यादि औषधांचा उपयोग होतो. परंतु सामदोषज अग्निमांद्यास निमित्तकारण मनोव्याघात, अतिशय मानसिक श्रम, काम, शोक, भय इत्यादिकांचा अतियोग किंवा मानसिक श्रम व त्यामुळें शरीरांत विशेषत: रक्तांत फिकेपणा येऊन नंतर ज्वर आल्यास या रसाचा उपयोग करावा. या कारणापासून उत्पन्न झालेल्या धातुवैषम्यप्रवृत्तींत व मिथ्याहारादिकांपासून उत्पन्न झालेल्या धातुवैषम्यप्रवृत्तींत फरक असतो आणि म्हणून तज्जनित रोगांतहि तो फरक स्पष्टपणें दिसतो. धातुवैषम्य नाहींसें करीत असतां ह्या फरकाकडे जरूर लक्ष द्यावें लागतें. मिथ्या आहारानें उत्पन्न झालेली धातुवैषम्यप्रवृत्ति स्थूल स्वरूपाची असते, तर मनोव्याघातजन्य धातुवैषम्यप्रवृत्ति सूक्ष्म स्वरूपाची असते. एकीचा परिणाम मनोदेशावर घडून नंतर शरीरावर घडतो, तर दुसऱ्या प्रकारच्या प्रवृत्तींत स्थूलशरीरावयवांमध्यें दोषसंचय झालेला असतो. अशा प्रकारें संप्राप्तिशास्त्रदृष्ट्या या दोहोंत फरक आहे. चिकित्सा करतांना या उपपत्तीकडे दुर्लक्ष करून भागत नाहीं. अमृतार्णवामधील अभ्रक व लोह यांचा मनोव्याघातजन्य दोषदुष्टी नाहींशी करून धातुसाम्यप्रवृत्ति प्रस्थापित करणें, असा उपयोग होतो. म्हणून कामज्वर, भय किंवा शोक यांच्यापासून उत्पन्न झालेला ज्वर यांत ब्राह्मीअर्क, पर्पट, अनंता, सारस्वतारिष्ट यांच्याबरोबर अमृतार्णवाचा उपयोग करावा. ज्वरवेग अत्यंत तीव्र असतांना अमृतार्णवाबरोबर (मिश्र न करतां वेगळीं) प्रवाळ, गुळवेलसत्त्व, मौक्तिक हीं औषधेंहि द्यावींत.

विषमज्वरांत दोषांचा निरनिराळ्या दूष्यांत प्रसर झालेला असतो; आणि दोषदूष्यादिकांचा हा संयोग निरनिराळ्या प्रकारच्या निमित्तकारणांनींच झालेला असतो. जितका दोषदूष्यसंयोग तीव्र तितका रोगहि तीव्र. अशा प्रकारें तीव्र रोग असतां महाज्वरांकुश, महामृत्युंजय, हीं औषधें जास्त उपयोगी पडतात. परंतु दोष लीन झाले असतां हेच विषमज्वर जुनाट व चिरकारी बनतात. असल्या

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

स्थितींत महाज्वरांकुशादि औषधांचा व्हावा तसा उपयोग होत नाहीं. धातूंच्या ठिकाणीं लीन झालेल्या दोषाचें प्रशमन करण्याचें सामर्थ्य यांत नसतें. हें महत्त्वाचें कार्य अमृतार्णव करतो. जितका जितका विषमज्वर जुनाट व त्याबरोबर प्लीहा-वृद्धि, सर्वांगास पांडुता, बलहानि हे उपद्रव जास्त, तितका तितका अमृतार्णवाचा उपयोग चांगला होतो.

आमाशयस्थ दोषांपासून उत्पन्न होणाऱ्या लहान मुलांच्या व मोठ्या माणसांच्या रोगांत अमृतार्णव चांगलें काम करतें. लहान मुलांचे क्षीरालसक, पारिगर्भिक या विकारांत कारणभेदानें, अवस्थाभेदानें, आमाशयस्थ दोष हेंच कारण असतें. क्षीरालसकामध्यें आमाशयस्थ कफ वाढून पक्वाशय, ग्रहणी यांतील पचन-व्यापार बिघडून रसरक्तवाही स्रोतसें रुद्ध होऊन त्यामुळें मूल क्षीण होत जातें. या विकारांत मुलाचें पोट फुगतें, हातपाय कृश होतात, डोकें मोठें होतें, वारंवार गुळण्या येतात, शौचास कधीं खडा तर कधीं अपक्व व श्लेष्मयुक्त जुलाब होतात. या विकारांत अमृतार्णवाचा उपयोग करावा. पारिगर्भिक विकारांत मातेचें दूध जास्त स्निग्ध, गुरु व विकृत झाल्यामुळें तें न पचून त्यामुळें आमाशयस्थ कफदोषाची वृद्धि होते; आणि यामुळें पचन बिघडून स्रोतसांचा अवरोध होऊन मूल सुकत जातें ही विकृति मातेच्या गरोदरावस्थेमुळें उत्पन्न झालेली असते. यांतहि वरच्या. प्रमाणेंच (क्षीरालसक) बहुतेक लक्षणें होत असतात. त्याशिवाय मूल किरकिर फार करतें, कोणत्याहि स्थितींत त्यास बरें वाटत नाहीं, डोकें व गाल सुकून गेल्या-सारखे असतात, क्षुधा मंद, थकवा अतिशय, शौचास वारंवार हिरवट, पांढरट असें होत राहाणें, या विकारांत प्रथमतः वमन देऊन आमाशयशुद्धि झाल्यानंतर अमृतार्णव रस द्यावा.

आमाशयस्थ विकारांपासून मुलास बालग्रहाचा विकार उत्पन्न होतो. ह्या विकारास कांहीं अंशीं विकृत दूध हें एक कारण असतें. मातेचें दूध विकृत झाल्या-पासून किंवा मातेव्यतिरिक्त इतर दुधाची निगा न राहिल्यानें त्यांत विकार उत्पन्न होऊन प्रथमतः आमाशयस्थ कफदुष्टि होते आणि नंतर सबंध कोष्ठ बिघडून त्यांतील दोषामुळें बालग्रहाचे झटके येऊं लागतात. पक्वाशय हें वातस्थान असल्यानें तत्रस्थ वातविकृति होते, पोट फुगतें, दुखूं लागतें, त्याबरोबर ज्वर येतो, मलावरोध होतो किंवा शौचास वेडेंवांकडें, घाणेरडें, काळसर असें वारंवार थोडें थोडें होत राहातें. मुलास वारंवार झटके येत राहातात, ते फार तीव्र स्वरूपाचे असून मूल प्रत्येक झटक्या-बरोबर थकल्यासारखें होतें. या विकारांत (व या स्थितींत) अमृतार्णवाचा उपयोग होतो.

जन्तुजन्य अतिसारांत दुग्धविकृति हेंच कारण असतें. उन्हाळ्याच्या दिवसांत दूध नासूं लागतें आणि तसलेंच दूध मुलांस पाजलें गेलें म्हणजे हा विकार

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

उत्पन्न होतो. या विकाराच्या तीव्रावस्थेंत रसराज हें उत्तम औषध होय. परंतु तीव्रावस्था साधारणपणें कमी झाल्यानंतर किंवा तीव्रावस्थेंतहि वातप्रधान लक्षणें जास्त असतां, म्हणजे मुलांस झटके, कंप, आक्षेपक, अपतंत्रक, अपतानकादि विकार उत्पन्न झाले असतां व त्यांत ज्वर, थकवा (क्लम) हे उपद्रव असतां अमृतार्णव रसाचा उपयोग करावा.

मोठ्या माणसांत अपचन व त्यापासून बद्धकोष्ठ हे विकार आमाशयस्थ कफदुष्टीनें उत्पन्न होतात. ह्या विकारांत अग्निमांद्य, तोंडाला वारंवार गोडसर पाणी सुटणें, पोटांत जडपणा, अन्नाची वांच्छा कमी, अरुचि व विशेषतः स्निग्ध व जड अन्नाचा अत्यंत तिटकारा हीं लक्षणें असतां व त्यांबरोबरच शरीरबल कमी कमी होत असतां अमृतार्णव रसाचा चांगला उपयोग झालेला आहे.

ह्याच प्रकारच्या आमाशयस्थ विकृतीमुळें आमाशयस्थ कफ वाढून वारंवार श्वासाचा विकार उत्पन्न होतो. यांत कफप्रधानदोषामुळें मध्यम पटलावर ताण पडून श्वास उत्पन्न होतो. ह्या स्थितींत आरोग्यवर्धिनी व अमृतार्णव हीं दोन औषधें उपयोगी पडतात. पक्वाशय व ग्रहणी यांमध्यें मलसंचय जास्त व वातदोषप्राधान्य असतां आरोग्यवर्धिनीचा उपयोग होतो व दोष आमाशयस्थ असून कफप्राधान्य असतां अमृतार्णवाचा उपयोग होतो. हीं औषधें जुनाट विकारांत उपयोगी पडतात. श्वासाचा तीव्र वेग असतां हीं औषधें उपयोगी पडत नाहींत. त्या वेळीं दोषदूष्यादिकांच्या अनुरोधानें श्वासकुठार, समीरपन्नग वगैरे श्वासहर औषधांचा उपयोग करावा लागतो.

यांतील कज्जली–जंतुघ्न, योगवाही, रसायन, विकाशी, आणि व्यवायी अशी आहे. ह्याच तिच्या धर्मामुळें श्लेष्मदुष्टी नाहींशी होऊन धातुसाम्य प्रस्थापित होतें. रसायनादि गुणामुळें अभ्रक व लोह यांचें कार्य अत्यंत सूक्ष्म घटकापर्यंत जाऊन पोहोंचतें. बचनाग–ज्वरहर, वेदनाशामक, आणि वाताचा आवेग कमी करणारा असा आहे. यांत वापरलेला बचनाग गोमूत्रांत शुद्ध केल्यामुळें तो हृदयाची शक्ति क्षीण करीत नाहीं. अभ्रक–वातवाहिन्या व वातवह केंद्रें यांना शक्तिदायक व शामक असें आहे. लोह–रक्त सकस बनवून सर्व शरीरबल वाढविणारें आणि चित्रक–अग्निप्रदीपक, पाचक व आमाशयस्थ कफदोषाचें वैषम्य नाहींसें करणारें आणि पक्वाशय व ग्रहणींतील वातदुष्टी नाहींसें करणारें असें आहे.

७. अश्वकंचुकी (घोडाचोळी)

[१] पारा, बचनाग, गंधक, हरताळ, टांकणखार, व जेपाळबीज हीं एक

---

[१] रसं विषं गन्धकतालकं हि कटुत्रिकं वै त्रिफला समेतम् ।।
सटङ्कणं वै जयपालबीजम् । संमर्दितं भृंगरसेन पश्चात् ।।
मुद्गप्रमाणा गुटिका विधेया संसेविता षष्ठ्यनुपानयोगैः ।। र. चं. ।।

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

एक भाग आणि त्रिकटु व त्रिफळा तीन तीन भाग घेऊन त्यांचा माक्याच्या रसांत खल करून मुगाएवढ्या गोळ्या कराव्या. (दुसऱ्या पाठांत माक्याच्या रसाच्या २१ भावना द्यावयास सांगितलें आहे.)

प्रमाण:—एक ते तीन गुंजा

ग्रंथोक्त गुणधर्मः—

सर्वा रुजोवैविनिहन्ति शीघ्रं गुटी प्रकर्षाद्धयचोलिकेयम् ॥ र. चं.

अश्वकंचुकी या औषधाचे निरनिराळे दोन, तीन, चार पाठ सांपडतात. घोडाचोळी या नांवाखालीं असलेल्या पाठांतच 'अश्वकंचुकी' असें संस्कृत नांव देऊन तें औषध वापरण्याचा बऱ्याच वैद्यक घराण्यांचा परिपाठ आहे. त्याच-प्रमाणें आम्हीहि अश्वकंचुकी व घोडाचोळी हे शब्द समानार्थी समजून वरील पाठाप्रमाणें तयार केलेलें औषध वापरतों. हचा औषधाचा अनुपानपरत्वें बहुतेक सर्व रोगांवर उपयोग होतो असा या औषधाचा लौकिक आहे. परंतु ही वस्तुस्थिति खरी असणें शास्त्रीय दृष्टचा शक्यच नाहीं. द्रव्यसंयोगज फल एक विशिष्ट प्रकारचेंच असतें. त्या अनुरोधानेंच विशिष्ट औषध कार्य करूं शकतें. सर्व रोगावस्थांमधून एकाच औषधाचें कार्य वरील तत्त्वानुसार शक्य नाहीं. इतकें खरें कीं, घोडाचोळी हें औषध अत्यंत वीर्यवान् व प्रभावशाली आहे.

हें औषध सारक, विकाशी, व्यवायी, प्रमाथी, क्षरण करविणारें, लेखन, दोषसंघातभेद करणारें असें असून कफ, वातकफ व पित्तकफ अशा दोषसंयोगांत उपयोगी पडणारें आहे. विशेषतः अनूप (पाऊसपाणी व झाडी पुष्कळ अशा) प्रदेशांत उत्पन्न होणारे व्याधी व तत्रस्थ रोग यांत याचा उपयोग विशेष होतो. जांगल प्रदेशांत राहणारे व उद्रिक्तपित्त रोगी यांत याचा व्हावा तसा उपयोग होत नाहीं. गर्भिणी, सूतिका, (सहा महिन्यांच्या आंतील) लहान मूल व जराजर्जरित वृद्ध यांत या औषधाचा उपयोग शक्य तितका टाळावा. अर्श, रक्तपित्त, उरःक्षत, मूत्रकृच्छ्र, मूत्राघात या रोगांत हें औषध न दिलेलें बरें.

कफदोषवृद्धि होऊन त्यामुळें पोटास फुगवटी, सारखा प्रसेक, श्वास व कास हीं लक्षणें असून त्याबरोबर रोग्यास बरीच गुंगी असल्यास हचा औषधाचा उपयोग करावा. अशाच प्रकारें आमाशयांत व उरःस्थानांत कफवृद्धि होऊन पावसाळ्या-च्या आरंभीं किंवा मध्यांत उत्पन्न होणारा श्वास, विशेषतः थंड उपचारानें उत्पन्न झालेला असतां आणि बरोबर नियमित याच वेळीं उत्पन्न होत असतां या औषधाचा

पाठ दुसरा—पारदं टंकणं गंधं विषं व्योषं फलत्रयम् । तालकं च जयपालं च समं सर्वं विचूर्णयेत् ॥ मर्दयेत् भृंगनीरेण भावना तु त्रिसप्तधा ॥ गुंजामात्रां वटीं कृत्वा छायायां शोधयेद्बुधः शृंगवेर रसैःसार्द्धं वटीमेकां प्रयोजयेत् । अश्वकंचुकिराख्याता श्वासे कासे ज्वरे तथा । यथारोगानुपानेन सर्वत्र विजयप्रदा । र. यो. सा. २६६

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

उपयोग करावा. ह्या श्वासामधील कफप्रधान लक्षणें असून वारंवार घट्ट व पांढरट असे मोठमोठाले बेडके पडत असले पाहिजेत. त्याचप्रमाणें श्वासाचा वेगहि तीव्र नसावा. घाबरेपणा जास्त नसावा, असें असतां हें औषध वापरावें.

सहा महिन्यांच्या वरील लहान मुलास अलसक हा विकार उत्पन्न झाला असतां मुलाची छाती भरून आल्यासारखी होते, श्वासोच्छ्वास जलद होतात, बरगड्यांच्या खालीं पोटाच्या बाजूस प्रत्येक श्वासोच्छ्वासाबरोबर खळ्या पडतात. मल अगदीं गुदमरून जातें. मुरकुसून व विकल होऊन पडलेलें असतें. ज्वरवेग बेताचा असतो. शौचाला व्हावें तसें साफ होत नाहीं. या विकारांत हें औषध आईच्या दुधाबरोबर किंवा कारल्याच्या पाल्याच्या रसाबरोबर द्यावें.

मुलांत उत्पन्न होणारा श्वसनक सन्निपात यांतहि कफसंचय जास्त झाला असतांना व श्वासोच्छ्वास जास्त जलद होत असतां ह्या औषधाचा उपयोग करावा. ह्या विकारांत प्रथमावस्थेंत घोडाचोळीसारखें कफाचें लेखन करणारें औषध दिलें गेल्यास रोगाचा भर पुष्कळच कमी होतो आणि रोगी सहसा जाया होत नाहीं. कित्येक रोग्यांस मुदतीच्या आंतच यानें बरें वाटल्याचीं उदाहरणें आहेत. लहान मुलाप्रमाणेंच मोठ्या माणसांतहि कफदोषप्रधान विकार असतां या औषधाचा उपयोग करावा.

कफजन्य, सारखी वांति, यांत पोटांत जडपणा, तोंडाला सारखें पाणी सुटणें, लाला स्राव, मधुर व फेंसकट, जाडसर अशी वांति होत राहाणें, पोटाच्या ठिकाणीं स्तैमित्य वाटणें, आळस, तोंडावर फुगीरपणा हीं लक्षणें असतां ह्या औषधाचा उपयोग करावा.

लहान मुलांच्या यकृत्‌वृद्धींत हें औषध उत्तम उपयोगी पडतें. ह्या विकारांतहि कफलक्षणें प्राधान्येंकरून असावीं लागतात. यकृत् जाड, यकृताचा भाग खूप जड वाटणें, मुलास गुंगी, झांपड, खोकला; तो इतका कीं, छाती नेहमीं भरल्यासारखी असणें, घशांत घुरघुर, शौचास पांडुर, सर्वांगास पांडुरकी, तोंड, हातपाय टापसलेले व त्यावर पांडुरकी, अशीं लक्षणें असतां व रोगी अनूपदेशांत राहात असतां ह्या औषधाचा उत्तम उपयोग होतो. याच रोगांत पित्तप्रधान लक्षणें असतां या औषधाचा उपयोग न केलेला बरा. ह्याच प्लीहावृद्धींतहि ह्या औषधाचा उपयोग होतो. यकृत् व प्लीहा या दोहोंची वृद्धि झाली असतां या औषधाचा विशेष उपयोग होतो. ह्या रोगाच्या अत्यंतावस्थेंत गेलेले रोगीहि ह्या औषधानें बरे झाल्याचीं उदाहरणें आहेत.

मोठ्या माणसांची यकृत्‌वृद्धि, मद्यपानाच्या संवयीमुळें झालेली नसल्यास, व त्यांतहि कफप्रधान लक्षणें प्रामुख्यानें असल्यास, या औषधाचा उपयोग चांगल्या

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

प्रकारें होतो. हल्लीं ह्या औषधीचा पुष्कळ वेळां दुरुपयोगहि होत असल्याचीं उदाहरणें दृष्टीस पडतात. रोगांतील दोषदूष्यसंयोगाचा याथातथ्य विचार न करतां केवळ व्याधिप्रत्यनीक चिकित्सा करीत राहण्याचा हा परिणाम होय. यकृत्-वृद्धि या विकारांत कफदुष्टीचीं लक्षणें व पित्तदुष्टीचीहि लक्षणें असतात. पित्तदुष्टीचीं लक्षणें असतां हें औषध उपयोगी न पडतां पित्तवृद्धि होऊन रोग्यास अपाय मात्र होतो. करितां दोषदूष्यविवेक जरूर पाहावा.

जुनाट यकृतविद्रधि हा विकार अत्यंतावस्थेला गेलेला नसल्यास व मद्यातिपान हें त्यास कारण नसल्यास ह्या औषधाचा उपयोग करावा. कित्येक वेळां संग्रहणी-च्या विकारांत उपक्रम बरोबर न झाल्यामुळें किंवा उपक्रम बरोबर होऊनहि जंतु-स्वभावामुळें यकृत्विद्रधीचा विकार उत्पन्न होतो व तो जुनाट होतो. ह्या विकारांत कुडचाच्या मुळयांचा कल्प, विशेषतः कुटजारिष्ट व घोडाचोळी हें मिश्रण अत्यंत उपयोगी पडतें. यांतहि कफप्रधान लक्षणें असावीं लागतात.

यकृतोदर किंवा प्लीहोदर ह्या उदराच्या विकारांत कफप्रधान लक्षणें असतां जलोदरत्व प्राप्त झाल्यानंतरहि ह्या औषधानें कित्येक रोग्यांस जीवदान दिलें आहे. रोग्यांत विशेषतः गुंगी, आळस, पांडुरकी, बद्धकोष्ठता, शौचास झालीच तर त्या-बरोबर आमसंसर्ग चिकट व भसरभसर अशी जाडसर शौचास होणें; तोंड, हात-पाय, पोट यांवर सूज व पांडुरकी हें असून मूत्र त्या मानानें बरेंच जास्त होत राहाणें; ह्या उदरास पुष्कळ दिवसांचा जुनाट हिंवताप, मृद्भक्षण किंवा वारंवार कृमि होण्याची संवय, मलबद्धता, स्निग्ध व जड अन्न खाण्याची संवय किंवा मातेच्या दुधांत विकृति, असलीं निरनिराळीं कारणें असावीं लागतात. मूत्रपिंडाची किंवा हृदयाची विकृति हें उदराचें मूळ कारण असल्यास ह्या औषधाचा उपयोग न केलेला बरा.

मध्यम कोष्ठस्थ शूल हा विकार जुनाट आमसंचयानें उत्पन्न झालेला अस-ल्यास किंवा कफजन्य स्रोतसावरोध यामुळें उत्पन्न झालेला असल्यास एक प्रकारचें बद्धकोष्ठ उत्पन्न होतें व त्यामुळेंच शूल उत्पन्न होतो. हा विकार बहुतेक सारखे बसून राहणारे, ऐदी, स्निग्ध अन्न सेवन करणारे, मांसाहारी अशा लोकांस विशेषें-करून होतो. आंतड्यांतील असल्या मलसंचयामुळें पुरःसरणक्रिया मंदावते आणि शौचास अवरोध होऊं लागतो. पचनक्रिया मंदावते त्यामुळें रसोत्पत्ति नीट होत नाहीं. रसाचें संशोषण नीट होत नाहीं. त्यामुळें रक्तादि धातूंचें नीट पोषण होत नाहीं. त्याचा परिणाम असा होतो कीं पोट वाढतें व बाकीचे अवयव त्या मानानें बारीक होतात. रोगी अगदीं अशक्त, निर्बल असा होऊं लागतो. ह्या अवस्थेंत घोडाचोळीचा उपयोग चांगल्या प्रकारें होतो.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पुस्तकालय गुरुकुल कांगड़ी

कफगुल्म हृया विकारांत घोडाचोळीचा उपयोग झाल्याचीं उदाहरणें पुष्कळ आहेत. गुल्माचा हा विकार वरील कारणांनींच उत्पन्न झालेला व अनूप देशांत राहणाऱ्या रोग्यांत उत्पन्न झालेला असावा लागतो. गुल्माचा आकार मोठा, गुल्म जड व जाड असून रोग्यांत बाकीचीं कफप्रधान लक्षणें असावीं लागतात. वातगुल्माच्या विकारांत याचा उपयोग होत नाहीं.

जुनाट अतिसाराच्या विकारांत सारखें पांढरें भसरट व चिकट असें शौचास होत राहून पोटांत एक प्रकारचा जडपणा वाटत असतो. यामध्यें आंतड्यांची व ग्रहणीची पिच्छात्वचा जाड होऊन तिच्यामधून स्राव वारंवार होत असतो. हा स्राव कफप्रधान दोषांच्यामुळें होत असतो हें उघड आहे. पिच्छात्वचेचा जाडपणा कमी होऊन स्राव कमी झाला तरच हा अतिसार बरा होतो. एरव्हीं स्तंभक—दीपन-पाचनादि सामान्य अतिसारचिकित्सा करीत राहिल्यास हा आजार महिनानुमहिनें लांबत जातो. दोष अत्यंत लीन झालेले असतात, अशा स्थितींत ते बाहेर काढून त्यांचें चांगल्या प्रकारानें निर्हरण करणें जरूर असतें. हें कार्य घोडाचोळीच्या योगानें फार चांगल्या प्रकारानें होतें. केवळ स्तंभक औषधांनीं शल्यरूप संचित झालेले दोष जास्तच स्तंभित होऊन आंत राहातात आणि रोग दिवसानुदिवस जास्तच वाढत जातो. करितां या ठिकाणीं दोषांचें सम्यक् निर्हरण जरूर असतें. हाच न्याय नवीन उत्पन्न होणाऱ्या कफज अतिसारासहि लागू आहे. जुनाट संग्रहणीच्या विकारांत जेथें ग्रहणीस व्रण पडलेले असून त्यांतून पिच्छिल व रक्तयुक्त असा स्राव होत आहे, अशा विकारांत हृया औषधाचा उपयोग न करणें चांगलें. हृया ठिकाणीं दोषसंचय झाला असतां एखादें स्नेहविरेचन किंवा अभयाघृतासारखें घृत द्यावें.

अपतंत्रक व अपतानक हृया वातविकारांत कोष्ठस्थ मलसंचयामुळें वातवृद्धि झालेली असते. रोग्यास एकाएकीं झटके येऊं लागतात. तो बेशुद्ध पडतो. तोंडांतून फेंस येतो. घशांत सारखी घुरघुर चाललेली असते. मलसंचयामुळें पोट दडस होऊन जातें. अधोवातप्रवृत्ति होत नाहीं व कित्येक वेळां त्याबरोबर सारखी वांति होत असते. झटक्यावर झटके येऊन रोगी अगदीं विकळ पडलेला असतो. रोग्याच्या पाठीची कित्येक वेळां कमान होते, इतका झटका जोराचा येतो. हृया विकारांत मलसंचय नाहींसा करून पोटांत उत्पन्न झालेलीं सेंद्रिय विषारें तत्काळ निर्विष बनविणारें औषध पाहिजे असतें. हें औषध घोडाचोळी हें होय.

अपतंत्रकाप्रमाणेंच भूतोन्मादांतहि रोगी बेशुद्ध, विकळ पडलेला असतां आणि रोग्याची छाती, पोट, घसा यांत कफभूयिष्ठ मलसंचय जास्त झाला असतां, रोग्याची संज्ञा नष्ट झालेली, पोटाच्या शिंपेजवळील भाग गच्च फुगलेला, घशांत अतिशय विलक्षण घरघर व प्रत्येक श्वासोच्छ्वासाबरोबर तोंडांतून बुडबुडे व लाळ पडत

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

असतां हें औषध आल्याचा रस व मध यांबरोबर दिल्यानें आश्चर्यकारक रीतीनें उपयोग झाल्याचीं उदाहरणें आहेत.

मूर्छेच्या विकारांत पित्ताचा अनुबंध विशेष असतो, परंतु त्या वेळीं केवळ पित्तशामक अशा औषधांचा उपयोग करण्यापेक्षां पित्तविरेचक औषध देणें जास्त युक्त असतें. त्याबरोबरच रक्ताचा दाबहि कमी होणें जरूर असतें. हें कार्य फार लौकर व्हावें लागतें. पुष्कळ दिवसपर्यंत उपयोग केल्यावर रक्ताचा दाब कमी करण्याचें कार्य, आरोग्यवर्धिनी, चंद्रप्रभा, हीं औषधें करतात; परंतु हें कार्य घोडाचोळीनें तत्काळ लवकर होतें व मूर्छा नाहींशी होते.

यकृताच्या विकारापासून किंवा यकृताच्या क्रियेंत बिघाड झाल्यापासून अंगावर एक प्रकारचे काळे डाग उत्पन्न होतात. कित्येक वेळां त्यावर फोड असतात, चकंदळीं उत्पन्न होतात. हीं अंगापेक्षां वर उचलून आल्यासारखीं असतात. एकंदर बाकीचीं लक्षणें कुष्ठासारखीं भासतात; परंतु त्वचेची सुप्ति व कुष्ठामध्यें सांपडणारे जंतु यांत असत नाहींत. ह्या विकारांत घोडाचोळीचा उपयोग आश्चर्यकारक झालेला आहे.

इतर क्षुद्र कुष्ठें म्हणजे त्वग्रोग यांत उत्पन्न होणारे फोड, चकंदळी, लसीकास्राव, खाज, वगैरे विकारांत हळदीच्या किंवा त्रिफळाच्या काढ्याबरोबर घोडाचोळी दिली असतां चांगला उपयोग होतो.

चातुर्थिक ज्वरांत दोष रसादि धातूंपासून मेद धातूपर्यंत गेलेले असतात. ह्या विकारांत बद्धकोष्ट, प्लीहावृद्धि, मलावरोध हे विकार असून दर चवथे दिवशीं ज्वर येतांना कोष्ठांत जडपणा व छातींत कफसंचय झाल्यासारखें होणें, हीं लक्षणें असून ज्वर पुष्कळ दिवसांपासून येत असतां घोडाचोळीचा अगस्त्याच्या पाल्याच्या रसांत उपयोग करावा. चातुर्थिकाप्रमाणेंच इतर प्रकारच्या विषमज्वरांत तीव्रावस्था नाहींशी होऊन जीर्णावस्था प्राप्त झाली असतां व प्लीहा, अग्निसाद वगैरे लक्षणें त्यांत असून रोग्यास पांडुत्व उत्पन्न झालें असतां घोडाचोळीचा उपयोग करावा.

कोष्ठस्थ मलसंचयामुळें शीर्षशूल व त्याचबरोबर नेत्रशूल व त्याबरोबर आमाशयस्थ कफसंचय असतो. हे शूल फार तीव्र असत नाहींत, व कोष्ठस्थ मलसंचय जास्त असतो; अशा स्थितींत घोडाचोळीचा उपयोग करावा.

शरीरांतील रसग्रंथि यांची वृद्धि व त्याबरोबर कफदोषाचीहि वृद्धि असतां कोष्ठांत बारीक बारीक शूल निघत असतो. कोष्ठांतील ग्रंथी वाढल्यासारख्या होतात, कोष्ठ जड वाटतो. अशा स्थितींत घोडाचोळीचा उपयोग करावा. यांत जसदभस्माचाहि उपयोग होतो; परंतु जसदभस्म देण्याच्या अवस्थेंत अंगाची रसरस, दाह, बारीक ज्वर वगैरे जास्त असून एकंदरींत पित्तवृद्धीचीं लक्षणें जास्त असावीं लागतात. हा या दोहोंत मोठा फरक आहे.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

घोडाचोळीमधील कज्जली–योगवाही, रसायन व जंतुघ्न; जेपाळ–तीव्र-सारक व अनाहादिभेदन; हरिताल–तीक्ष्ण, उष्ण, विकाशी व व्यवायी असून ज्वरघ्न, कफघ्न, रक्तशुद्धिकारक व रसायन आहे; बचनाग–शामक व रक्ताचा दाब कमी करणारा; टांकणखार–वेदनोपशामक आणि कोष्ठांतील घाण कमी करणारा व कफस्रावी; त्रिकटु–उपकारक; त्रिफळा–रसायनी व सारक आणि भाका–रसायन, वाताचे वेग कमी करणारा, आणि कोष्ठस्थ मलसंचयाचें पचन करणारा असा आहे.

[अष्टमूर्तिरसायन अथवा अष्टधातुरसायनः--सिंदूरकल्प पाहा]

८. अश्विनीकुमार

* सुंठ, मिरें, पिंपळी, हिरडा, बेहडा, आंवळकांठी, अफू, बचनाग, पिंपळ-मूळ, लवंग, जयपाळबीं, हरताळ, टांकणखार, गंधक व पारा हीं एक एक तोळा घेऊन अर्धप्रस्थ गाईच्या दुधांत प्रथम त्यांचा खल करावा. नंतर गोमूत्रांत खल करून वाळवावें. नंतर माक्याच्या रसांत खल करून त्याच्या गोळचा अर्ध गुंज प्रमाणाच्या कराव्या. त्यास अश्विनीकुमार असें म्हणतात.

प्रमाणः—अर्धा ते एक गुंज

ग्रंथोक्त गुणधर्मः—

पित्तमेहनाशनो निशायुतोऽश्विनीसुतः ॥
कृच्छ्रनाशनो यवानिकायुतो वरांगने ॥
पुंस्त्वसिद्धये हि माक्षिकान्वितं निषेवयेद् ॥
विश्वभेषजान्वितं निषेवयन्ज्वरं जयेत् ॥

वगैरे ॥ अ० त० ॥

अश्विनीकुमार आमाशय, पक्वाशय व ग्रहणी ह्या स्थानांत दोषसंचय होऊन सेंद्रिय विषारें सांठून उत्पन्न होणाऱ्या निरनिराळ्या विकारांत उपयोगी पडणारें

---

* त्र्यूषणं फलत्रिकं च नागफेनकं विषम् ॥
मागधीजटालवङ्गदन्तिबीजतालकम् ॥
टंकणं च गंधकं रसं पृथक् पिचुं प्रिये ॥
क्षीरमर्द्धप्रस्थकंगवां विशोषयेदये ॥
मूत्रकं गवां विशोष्य भृंगराजनीरकं ॥
शोषयेद्विघर्षयन्निरंतरं विबंधयेत् ॥
वाजिमंत्रसंनिभां वटीमतीवसुंदराम् ॥
अश्विनीकुमार इत्ययं रसो वरांगने ॥ अ. त. ॥

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

औषध आहे. बद्धकोष्ठासारख्या विकारांत याचा उपयोग होत नाहीं. परंतु वर लिहिलेल्या स्थानांत मलसंचय होऊन त्यांपासून आंतील भागांत अव्धातु वाढून त्यांपासून उत्पन्न होणारे विकार ह्या औषधाच्या योगानें बरे होतात. कोष्ठस्थ सेन्द्रिय विषारांचा परिणाम इतर ठिकाणींहि घडून उत्पन्न होणारे प्रमेह,प्रतिश्याय अशा प्रकारचेहि विकार, यांत अश्विनीकुमाराचा उपयोग होतो. यानें कोष्ठांतील सेंद्रिय विषार निर्विष होतें, पचन वाढतें, कोष्ठाला बल प्राप्त होतें, व उत्तानमलसंचय शौचशुद्धिद्वारां बाहेर निघून जातो.

मेहाची आयुर्वेदांतील संप्राप्ति मागें नागभस्म प्रकरणीं दिली आहे. कोष्ठस्थ मलसंचय हें मेहाचें प्रमुख कारण होय. ह्या विकारांत पित्तदोष, विशेषतः त्यांतील द्रवत्व हा धर्म जास्त वाढल्यामुळें उत्पन्न होणाऱ्या मेहांत, म्हणजे कालमेह, नीलमेह, मांजिष्टमेह, हारिद्रमेह ह्या मेहांत मूत्राचा वर्ण काळसर, निळसर, पिवळा किंवा भगवा अशा प्रकारचा असतांना अश्विनीकुमाराचा उपयोग होतो. मूत्राचा वर्ण या प्रकारचा, वारंवार मूत्राची शंका, परंतु मूत्र साफ झालें असें न वाटणें, तहान विशेषतः गार पाणी जास्त प्यावेंसें वाटणें, हातापायांची आग, सर्वांगाचा दाह, अंगाला चिकटा, विशेषतः बगल, बेचकळें यांत चिकटा असून घाण येणें, घाण कुचकट, गंधक जळाल्यासारखी असणें, ह्या विकारांत हळदीबरोबर अश्विनीकुमाराचा उपयोग करावा.

मूत्रकृच्छ्राच्या विकारांत वारंवार लघवीची शंका येऊन आतां पुष्कळ लघवी होईल असें वाटून लघवीस बसावें, वेग येण्याचा प्रयत्न करावा, पुष्कळ कुंथावें, तरीसुद्धां लघवी आल्यासारखी वाटून मूत्रप्रवृत्ति चांगल्या प्रकारें होऊं नये. मूत्रनलिका किंवा गविन्यू यांत दाह, क्षोभ किंवा सूज हीं विशेष नसतां वरीलप्रमाणें लक्षणें असलीं तर अश्विनीकुमार एक बऱ्यापैकीं औषध आहे.

कोष्ठांत मलसंचय होऊन त्यापासून कोष्ठशूल, अतिसार व ज्वर असतां अश्विनीकुमाराचा बऱ्यापैकीं उपयोग होतो. शूल तीव्र, त्रासदायक, पोटांत भोंसकल्याप्रमाणें वेदना होणें, पोटांत कळ निघून मुरडा येऊन वारंवार शौचास जावेंसें वाटणें, व शौचास गेल्यानंतर कुंथून थोडें पाणी, भसर, चोथट असें शौचास होणें, याप्रमाणें त्रास होणें व याचाच परिणाम म्हणून ज्वर; ज्वर फार तीव्र नसणें परंतु तेवढ्याहि ज्वरांत त्रास फार होणें, अशा विकारांत अश्विनीकुमार हें एक बऱ्यापैकीं औषध आहे.

विषमज्वरांतील एकाहिक, त्र्याहिक, चातुर्थिक, अन्येद्युष्क या ज्वरांत पित्तदोषाचें प्राधान्य असतां अश्विनीकुमार रस निरनिराळ्या अनुपानांशीं द्यावा.

यांतील कज्जली—जंतुघ्न व रसायनी; त्र्यूषण—पाचक, दीपक; त्रिफला—रसायनी, मृदुविरेचक; अफू—वेदनाशामक, स्तंभक, मेहनाशक; बचनाग—

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मेहनाशक, ज्वरघ्न; पिंपळमूळ—पाचक व दीपक; लवंग–उत्तेजक; दन्तीबीज–सारक; हरताळ–रसायन, ज्वरघ्न; टांकणखार–आक्षेपघ्न; व माका–वातघ्न अशीं आहेत.

९. आनंदभैरव

* हिंगूळ, बचनाग, सुंठ, मिरें, पिंपळी, टांकणखाराची लाही; गंधक हीं समभाग घेऊन यांचा झांबराच्या रसांत दोन प्रहर खल करावा. हा आनंदभैरव कासश्वास अतिसारांत उपयोगी पडतो. म्हणून यास आनंद भैरव (कासावर) म्हणतात.

‡ हिंगूळ, बचनाग, मिरें, टांकणखाराची लाही, पिंपळी यांचा नुसता खल करावा; असेंहि ग्रंथांत लिहिलेलें आहे. परंतु इंद्रजव किंवा कुडयाच्या सालीच्या काढयांत खल करण्याची वृद्ध वैद्यांची वहिवाट आहे. हा अतिसारावर विशेष उपयोगी म्हणून ह्यास आनंदभैरव (अतिसारावर) म्हणतात.

प्रमाणः—१ ते २ गुंजा.

ग्रंथोक्त गुणधर्मः—

कासश्वासातिसारेषु ग्रहण्यां सान्निपातिके ।
अपस्मारेऽनिले मेहेऽप्यजीर्णे वन्हिमान्द्यके ।।
गुंजामात्रः प्रदातव्यो रस आनंदभैरवः ।। भै. र. ।।
आनंदभैरवस्यास्य गुञ्जातिसार मेहनुत् ।। यो० र० ।।

आनंदभैरव रसाचे निरनिराळे पाठ आहेत. त्यांत द्रव्यतः फरक फक्त दोन पाठांतच आहे. हें टीपेंत दिलेल्या पाठांवरून दिसून येईलच. आनंदभैरव नागगोळ्या, त्रिभुवनकीर्ति, पीयूषादि वटी वगैरे बचनागयुक्त औषधांचा एक वर्गच्या वर्ग आयुर्वेदामध्यें सांपडतो. यांत बचनाग व हिंगूळ हीं मुख्य द्रव्यें असून

---

* हिंगुलं च विषं व्योपं टङ्कणं गंधकं समम् ।
जम्बीररससंयुक्तं मर्दयेद्यामकद्वयम् ।। र. चं. ।।

‡ हिंगुलं वत्सनाभं च मरिचं टङ्कणं कणाम् ।।
मर्दयेत्समभागं च रसो ह्यानंदभैरवः ।।
गुंजैकं वा द्विगुंजं वा बलं ज्ञात्वा प्रयोजयेत् ।
मधुना लेहयेच्चानु कुटजस्य फलं त्वच्चम् ।।
चूर्णितं कर्षमात्रं तु त्रिदोषोत्थातिसारनुत् ।
दध्यन्नं दापयेत् पथ्यं गोघृतं तक्रमेव च ।
पिपासायां जलं शीतं विजया च हिता निशि । र. यो. सा. २९३

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

त्यांजबरोबर इतर निरनिराळ्या द्रव्यांचा संयोग करून निरनिराळ्या दोषसंयोगांत यांचा उपयोग केलेला आहे. ह्या सर्व वर्गांतील औषधांत बचनाग असल्यामुळें यांचा उपयोग बेतानें करावा. ह्या रसाचा उपयोग त्रिभुवनकीर्तिरसाच्या खालोखाल ज्वरहारक व स्वेदल असा होतो. यानें पित्त वाढतें. सबब पित्तज्वरांत हा रस देऊं नये. कफप्रधान ज्वरांत याचा उपयोग करावा. कफज्वरांतहि प्रथम त्याची आमावस्था असतां कांहीं औषध न दिलेलें बरें. त्यावेळीं लंघन करून नंतर हा रस द्यावा. ह्या रसाचा घशांतील व श्वास मार्गांतील पिच्छात्वचेवर परिणाम होऊन तेथील कफाचें संशोषण होतें. याचा उत्तान कफविकारांत उपयोग बरा होतो. सर्वांगाच्या ठिकाणीं जडपणा व ओलसरपणा, ज्वर सरासरी बेताचा, पण त्या मानानें अंगास जडपणा फार, आळस, तोंडाला मधुरपणा, आंग ताठल्यासारखें होणें, पोट लंघन केलें तरीसुद्धां भारावल्यासारखें व नुकतेंच जेवल्याप्रमाणें भरलेलें असणें, सर्वांगास गारवा वाटणें आणि तोंडास सारखी मळमळ सुटणें हीं लक्षणें असतां आनंदभैरव जरूर द्यावा.

कफप्रधान खोकला खवखवलेला, अगोदर पडसें येऊन तें पिकून नंतर मोठमोठे बेडके ज्यांत सुटत आहेत असा खोकला असल्यास त्या ठिकाणीं आनंदभैरव जरूर उपयोगी पडतो. सर्दी व पडसें जास्त येऊन त्यांत खोकला असल्यास आणि त्यांत कफ चांगल्या प्रकारें सुटलेला असल्यास आनंदभैरवाचा उपयोग चांगला होतो. सर्दी व पडसें उत्पन्न झाल्याबरोबर हे नागकल्प देण्याची कांहीं लोकांची वहिवाट आहे; परंतु त्याचा परिणाम पुष्कळ वेळां चांगला न होतां अर्द्धावभेदकादि शिरोरोग उत्पन्न होण्याचा जास्त संभव असतो. नागकल्पांचा महत्त्वाचा धर्म असा आहे कीं, नाक, घसा वगैरे भागांतील पिच्छात्वचेंतून होणारा स्राव यांच्या योगानें शोषला जातो व पिच्छात्वचा कोरडी पडते. परंतु हा स्राव शरीरांतील वाढलेला कफदोष शरीराच्या बाहेर टाकण्याच्या प्रयत्नामुळेंच उत्पन्न झालेला असतो. म्हणून हा (आमावस्थेंत) शरीरांत शोषला जाण्यापेक्षां याचें संशोधन झालेलें बरें आणि म्हणूनच कफ पक्व झाल्यानंतर आनंदभैरवासारख्या औषधांचा उपयोग करावा.

श्वासाच्या विकारांत ज्या ठिकाणीं कफ सुटलेला आहे व कफ पडत आहे, तो इतका कीं कफाचे बेडके पडून पडून त्यामुळें त्रास होतो, अशाच ठिकाणीं फक्त आनंदभैरव उपयोगी पडतो. श्वासाच्या इतर अवस्थांमध्यें या औषधाचा उपयोग होत नाहीं.

कफजन्य अरोचक, अग्निमांद्य व त्यापासून उत्पन्न झालेला अतिसार यांत अन्नाचें पचन न झाल्यामुळें पोटांत जाड्य उत्पन्न होऊन व आंतड्यांतील पिच्छात्वचेचा क्षोभ होऊन त्यांतून सारखा स्राव सुरूं होतो. त्यामुळें अतिसार उत्पन्न होतो. ह्या अतिसाराच्या तीव्रावस्थेंत आनंदभैरवाचा उपयोग होतो. जम्बीर-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

रसाची भावना दिलेल्या आनंदभैरवाचा ह्या ठिकाणीं उपयोग करावा. ह्या प्रकारच्या अतिसाराच्या जीर्णावस्थेंत घोडाचोळी हें औषध जास्त उपयोगी पडतें.

सन्निपातज ग्रहणीच्या विकारांत, विशेषतः कफयुक्त आम जास्त पडत असतां, व कफप्रसेक, जाड्य, अरुचि हीं लक्षणें जास्त असतां आणि ग्रहणीला निमित्त-कारण, अत्यंत गार वाऱ्यांत हिंडणें व इतर शीतोपचार झाले असतां आनंदभैरवाचा उपयोग करावा.

सर्दीपासून किंवा शीतोपचारापासून मध्यमकोष्ठशूल, पोटांत वारा धरणें, शौचास अवरोध व शौचास वारंवार जाण्याची शंका येऊन साफ झालेलें न वाटणें अशा विकारांत आनंदभैरवाचा उपयोग झालेला आहे.

वातज अपस्मारांतहि याचा उपयोग करावा.

आनंदभैरवामध्यें काळ्या बचनागाच्या ऐवजीं पांढरा बचनाग घालून गोळ्या केल्या असतां अच्छमेह, हस्तिमेह वगैरे कफजन्य प्रमेहांत याचा उपयोग होतो. मूत्रांत मधु बिलकूल नसावा, असलाच तर फार कमी प्रमाण असावें. मूत्र वारंवार, प्रत्येक वेळेला प्रमाण पुष्कळ, मूत्रांतील विशिष्ट गुरुत्व पुष्कळच कमी व मधुमेहाचीं तृषा, दाह, चिक्कणता वगैरे लक्षणें नसणें, ह्या स्थितींत आनंदभैरवाचा विशेष उपयोग होतो. त्याबरोबरच अपचनाचींहि लक्षणें प्रामुख्यानें असावीं लागतात. अग्निमांद्य इतकें असतें कीं, थोडेंहि खाल्लें तरी पचन चांगलें होत नाहीं आणि अशा-प्रकारें अपक्व अन्न पक्वाशय, ग्रहणी यांत राहिल्यापासून हा प्रमेहाचा—किंवा मूत्रा-तिसाराचा विकार म्हणणें जास्त समर्पक होईल—विकार उत्पन्न झालेला असतो.

आनंदभैरवांत हिंगूळ हा जंतुघ्न, कफनाशक व पिच्छात्वचेंतील स्राव नियमित करून त्यांतील दोष कमी करणारा; बचनाग—कफस्राव कमी करणारा, अभिष्यंद-नाशक, रक्ताचा दाब नियमित करणारा व स्वेदल; टांकणखार—आक्षेपकनाशक, कफनाशक व जन्तुघ्न; आणि मिरें, पिंपळी—पाचक, दीपक, उत्तेजक अशीं आहेत.

१०. आरोग्यवर्धिनी

‡ पारा, गंधक, लोहभस्म, अभ्रकभस्म, ताम्र हीं द्रव्यें समभाग घेणें. नंतर त्यांत हिरडा, बेहडा, आमलकी दोन दोन भाग, शिलाजतु तीन भाग, शुद्ध गुग्गुळ

‡ रसगंधकलोहाभ्रशुल्वभस्मसमांशकम् ।
त्रिफला द्विगुणा योज्या त्रिगुणं तु शिलाजतु ।।
चतुर्गुणं पुरं शुद्धं चित्रमूलं च तत्समम् ।
तिक्ता सर्वसमा ज्ञेया (देया) सर्वं संचूर्ण्य यत्नतः ।
निंबवृक्षदलांभोभिर्मर्दयेत् द्विदिनावधि ।
ततस्तु गुटिका कार्या क्षुद्रकोलफलोपमाः ।।
मंडलं सेविता सैषा (ह्येषा) ——र. यो. सा. ३२५.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

चार भाग, चित्रकमूलाचें चूर्ण चार भाग व सर्वांच्या बरोबरीनें कुटकीचें चूर्ण घालून कडुनिंबाच्या पाल्याच्या रसांत दोन दिवसपर्यंत सर्वांचा उत्तम प्रकारें खल करावा. (खल चांगला न झाल्यास जास्त खल करावा लागतो. दोन दिवसांतच खल आवरला पाहिजे असें नाहीं.) उत्तम खल झाल्यानंतर लहान बोराएवढ्या गोळ्या तयार कराव्यात.

प्रमाणः--दोन ते सहा गुंजा.

ग्रंथोक्त गुणधर्मः--

मण्डलं सेविता ह्यैषा हन्ति कुष्टान्यशेषतः ।
वातपित्तकफोद्भूतान् ज्वरान् नानाप्रकारजान्
देया पंच दिने जाते ज्वरे रोगे वटी शुभा ।
पाचनी दीपनी पथ्या हृद्या मेदोविनाशिनी ।।
मलशुद्धिकरी नित्यं दुर्धर्षक्षुत्प्रवर्तिनी ।
बहुनात्र किमुक्तेन सर्वरोगेषु शस्यते ।।
आरोग्यवर्धिनी नाम्ना गुटिकेयं प्रकीर्तिता ।
सर्वरोगप्रशमनी श्रीनागार्जुनचोदिता ।। र. यो. सा.

या औषधाच्या नांवावरूनच औषध तयार करणाऱ्याचें ध्येय ध्यानीं येतें. आरोग्य वाढविणारी अशी ही गुटिका श्रीनागार्जुननामक योग्यानें तयार केली.

ह्या गुटिकेचा मुख्य उपयोग कुष्ठ रोगांत होतो. ह्या औषधीच्या गुण पाठांतहि प्रथमतः 'हन्तिकुष्टान्यशेषतः' असें म्हटलें आहे. नानाप्रकारच्या ज्वरांत या गुटिकेचा उपयोग होतो. ही गुटिका पाचनी, दीपनी व पथ्यकारक आहे, हृद्य आहे, मेदाचा नाश करणारी आहे, मलशुद्धिकारक आहे, अत्यंत क्षुधा वाढवणारी आहे, आणि सर्वसामान्यतः सर्व रोगांत ही देतां येण्यासारखी आहे. इतके निरनिराळ्या प्रकारचे गुणधर्म आरोग्यवर्धिनींत आहेत.

वरवर विचार केला असतां एकमेकांपासून विलग दिसणाऱ्या विकारांत आरोग्यवर्धिनी कशी काम करणार असा प्रश्न उत्पन्न होतो. म्हणून याबद्दल थोडं जास्त विस्तारपूर्वक लिहिणें जरूर आहे. कुष्टाची संप्राप्ति आयुर्वेदांत येणेंप्रमाण दिली आहे. "वातादिक ‡तिन्ही दोष अत्यंत दुष्ट होऊन त्वचा, रक्त, मांस हे अंबु (अब्धातु) यांनाहि दुष्ट करतात व कुष्ठ उत्पन्न होतें. येणेंप्रमाणें कुष्ठ व द्रव्यसंग्रहसप्तकानें उत्पन्न होतें. येथें "वातादि" या पदांत वात प्रथम घेतला आहे. त्यानें वातदुष्टी प्रथमतः होते हें ग्रंथकारास सांगावयाचें आहे आणि तीच दुष्टि मुख्य

‡ वातादयस्त्रयो दुष्टास्त्वग्रक्तं मांसमम्बु च ।
दूषयंति स कुष्ठानां सप्तके द्रव्यसंग्रहः ।। मा. नि ।।

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

होय. नंतर इतर दोष दुष्ट होऊन त्वचा, नंतर रक्त, मांस व अब्धातु हलके हलके दुष्ट होऊन कुष्ठ रोग निर्माण होतो.

ह्या संप्राप्तीकडे आधुनिक दृष्टीनें पाहिलें असतां ही संप्राप्ति फारच समर्पकपणें दिली असल्याचें दिसून येतें. महाकुष्ठें सात व क्षुद्र कुष्ठें अकरा हीं सर्व ग्रहणी दुष्ट झाल्यानें उत्पन्न होतात. ग्रहणी बरोबर कार्य करीत नसल्यानें तिच्यांत मलावरोध होतो. मलावरोधामुळें ग्रहणी व पक्वाशय यांतील वायु दुष्ट होतो. त्याचप्रमाणें पचनार्थ जरूर असलेलें पित्तहि विकृत होतें, ग्रहणींतील अंत:पुर:सरणक्रिया व्यवस्थित चालून तिच्यामधील मलादि द्रव्यें पुढें पुढें सरकण्यास मदत करणारीं कफद्रव्येंसुद्धां विकृत होतात. त्या विकृतीपासून ग्रहणींत सेंद्रिय विषारें निर्माण होतात. हीं विषारें तेथून तशींच अंतस्त्वचा व रक्तमांसादि धातूंत शोषलीं जातात किंवा हीं विषारें अगदीं सूक्ष्म परिमाणूंत शोषलीं जाऊन त्यांच्यांत दुष्टी उत्पन्न करून नंतर धातूंत दुष्टी उत्पन्न करतात. एवंच, वातादि दोष अशा प्रकारें कुष्ठ उत्पन्न करतात. ग्रहणी व पक्वाशय हें वाताच्या अनेक स्थानांपैकीं प्रमुख स्थान होय. ह्याच ठिकाणीं वाताची दुष्टि होते व नंतर ती हळूंहळू सर्व शरीरभर पसरते.

आरोग्यवर्धिनीची एकंदर रचना ग्रहणी व पक्वाशयांतील विकृति नष्ट करणारी आहे. ग्रहणी व पक्वाशयांतील स्वयंदुष्टीमुळें उत्पन्न झालेलीं सेंद्रिय विषारें, यांमुळें कुष्ठ उत्पन्न होतें आणि म्हणून आरोग्यवर्धिनीचा कुष्ठांत उपयोग होतो. कुष्ठाच्या गलत्कुष्ठावस्थेंत रोगी गेल्यास मात्र या औषधाचा उपयोग होत नाहीं. अगदीं प्रारंभीं याची योजना केल्यास फा लवकर व खात्रीनें उपयोग होतो. औषध देत असतां केवळ दुग्धाहारावर रोगी ठेवावा, म्हणजे औषधांत चांगली मदत होते. आरोग्यवर्धिनी देत असतां बस्तीचाहि उपयोग करावा. प्रथम कांहीं दिवस नुसतें जलप्राशन करून राहिल्यास दुग्धाहारापेक्षांहि जास्त मदत होते. आरोग्यवर्धिनीचा उपयोग सर्व कुष्ठांत तर होतोच; परंतु विशेषत: वातप्रधान व वातकफप्रधान कुष्ठांत व कपाल, मंडल, एककुष्ठ, किटिम, विपादिका, चर्मदल व अलसक या कुष्ठांत हिचा विशेष उपयोग होतो. कुष्ठांत हरितालभस्म विशेष उपयोगी पडतें. परंतु बद्धकोष्ठ, अग्निमांद्य, मूत्रावरोध वगैरे लक्षणें जास्त असतां हरितालभस्माचा उपयोग होत नाहीं.

अंगावर विवर्ण चट्टे, ते खरखरीत व रुक्ष, त्वचेचें स्पर्शज्ञान नाहींसें होणें, वारंवार रोमांच उत्पन्न होणें व घाम फार येणें हीं त्वग्दुष्टीचीं लक्षणें होत. ह्या अवस्थेंत चट्टे अतिशय लाल व पिकलेल्या उंबराच्या फलाप्रमाणें उचलून आल्यासारखे असतील तर आरोग्यवर्धिनीचा कांहीं उपयोग होणार नाहीं. भयंकर खाज, खाजवल्या ठिकाणीं चट्टा उत्पन्न होणें व त्यांत पू होणें हीं लक्षणें असतां आरोग्यवर्धिनी, रक्तदोषांतक कल्प किंवा मंजिष्ठादि कषाय यांबरोबर दिली असतां

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

बऱ्यापैकीं उपयोग होतो. चट्टे टणक,तोंडाला भयंकर कोरड, चट्टयाच्या ठिकाणची मृदुता जाऊन खपल्या धरल्याप्रमाणें होणें किंवा फुटल्याप्रमाणें कडकपणा येणें, त्यावर पुळचा उठणें, सुया टोंचल्याप्रमाणें किंवा फुटल्याप्रमाणें वेदना होणें आणि चट्टे घट्ट खिळल्यासारखें लागणें हीं लक्षणें असतां आरोग्यवर्धिनी हळदीच्या काढ्या-बरोबर किंवा दुधाबरोबर द्यावी. ह्या अवस्थेंत आरोग्यवर्धिनी दिली असतां बरा उपयोग होतो. हीं सर्व लक्षणें मांसस्थित दोषांचीं आहेत. ह्याच्या पुढील कुष्ठाच्या अवस्थेंत औषधांचा कांहीं उपयोग होत नाहीं.

वातपित्तकफोद्भूत नानाप्रकारच्या ज्वरांत या गुटिकेचा उपयोग होतो. ह्या ठिकाणीं प्रत्येक दोषज निरनिराळा ज्वर घ्यावयाचा. संसर्गज किंवा सान्नि-पातिक ज्वर ह्या ठिकाणीं विवक्षित नाहीं. म्हणजे संततादि संसर्गी ज्वरांत किंवा सान्निपातिक आंत्रिकादि ज्वरांत ह्या गुटिकेचा उपयोग होत नाहीं हें स्पष्ट झालें. केवळ वातदोषाच्या दुष्टीपासून उत्पन्न झालेला, केवळ पित्तदोषाच्या दुष्टीपासून उत्पन्न झालेला किंवा केवळ कफदोषाच्या विकृतीपासून उत्पन्न झालेला ज्वर या गुटिकेनें नाहींसा होतो. हे दोष इतर स्थूलधातुगत झाले असतां जे नानाप्रकारचे ज्वर उत्पन्न झालेले असतात त्यांतसुद्धां ही गुटिका उपयोगी पडते.

आरोग्यवर्धिनीचें कार्य विशेषत: ग्रहणीशोधक व सेंद्रियविषारनाशक होत असल्यानें ग्रहणींतील किंवा सर्वच्या सर्व मध्यम कोष्ठांतील दोषांपासून उत्पन्न होणाऱ्या अनियमित ज्वरांत या गुटिकेचा चांगला उपयोग होतो. बद्धकोष्ठजन्य ज्वर, अप-चनापासून उत्पन्न होणारा ज्वर, पुष्कळ दिवस सारखा वारंवार उलटून येणारा ज्वर, व पित्ताच्या वैषम्यापासून उत्पन्न होणारा ज्वर यांत ही गुटिका द्यावी.

वारंवार तोंडास पाणी सुटणें, फेंसयुक्त गोडसर वांति होणें, पोटांत जाड्य, भूक न लागणें, जेवणानंतर लागलीच वांति होणें, खोकला, पांढरा चिकट बेडका पडणें, हीं लक्षणें असून मलमूत्रोत्सर्ग बरोबर होत नसल्यास आरोग्यवर्धिनी द्यावी.

ही गुटिका पाचनी म्हणजे मलादिकांचें पचन घडवून आणणारी अर्थात् त्यापैकीं जेवढा अंश पुन्हां रूपांतरित करितां येण्यासारखा असतो तेवढ्याचें योग्य रूपांतर करविणारी आहे. याचा अर्थ असा कीं, ग्रहणी व पक्वाशय यांत पुष्कळसा अन्नांश अपक्व असा पडून असतो. मध्यम ग्रहणींत तर किट्ट व थोडा सार भाग किती तरी पडलेला असतो. त्यांपैकीं जितका उपयोगी पडण्यासारखा भाग तित-क्याचें चांगलें रूपांतर होऊन संशोषण होणें जरूर असतें. तसेंच बाकीचा किट्ट भाग शरीराबाहेर लवकर फेंकणेंहि जरूर असतें. किट्ट शरीराबाहेर लवकर जावें म्हणून हल्लीं स्निग्ध विरेचनांचा उपयोग करण्यांत येतो; परंतु त्यांचा इष्ट परिणाम लवकर घडत नाहीं. आरोग्यवर्धिनी व त्रिफळाहिम यांचा उपयोग असल्या

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

परिस्थितींत फार चांगला होतो. विशेषतः जुनाट बद्धकोष्ठांत मध्यम ग्रहणींत जाड्य असून मलसंचय फार झालेला असतां वरील कल्प उपयोगी पडतो.

ही गुटिका दीपनी म्हणजे पाचक रस उत्तम प्रकारें व योग्य प्रमाणांत उत्पन्न करणारी आहे. पाचकादि पित्तांचें प्रमाण कमी पडलें किंवा त्यांतील पाचकांश कमी झाला असतां अपचन किंवा अजीर्ण उत्पन्न होतें. हा विकार हल्लीं फार वाढला आहे. ह्या विकारांत पाचक म्हणून आंबट औषधांचा उपयोग केला जातो. परंतु याचा परिणाम तात्पुरता होतो. हा आजार असल्या औषधांनीं कायमचा बरा होत नाहीं व निरोगी भूकहि लागत नाहीं. आरोग्यवर्धिनीचें कार्य प्रसादधातूंवर त्यांतील वैषम्य नाहीसें करण्याकडे होत असल्यानें ते ते धातू सकस बनतात, त्यांत शक्ति येते, आणि ते जास्त कार्यक्षम होतात. त्या त्या प्रसाद धातूंच्या क्रियेवर ज्या निरनिराळ्या रसांचें प्रमाण अवलंबून आहे ते ते रस सम्यक् धातुकार्यामुळें चांगले उत्पन्न होतात, व कार्यहि उत्तम प्रकारचें होऊं लागतें. अशा प्रकारचें आरोग्यवर्धिनीनें जें दीपनकार्य होतें तें कायम स्वरूपाचें असतें. शिवाय हें दीपन केवळ पाचकाख्य रसापुरतें नसून इतर स्थूल धातूंतील पूर्वधातूपासून परधातू. निर्माण होण्याच्या रूपांतर क्रियेस कारणीभूत जो धात्वंतरगत अग्नि, त्याच्या बाबतींतही आरोग्यवर्धिनीचें दीपनकार्य दिसून येतें.

पथ्यकारक याचा अर्थ हितकारक.

आरोग्यवर्धिनी हृद्य आहे. 'हृद्य' ह्या शब्दाचे आयुर्वेदांत दोन अर्थ आहेत. हृद्य म्हणजे हृदयास हितकारक, व हृद्य म्हणजे मनास आवडणारें किंवा मनाला हर्ष देणारें. परंतु गुणधर्मशास्त्रांत हा दुसरा अर्थ विवक्षित नाहीं. हृदयास हितकारक हाच अर्थ येथें विवक्षित आहे. आरोग्यवर्धिनीचें कार्य हृदयाच्या दुर्बलतेंत चांगलें होतें. हृदिंद्रियास स्पष्ट विकृति असल्यास या गुटिकेचा उपयोग झालेला आढळला नाहीं. परंतु हृदयाच्या अशक्ततेमुळें सूज आलेली असतां सुद्धां आरोग्यवर्धिनीचा उपयोग झालेला आहे. आरोग्यवर्धिनीचा हृद्य परिणाम जुनाट अवस्थेंत दिसून येतो. लक्ष्मीविलास गुटि, समीरपन्नग किंवा सूतशेखर यांच्याप्रमाणें तीव्र विकारांत हृदयास उत्तेजन देऊन हृद्यता उत्पन्न करणें हें आरोग्यवर्धिनीनें घडून येत नाहीं. तर जुनाट सर्वांगशोफासारख्या विकारांत हिचा उपयोग होतो. सर्वांगशोफांत हृदयास शक्ति देणें व मूत्रमार्गें जलांश काढून टाकणें हीं दोन्हीं कार्यें आरोग्यवर्धिनीच्या योगें घडून येतात.

पांडुरोगांतहि आरोग्यवर्धिनीचें हृद्य कार्य दिसून येतें; यकृतवृद्धींत हृदय अशक्त झाल्यास आरोग्यवर्धिनी द्यावी.

मेदोवृद्धि दोन प्रकारांनीं होते; रुधिरवाहिन्यांच्या ठिकाणीं ठिसूळपणा येऊन रक्तांतील जोम कमी झाल्यामुळें मेद जास्त उत्पन्न होतो व निकंठमणी कमजोर

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

झाल्यामुळें पचनव्यापार कमजोर होऊन मेद उत्पन्न होतो. आयुर्वेदांतील उपपत्तीप्रमाणें मेदापर्यंतचे धातू, धातुक्रियेच्या योगें बनत जाऊन मेद प्रमाणापेक्षां जास्त बनून सांठतो. त्यामुळें मनुष्य अगदीं अशक्त बनतो. आरोग्यवर्धिनीनें मेदोविनाशक कार्य होतें. हें कार्य पाचनदीपनादि व्यापार चांगल्या प्रकारें वाढवून होतें. त्याचप्रमाणें आरोग्यवर्धिनीनें मेदाचें रूपांतर होऊं लागून इतर धातूहि उत्तम प्रकारें बनण्यास मदत होते.

मलशुद्धि व विरेचन यांत पुष्कळ फरक आहे हें स्पष्ट आहे. विरेचन कर्माचा परिणाम तात्पुरता व तीव्र स्वरूपाचा असतो. त्यामुळें उदरादि रोग्यासारख्या, किंवा शिरःशूल–जाड्य–स्पंदादि तीव्र रोगांत जेव्हां तावडतोब मध्यम कोष्टशुद्धि होणें जरूर असतें, तेव्हां विरेचनाचा उपयोग करणें जरूरच असतें. परंतु असला तीव्र विकार नसतां निद्रानाशादिकासारखा चिरविकार असतां तीव्र विरेचनें उपयोगी पडत नाहींत. कांहीं विकार असे चमत्कारिक व दीर्घद्वेषी असतात कीं, कांहीं लिहावयाची सोय नाहीं. रोग्यास भयंकर त्रास होतच असतो, परंतु काय होतें हें उघड करून सांगावें तर तसें स्पष्ट व उघड असें विशेष कांहीं होत नसतें. आंग कसकसतें परंतु स्पष्ट ज्वर नसतो. काम करावेंच लागतें, परंतु उत्साह नसतो जेवावेंच लागतें, परंतु भूक लागून चवीनें जेवण जात नसतें. कसलेंहि रुचकर आणि स्वादिष्ट अन्न पुढें आलें तरी त्याची चव वाटत नाहीं. हंसणें, मजा करणें हें सुद्धां चालतें, परंतु मनापासून आवडून नव्हे, तर केवळ देहधर्म म्हणून चालू असतें. शरीर फिक्कट, सुकट, तेजोरहित, निरुत्साही, इतकेंच नव्हे तर स्वतःला भारभूत असें असतें. हीं सर्व लक्षणें कमीअधिक प्रमाणानें मलावरोधापासून उत्पन्न होतात. मलावरोधास कारणें अनेक असूं शकतील; असल्या विकारांत विरेचनांचा कांहींहि उपयोग होत नाहीं, उलट त्यांमुळें अपाय मात्र होतो.

मलावरोधाच्या अनेक प्रकारांपैकीं ग्रहणींत मलसंचय होऊन पुटेंचीं पुटें बसून मलावरोध होणें व ग्रहणींत मलांतील सेंद्रिय विषारें नासून शोषलीं जाऊन ग्रहणीचा भाग ठिसूळ बनणें, त्यांतील नवटपणा किंवा कार्यकारित्व कमी होणें हे दोन प्रकार फारच त्रासदायक होत. या प्रकारांत विरेचक औषधें उपयोगी पडत नाहींत. बस्ति देणें फार उत्तम होय. एकीकडे बस्तींचा उपयोग करावा, आणि पोटांत आरोग्यवर्धिनी गुटिका द्यावी. आरोग्यवर्धिनीच्या योगें मलाचीं पुटें सुटण्यास मदत होते. मलाच्या खपल्यांच्या आड संचित झालेलीं विषारें निर्विष बनतात; आणि ग्रहणींत कार्यक्षमत्व प्राप्त होऊन नवटपणा येतो. आरोग्यवर्धिनीबरोबर त्रिफळा किंवा असलें संशोधनीय औषध द्यावें.

मलावरोधाची संवय नष्ट करून मलशुद्धि करणें हा एक प्रकार झाला. दुसऱ्या प्रकारच्या मलांचें संशोधन करण्याचाहि आरोग्यवर्धिनीचा धर्म आहे. दातांच्या

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

ठिकाणीं सांठलेला मल, नाकांत सांठणारी घाण किंवा किटण हीं संचित होण्याची शरीरास संवय लागल्यास तोंडाची घाण येणें, नाक चोंदणें, दांतावर ठिसूळ कपऱ्या येणें वगैरे लक्षणें होतात. आरोग्यवर्धिनीचा या विकारांत उपयोग होतो.

दंतव्रण ह्या विकारांत वातकफप्रधान लक्षणें असतां, आरोग्यवर्धिनीचा उपयोग झालेला आहे.

पुरुषजननेंद्रियाच्या भोंवतीं मण्यावर व कातडीच्या खालीं नेहमींच एक प्रकारची ओषट व घाणकट बुरशी सांचते. कांहीं कांहीं लोकांत ही बुरशी फार सांचते व तिला अतिशय कुचकट घाण येते. पुरुषजननेंद्रियाप्रमाणें स्त्री–जननेंद्रियासहि अशीच घाण येते. अंगाची, बगलेची, जांघाडाची, बेचकळांची अशीच कांहीं कांहीं लोकांत कुचकट घाण येते. हीं सर्व लक्षणें त्या त्या ठिकाणीं विकृत मलसंचयाचीं होत. ह्या सर्व विकारांत आरोग्यवर्धिनीचा फार चांगला उपयोग होतो. त्याचप्रमाणें इतर धातूंच्या ठिकाणीं मलसंचय होत असल्यास आरोग्यवर्धिनीचा उपयोग करावा.

अग्निमांद्य झाल्यामुळें क्षुधा लागत नसल्यास आरोग्यवर्धिनीचा उपयोग करावा. आरोग्यवर्धिनीसारखीं प्रभावशाली औषधें वापरणारा कुशल असल्यास पुष्कळच निरनिराळ्या रोगांत त्यांचा प्रभाव दिसून येतो यांत संशय नाहीं. आणि केवळ याच दृष्टीनें ह्या औषधीच्या गुणपाठांत शेवटीं जो श्लोक दिला आहे तो पाहावा. आरोग्यवर्धिनीचा उपयोग सर्व रोगांत होतो हें वचन शास्त्रीय दृष्टीनें सुसंगत वाटत नाहीं, परंतु वरील दृष्टीनें या वचनाकडे पाहिलें असतां नीट उलगडा होतो.

निकंठमणि विकृत झाल्यामुळें शरीराची वाढ खुंटते. सर्वांग एकाद्या डुरकुल्या वांग्यासारखें आकसून गेल्यासारखें दिसतें. बोटें जाडसर, पाय आंखूड, लठ्ठ व बेडौल, सर्व शरीराची वाढ खुंटल्यासारखी, त्यामुळें स्त्री–पुरुषांच्या शरीराची पूर्ण वाढ झाल्यावर 'पणांत' आल्याचीं चिन्हें त्यावर दिसत असतात तीं न दिसणें इत्यादि लक्षणें असतां आरोग्यवर्धिनीचा उपयोग झालेला आहे.

सर्वांगशोफ, विशेषतः निकंठमण्याच्या विकृतीपासून उत्पन्न झालेला असल्यास, त्याला विशेष प्रकारची छटा असते. शोफ जाडसर असतो. सूज तोंड, गळा, हातापायांच्या नडग्या यांवर विशेष असते. भूक मंदावते. नाडी मंदावते व सर्व शरीराचे एकंदर व्यापार मंदावलेले असतात. ह्या विकारांत आरोग्यवर्धिनी द्यावी.

जलोदराच्या विकारांत मूत्रल व मलशुद्धिकर म्हणून या गुटिकेचा उपयोग झाल्याचीं उदाहरणें आहेत.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मूत्रपिंडाच्या विकृतीपासून उत्पन्न झालेला सर्वांगशोफ या विकाराच्या तीव्रावस्थेंत पुनर्नवा, सारिवा व रेचक क्षारमिश्रणें, तीव्र मूत्रल औषधें वगैरे देतां येतात; परंतु तीव्रावस्था निवून गेल्यावर मात्र पुढें चंद्रप्रभा, ताप्यादि व आरोग्यवर्धिनी गुटिका देण्याची वेळ येते. या विकारांत बद्धकोष्ठ व अपचन हीं प्रमुख लक्षणें असतां आरोग्यवर्धिनीचा उपयोग करावा.

प्रमेहाच्या विकारांत अपचन व बद्धकोष्ठ हीं प्रमुख कारणें किंवा प्रमेहांतील प्रमुख लक्षणांपैकीं लक्षणें असतां आरोग्यवर्धिनीचा या प्रमेहांत जरूर उपयोग करावा.

बद्धकोष्ठाचा परिणाम आमाशयावर व पक्वाशयावर तर होतोच; परंतु पुष्कळ वेळां फुफ्फुसांवरहि त्याचा परिणाम घडतो. बद्धकोष्ठामुळें शौचास न झाल्यानें मोठें आंतडें फुगून आणि ग्रहणींत उत्पन्न झालेल्या सेंद्रिय विषारांमुळें, वातविकृति उत्पन्न होते व त्यामुळें श्वासासारखा विकार उत्पन्न होतो. श्वासाच्या ह्या प्रकारांत आरोग्यवर्धिनीचा उपयोग झालेला आहे. अत्यंत त्रासदायक बद्धकोष्ठ व त्याबरोबर तितकाच त्रासदायक श्वास, या जोडीला आरोग्यवर्धिनी हेंच उत्तम औषध आहे. श्वासकुठार, समीरपन्नग यांचा असल्या विकारांत कांहीं उपयोग होत नाहीं.

आरोग्यवर्धिनींत मुख्य औषधें लोह, अभ्रक, ताम्र, शिलाजतु, गुग्गुळ, चित्रक व कुटकी हीं होत. उपकारक किंवा गुणवर्धक औषधें–त्रिफळा, पारा–गंधक (कज्जली), निंबवृक्षाच्या पानांचा रस हीं होत. आरोग्यवर्धिनीची एकंदर रचना ग्रहणी व पक्वाशयांतील विकृति (स्वयंदुष्टिजन्य) नष्ट करणारी आहे. गुग्गुळ व शिलाजतु यांचा उपयोग सेंद्रिय विषारें रूपांतरित करून निर्विष किंवा अनपायी करण्याचा आहे. हीं दोन्ही औषधें वातदुष्टि नाहींशीं करणारीं आहेत. चित्रक तीव्र पाचक आहे, पित्ताचा तीक्ष्ण गुण वाढविणारें आहे; आपल्या तीक्ष्णोष्णादि गुणांनीं वाताचें शमन करणारें आहे. कडुनिंब व कुटकी यकृत्पित्ताचा उत्तम प्रकारें स्राव करणारीं आहेत. त्रिफला रसायनी असून आंतड्यांत संचित झालेल्या दुष्ट कफ व पित्तांचा विरेक करविणारी आहे. आंत्रांत उत्पन्न झालेल्या जंतूंचा नाश गंधक व पारदानें होतो. लोह, अभ्रक व ताम्रभस्म हीं बल्य व रसायन आहेत. ताम्रभस्माचा विशेष उपयोग यकृत्पित्ताचा स्राव योग्य प्रमाणांत उत्पन्न होणें हा आहे. अशा एकंदर औषधांच्या समुच्चयानें बद्धकोष्ठ किंवा कोष्ठगत वातनाशक, पाचक, दीपक, मूत्रल, आमपाचन, हृद्य, आंतड्यांतील सेंद्रिय विषघ्न व जन्तुघ्न असा परिणाम घडतो. त्यामुळें हें औषध मध्यकोष्ठांतर्गत वातप्रधान कफभूयिष्ठ क्षीणपित्त दोषांत उपयोगी असून शोथघ्न, मूत्रल, वातानुलोमक, पित्ताचा योग्य प्रमाणांत स्राव करविणारें, कोष्ठगतवातशामक, सेंद्रिय विषारें व गरनाशक असें आहे. कुष्ठ, विषमज्वर, अपचन, जुनाट बद्धकोष्ठ, हृदयाची अशक्तता, मेदोरोग, मलसंचय,

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मलाची व अंगाची घाण येणें, अग्निमांद्य, सर्वांगशोफ, प्रमेह व श्वास या विशेष रोगांत आरोग्यवर्धिनी उपयोगी पडते.

गर्भिणी, उद्रिक्तपित्त असलेला रोगी, दाह, मोह, तृषा, भ्रम या विकारांत आरोग्यवर्धिनी देऊं नये.

११. इच्छाभेदी रस

* सुंठ, मिरें, पारा, गंधक व टांकणखाराची लाही हीं समभाग घेऊन तीन भाग जेपाळ घेऊन सर्वांचा लिंबाच्या रसांत एकत्र खल करावा व दोन गुंजा प्रमाणाच्या गोळ्या कराव्या.

प्रमाण:—एक ते तीन गुंजा.

ग्रंथोक्त गुणधर्म:—

शूलव्याधिप्रभृतयः कुष्ठैकादशपित्तजाः ॥
भगन्दरादिहृद्रोगाः सर्वे नश्यन्ति भक्षणात् ॥ र. चं. ॥

इच्छाभेदी रसाचे वाङ्मयांत सरासरी अठरा पाठ सांपडतात. पैकीं आम्ही वापरीत असलेला पाठ वर दिला आहे, व त्याचेच गुणधर्म खालीं दिले आहेत. हें औषध अत्यंत तीव्र विरेचक आहे. जलोदरांत, विशेषतः कफप्रधान जलोदरांत, विरेचनें देऊन उदरांत संचित झालेलें पाणी बाहेर काढून टाकण्याची ज्या वेळीं आवश्यकता असते, त्या वेळीं ह्या औषधाचा उपयोग करावा.

तीव्र स्वरूपाचा व पिष्टमय पदार्थ खाल्ल्यापासून उत्पन्न झालेला आनाह व आध्मान असल्यास मलशोधन म्हणून व तीव्र विरेचक म्हणून इच्छाभेदीचा चांगला उपयोग होतो. आध्मानाची जुनाट अवस्था अथवा आध्मान वारंवार होण्याची संवय असल्यास मात्र इच्छाभेदीसारखें तीव्र औषध देऊं नये. मलसंचय जास्त

---

*(१) शुंठीमरिचसंयुक्ता रसगंधकटंकणाः ॥
जेपालस्त्रिगुणः प्रोक्तः सर्वमेकत्र मर्दितम् ॥ यो. र. ॥
यावच्च चूलकाः पीतास्तावद्वेगैर्विरिच्यते ।
तक्रौदनं च दातव्यं पथ्यमत्र विजानता ॥ यो. र. ॥

(२) तुल्यं टंकणपारदं समरिचं तुल्याशकं गन्धकम् ।
विश्वा च द्विगुणा ततो नवगुणं जैपाल चूर्णं क्षिपेत् ॥ र. चं. ॥
गुंजैकप्रमितो रसो हिमजलैः संसेवितो रेचयेत् ।
यावन्नोष्ण जलं पिबेदपिवरं पथ्यञ्च दध्योदनम् ॥

(३) जपालाष्टौ द्विको गन्धस्त्रिशुण्ठि मरिचं द्विकम् ॥
एकः सूतः सोहगेका गुञ्जामात्रा वटी कृता ॥ र. चं. ॥

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

होऊन किंवा मलाचे खडे बनून उत्पन्न झालेला शूल यांत प्रथमतः स्नेहन करून नंतर इच्छाभेदीचें विरेचन द्यावें.

अपतानक, अपतंत्रक व आक्षेपक ह्या वातविकारांत कफानुबंध असतां कोष्ठशुद्धि व कफानें संरुद्ध झालेलीं स्रोतसें शुद्ध व्हावींत म्हणून विरेचन देणें जरूर असतें. हें विरेचन तीव्र स्वरूपाचें असावें लागतें. इच्छाभेदीनें हें कार्य चांगल्या रीतीनें होतें.

स्थूलग्रहणीमध्यें मलसंचय अतिशय झाल्याच्या योगानें सर्व ग्रहणी विकृत होते. त्यांत निरनिराळीं सेंद्रिय विषारें निर्माण होतात. तीं बरींच तीव्र स्वरूपाचीं असतात. तेथून तीं सर्व शरीरभर शोषलीं जातात. ह्यामुळें रसरक्तादि धातु विकृत होऊन कुष्ठासारखे रोग निर्माण होतात. निश्चित कुष्ठरोग व मलसंचयापासून निर्माण झालेला तत्सदृश रोग यांत संप्राप्ति व लक्षणें यांच्या दृष्टीनें पुष्कळच फरक असतो. ह्या रोगांत सर्वांगावर एकदम मोठमोठ्या गांधी निर्माण होतात; चट्टे उत्पन्न होतात; खाज सुटते; ते चट्टे काळे किंवा तांबडे असतात. असल्या विकारांत इच्छाभेदी रसाचा, चांगले जुलाब होऊन, उत्तम उपयोग होतो.

उचकीच्या विकारांत आमाशयांत पित्त किंवा कफसंचय खूप झालेला असल्यास आणि वारंवार उचकीचा विलक्षण त्रास होत असल्यास, वमन विरेचन देऊन, आमाशयशुद्धि करणें फार जरूरीचें असतें. इच्छाभेदी रसानें चांगल्या प्रकारें वमन होऊन विरेचनहि होतें.

विरुद्धाशन, अध्यशन किंवा गर यांपासून सारखी उचकी लागत असल्यास किंवा वांति होत असल्यास कोष्ठशुद्धि करणें फार जरूरीचें असतें. इच्छाभेदी रसानें कोष्ठशुद्धि तर होतेच, परंतु गरहि नष्ट होतें.

इच्छाभेदी रस तीव्र रेचक, कफावृतवातनाशक, शूलघ्न, गरघ्न असून ग्रहणींतील सेंद्रिय विषारांचें संशोधन करणारा आहे. यांतील कज्जली–योगवाहि व रसायन आहे; जेपाळ–तीव्र रेचक आहे; टांकणखाराची लाही–आक्षेपकघ्न व शूलघ्न आणि सुंठ व मिरें–पाचक, दीपक, आणि जेपाळाच्या योगानें उत्पन्न होणारी मळमळ कमी करणारीं आहेत.

१२. उदरारि रस

* पारा, शौक्तिक भस्म, शुद्ध मोरचूत, जेपाळाचें बीज, पिंपळी, बहाव्याच्या शेंगेंतील मगज हीं सगळीं एक एक भाग घेऊन सर्वांचा त्रिधारी निवडुंगाच्या चिकांत खल करावा.

---

* पारदं शुक्तितुत्थं च जैपालं पिप्पलीसमम् ।
आरग्वधफलान्मज्जा वज्रीक्षीरेणमर्दयेत् ॥

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

प्रमाणः—चार ते आठ गुंजा. अनुपान चिंचेचा कोळ किंवा अम्ल पेयें.

उदरारि रसाचे सात पाठ वाङमयांत सांपडतात. त्यांपैकीं वर दिलेला पाठ जास्त सुटसुटीत व कार्यकारी आहे. त्याचा उपयोग मुख्यतः यकृत्वृद्धीपासून उत्पन्न झालेले किंवा प्लीहावृद्धीपासून उत्पन्न झालेले व कफज जलोदर ह्यांत विशेष होतो. त्याबरोबर कोष्ठशूल व मलावरोध हीं लक्षणें जास्त तीव्र असतां उदरारि रस द्यावा.

यकृतवृद्धीपासून सर्वांगशोफ उत्पन्न झाल्यास आणि त्यांत मूत्रपिंडाची किंवा हृदयाची विकृति विशेषेंकरून नसल्यास सर्वांगास पिंवळेपणा, तोंडावर, हातापायांवर टापसा, मूत्र पिंवळें हीं लक्षणें असून मलावरोध अत्यंत तीव्र स्वरूपाचा असल्यास उदरारि रसाची योजना करावी.

याच्यांतील पारा–योगवाही, रसायन व जंतुघ्न; शौक्तिक–पाचक व दीपक; भोरचूत–यकृत्पित्तस्रावी, यकृद्वृद्धिनाशक व क्षरण करणारा; जेपाळाचें बीं–तीव्र रेचक व पाण्यासारखे मोठमोठाले जुलाब करवणारें; पिंपळी–रसायनी व पाचक; बहाव्याचा मगज–उपकारक, सारक व पित्तघ्न; निवडुंगाचा चीक–शोथघ्न, रेचक असे आहेत.

१३. उन्मादगजकेसरी

‡ शुद्ध पारा, गंधक, मनशीळ हीं तिन्ही समभाग आणि ह्या तिन्हींच्या बरोबर धोतऱ्याचें बीं ह्या सर्वांचें बारीक चूर्ण करून त्यास वेखंडाच्या अगरतीच्या पाल्याच्या रसाच्या व ब्राह्मीच्या रसाच्या सात सात भावना द्याव्या, म्हणजे उन्मादगजकेसरी रस सिद्ध होतो.

प्रमाणः—आर्धी ते एक गुंज.

ग्रंथोक्तगुणधर्मः—

अस्य माषः सर्सपिष्को लीढो हन्ति हठाद्गदम् ।
उन्मादाख्यमपस्मारं भूतोन्मादमपि ज्वरम् ।। यो. र. ।।

माषमात्रा वटीं खादेत्स्त्रीणां हन्ति जलोदरम् ।
चिञ्चाफलरसञ्चानु पथ्यं दध्योदनं हितम् ।।
दृकोदरहरश्चैव तीव्रेण रेचनेन च ।। र. चं. ।।

‡ सूतगंधशिलातुल्यं स्वर्णबीजं विचूर्णयेत् ।
भावयेदुग्रगंधायाः क्वाथेन मुनिशः पथक् ।।
ब्राह्मीरसेन सप्तैव भावयित्वा विचूर्णयेत् ।
रसःसंजायते नूनमुन्मादगजकेसरी ।। यो. र. ।।

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

हा रस कफप्रधान उन्मादाच्या विकारांत उपयोगी पडतो. स्मृतिसागर व उन्मादगजकेसरी यांत लक्षणसामान्य बरेंच आहे. उन्मादगजकेसरींत उन्मादाच्या झटक्याबरोबर तन्द्रा हें एक लक्षण जास्त असतें. उन्मादांतील नेहमीचा प्रकार असा असतो कीं, उन्मादाचा झटका येऊन गेला म्हणजे रोगी अगदीं साफ बरा असा कांहीं काल असतो. परंतु कफप्रधान व कफवातप्रधान उन्मादांत तन्द्रा हें एक लक्षण विशेषेंकरून असतें. तन्द्रा म्हणजे थोडीशी धुंदी, डोळे अर्धवट उघडे, हाता-पायाला गारवा, झटक्याच्या वेगासरसे सर्वांगाला, कपाळाला घाम सुटून सर्वांग माथनीच्या बुडासारखें गार पडणें, जडपणा, हीं लक्षणें असतां उन्मादगजकेसरीची योजना करावी.

यांतील कज्जली–रसायनी व योगवाही; मनशीळ–कफघ्न व रसायन; धोतऱ्याचें बीं–वातघ्न व अभिष्यंदनाशक; वेखंड–आक्षेपकघ्न व ब्राह्मी–शामक, मूत्रल, योगवाही व आक्षेपकघ्न अशीं आहेत.

१४. उपदंशसूर्य

* पांढरा सोमल अर्धा तोळाभर घेऊन त्यांत त्रिफळ्याचा काढा, रिंगणीचा रस व लिंबाचा रस एका लोखंडी कढईत घालून कडुनिंबाच्या सोटयानें सर्व एकत्र खलावें. हा खल सरासरीं ४२ दिवसपर्यंत करावा; घट्ट झाल्यानंतर त्याच्या मुगा-एवढाल्या बारीक गोळ्या कराव्या.

प्रमाणः––पाव ते अर्धी गुंज.

कित्येक ग्रंथकारांनीं फलत्रिकम् याच्याऐवजीं पलत्रिकं असें घेऊन पुढील ओळींतील रस ३ पलें घ्यावें असें लिहिलें आहे.

उपदंश अथवा गर्मी याचे आयुर्वेदांत दोन प्रकार सांपडतात. साधा उपदंश व फिरंगोपदंश. साधा उपदंश हा विकार रत्यतिसेवन, अधावन व योनिप्रदोष (विशिष्ट प्रकारचे नव्हेत) यांपासून फक्त [पुरुषजननेंद्रियाला होणारा विकार सांगितलेला आहे. फिरंगोपदंश किंवा फिरंगरोग हा विकार जुन्या शास्त्रीय ग्रंथांतून सांपडत नसून अलीकडच्या संहितांमधून त्याचा उल्लेख सांपडतो. ह्याच्या

---

* शङ्खोपलं कोलमितं फलत्रिकम् । क्षुद्रारसं निम्बुरसं तथैव ।।
लौहे कटाहे विनिधाय सर्वं । संघृष्य सत्वक्पिचुमंदजेन ।।
दण्डेन यावद्धि घनीभवेच्च । सिद्धो भवेन्मुद्गनिभां च मात्राम् ।।
दद्यात्फिरङ्गामयके भिषग्भिः । स्वेच्छं विधेयं किल पथ्यमस्य ।।
तैलाम्लवर्ज्यं निखिलं व्रणघ्नं । घृतानुपानैरुपदंशसूर्यः ।।

।। बृहद्योगतरंगिणी ।।

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

नांवावरूनच परकीयांचा संबंध इकडे आल्यापासून त्यांच्याबरोबर हा रोग इकड आला आहे हें ध्वनित होतें. हा रोग केवळ स्थानिक नसून सर्वांगव्यापी व अनेक निरनिराळ्या अवयवसमूहांत अनेक व्याधी निर्माण करणारा असा आहे. फिरंग रोगाचे विशिष्ट प्रकारचे जंतू असून ते जंतू संसर्गानें शरीरांत प्रविष्ट होतात आणि नंतर तीव्र व जुनाट अशा दोन प्रकारच्या अवस्था निर्माण करतात. ह्या रोगाच्या तीव्रावस्थेंत पारदकल्प जास्त उपयोगी पडतात. जुनाट अवस्थेंत पारद-कल्प कांहीं विवक्षित संस्कारानें बनविलेले व मल्लकल्प हे जास्त उपयोगी पडतात. ह्या रोगाच्या आणखीहि अवस्थांचे प्रकार करतां येण्यासारखे असतात. जंतू ज्या ज्या शरीरावयवांत किंवा ज्या ज्या दोषदूष्यादिकांबरोबर संयोग पावतील त्या मानानें निरनिराळ्या अवस्था निर्माण होतात. उपदंशाचें विष केवळ रक्त व त्वचा यांतच संचित होऊन राहिलें असतां आणि त्यामुळें शरीरांतील अणुभवनक्रिया सम्यक् होत नसतां पारद, सुवर्ण, रौप्य यांचा एकमेकांवर संस्कार करून तयार केलेला अष्टमूर्ति नांवाचा सिंदूरकल्प उपयोगी पडतो. परंतु हेंच विषार जास्त खोल जाऊन मांस व अस्थि यांत आश्रय करून राहिल्यास त्या ठिकाणचे विकार उत्पन्न होतात. मांसगतव्रण, अस्थिगतव्रण, गंड, अर्बुद, ग्रंथि, अस्थींची कीड अशा प्रकारचे निरनिराळे प्रकार उत्पन्न होतात. हें विषार जसजसें जास्त लीन होत जातें, खोल जातें, तसतसे त्या ठिकाणीं पारदकल्पापेक्षां मल्लकल्प जास्त उपयोगी पडतात. अशा मल्लकल्पांपैकीं उपदंशसूर्य हा एक उत्कृष्ट मल्लकल्प आहे.

जुनाट उपदंशजन्य व्रण, हा व्रण दिसण्यांत इतर व्रणांहून विशिष्ट प्रकारचा दिसतो. कांहीं दिवस व्रण भरून आल्यासारखा होतो, कांहीं दिवसांनीं पुनः दुप्पट वेगानें उसळून वाढतो. कडा जाडसर, कठिण, व्रणवस्तु अनियमित व स्राव अनेक प्रकारचा असे हे व्रण मांसाचा आश्रय करून किती तरी दिवस सारखे टिकून राहिलेले असतात. हे व्रण शरीराच्या बाह्यांगावर, तोंडांत, ओंठांच्या आंतील पिच्छा-त्वचेवर, जिभेवर असतात. हा विकार इतका जुनाट आणि त्रासदायक होतो कीं, सारखा जन्मभर माणसास त्रास देत राहातो. मांसाश्रित व्रण पुष्कळ दिवस राहिल्यास त्याची उपेक्षा झाली असतां किंवा अयोग्य उपचार झाले असतां अथवा स्वभावतःच, हें विषार जास्त खोल जातें व अस्थींची दुष्टि होते. अस्थिगत व्रण होतात. कांहीं कांहीं ठिकाणच्या अस्थींना कीड लागते. याहिपेक्षां विषार खोल गेल्यास अंतरिंद्रियांत लहान लहान ग्रंथि होतात, वातवाहिन्या, वातवाहिन्यांचीं केंद्रें व मेंदू यांपर्यंत दुष्टि पोहोंचते आणि रोगी लुळाखुळा विनष्टज्ञानविज्ञान होऊन जीवित कसें तरी कंठित पडतो. उपदंशसूर्याचा उपयोग असल्या प्रकारच्या मांसाश्रित व अस्थिगत व्रणांत फार उत्तम प्रकारें झालेला आहे. हें औषध देत असतां त्या-बरोबर तुपाचा उपयोग जरा जास्त करावा लागतो.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

गुदशूक (Condyloma) नामक विकारांत गुदाच्या बाहेरच्या बाजूवर फुलवऱ्यासारखी पांढरट व पातळ त्वचेची वाढ होते. ही वाढ एकमेकांवर जास्त जास्त होऊन फुलकोबीच्या फुलाप्रमाणें घोंसदार गुच्छासारखी अशी बनते. हा रोग उपदंशविषारापासून निर्माण झालेला असतो. सर्वसाधारणतः मुळव्याध झाली म्हणून रोगी प्रथमतः सांगतो. परंतु मुळव्याधीचे कोंब व शूकवृद्धि यांत बिलकूल सादृश्य नाहीं. संप्राप्ति व लक्षणें या दृष्टीनेंहि दोहोंत पुष्कळ फरक आहे. गुदशूक नामक विकारांत उपदंशसूर्याचा उत्तम उपयोग होतो.

जुनाट तालुव्रण, शंखकास पडलेला व्रण, हे उपदंशजन्य असल्यास उपदंशसूर्याच्या योगानें हे व्रण भरून येण्यास मदत होते. उपदंशाच्या योगानें दृष्टिमांद्य, आंध्य किंवा कनीनिका व्रण, डोळे लाल, पक्ष्म व्रण हे विकार उत्पन्न झालेले असल्यास त्रिफळा व तूप यांबरोबर उपदंशसूर्य देऊन त्रिफळयाच्याच काढ्यानें डोळे धुवून काढीत जावेत. डोळ्यांच्या पापण्यांच्या बाजूंस उत्पन्न होणाऱ्या जुनाट नाडीव्रणास लासूर अशी मराठी संज्ञा आहे. हा व्रण निरनिराळ्या कारणांपासून उत्पन्न होतो. पैकीं उपदंशापासून झालेला असल्यास उपदंशसूर्याच्या योगानें तो व्रण भरून आल्याचीं उदाहरणें आहेत.

उपदंशजन्य विकारांचा बाहेरचा उद्रेक कमी होऊन तें विषार अभ्यंतर इंद्रियांत पसरतें व त्यामुळें नाना प्रकारचे विकार उत्पन्न होतात. अतिसार व संग्रहणीसारखे आंत्रास होणारे विकार याच्या योगानें उत्पन्न झाल्याचे आढळून येतात. या विकारांत अगदीं प्रथमावस्थेंत म्हणजे विकार उत्पन्न झाल्याबरोबर पर्पटी किंवा अष्टधातुरसायन हीं औषधें जास्त उपयोगी पडतात. परंतु हाच विकार जास्त जुनाट झाला आणि दोष जास्त लीन झाले, रोगी अत्यंत क्षीण झाला आणि वारंवार पिच्छिल थोडथोडें शौचास होणें, त्यांत रक्त वगैरे नसणें, आंवेचे गोळेच्या गोळे पडणें वगैरे लक्षणें असतां उपदंशसूर्याचा जास्त उपयोग होतो.

उपदंशाच्या विषाराचा परिणाम वातवहमंडलें, वातचक्रें व वातवाहिन्या यांवर होऊन वातप्रकोप होतो. त्यामुळें पक्षाघातासारखीं, कलायखंजासारखीं लक्षणें उत्पन्न होतात. कांहीं रोग्यांचें सर्वांग अगदीं लुळें पडल्यासारखें असतें. कफप्रकोप फारच झालेला असल्यास रोगी अगदीं गुंगून त्याला कांहीं विचार सुचत नाहींत. एके ठिकाणीं स्वस्थ पडलेला असतो. धुंदी, जडपणा, विचार करण्याची शक्ति नसणें हीं लक्षणें विशेष असतात. ह्या ठिकाणींहि उपदंशसूर्याचा उपयोग होतो. उपदंशसूर्य सारिवालेह, रक्तदोषांतककल्प वगैरेंबरोबर द्यावा.

परिवर्तित ज्वर हा ताप वारंवार उलटून येतो. आठपंधरा दिवस ताप नसतो, आठपंधरा दिवसांनीं पुन्हां येतो, असें सारखें चाललेलें असतें. ह्या ज्वरांत

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

कफप्रधान लक्षणें असतां उपदंशसूर्याचा उपयोग करावा. ह्या विकारांत ह्या औषधाचें प्रमाण फार कमी द्यावें लागतें.

पीतज्वरांत ह्या औषधाचा उपयोग होण्यासारखा आहे.

उपदंशसूर्यांतील–सोमल––रसायन, विकासी, व्यवायी, तीक्ष्ण, सूक्ष्म असून सूक्ष्मस्रोतोगामी आहे; हिंगणी––कफघ्न, रसवाहिन्या व रसग्रंथी शुद्ध करणारी, उपकारक व योगवाही; निंबूरस––पाचक व दीपक; पिचुमंद–रक्तसंशोधक, ज्वरघ्न, व्रणरोपक, रसायन व त्वग्रोगनाशक; त्रिफळा–रसायन व व्रणघ्न आहे.

१५. एकांगवीर

* गंधक, पारा, कांतलोहभस्म, वंगभस्म, नागभस्म, ताम्रभस्म, अभ्रकभस्म, तीक्ष्णलोह व सुंठ, मिरें, पिंपळी हीं सर्व एक एक भाग करून त्याला त्रिफळचाचा काढा, त्रिकटुचा काढा, निर्गुंडीचा रस, चित्रकाचा काढा, आल्याचा रस, शेवग्याच्या सालीचा रस, कोष्ट, आंवळकाठी, कुचल्याची बी, रुईचें मूळ व कांडवेल यांचा काढा, आल्याचा रस या प्रत्येकाच्या तीन तीन भावना द्याव्या आणि एक गुंज प्रमाणाच्या गोळ्या कराव्या.

प्रमाण:—अर्धी ते एक गुंज

ग्रंथोक्तगुणधर्म:—

पक्षाघातंचार्दितं च धनुर्वातं तथैव च ॥
अर्धाङ्गं गृध्रसीं वापि विश्वाचीमवबाहुकम् ॥
सर्वान्वातामयान्हन्ति सत्यं सत्यं न संशयः ॥ नि. र. ॥

पक्षाघात अथवा अर्धांगवायु हा विकार त्रासिक, चिडखोर, संतापी, व ज्यांच्या रक्तवाहिन्या उपदंशादिक विकारांच्यामुळें विकृत झालेल्या असतात अशा माणसांना होतो. मनाच्याविरुद्ध कांहीं गोष्टी झाल्यामुळें असल्या तिडतिड्या माणसास एकाएकीं संताप येऊन एकदम सर्व शरीरभर खळबळ उडून जाते, त्यामुळें विकृत झालेल्या रक्तवाहिन्यांत रक्तसंचय जास्त होऊन त्यांचा दाब मेंदू व वातवह केंद्रें

---

* शुद्धं गंधं मृतं सूतं कांतं वंगं च नागकम् ।
ताम्रं चाभ्रं मृतं तीक्ष्णं नागरं मरिचं कणाम् ।
सर्वमेकत्र संचूर्ण्य भावयेत् त्रिः पृथक् पृथक् ।
वराव्योषकनिर्गुण्डीवन्हिकार्द्रकजैर्द्रवैः ।
शिग्रुकुष्टद्रवेणापि ततो धात्र्या द्रवेण च ॥
विषमुष्टयार्कहाटैश्च आर्द्रकस्य रसैस्तथा ।
रसश्चैकाङ्गवीरोऽसौ सुसिद्धो रसराड् भवेत् ॥ नि. र. ॥

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

यांवर होऊन पक्षाघात उत्पन्न होतो, किंवा रक्तवाहिनी फुटून तिच्यांतून रक्तस्राव होऊं लागतो. आणि रुधिराचा सांठा ज्ञानकेंद्राच्या बाजूला झाल्यामुळें त्या माणसाची जाणीवनेणीव नष्ट होते, किंवा थोड्या अंशानें कमी होते. शरीरांतील संचालनक्रियेवर त्याचा तावा राहात नाहीं, स्नायूंच्यामुळें शरीरांतील चलनवलनादि व्यापार सुरूं असतात. स्नायूवरचाच तावा कमी झाल्यामुळें ते व्यापार होईनासे होऊन रोगी विगलित झाल्यासारखा होतो, चलनवलनादिकांच्या कार्यास विरोध येतो, व्यत्यय येतो म्हणून आयुर्वेदांत त्याची गणना वातविकृतींत केली आहे. ह्या आजारांत साधारणतः अवस्थाभेदानें दोन तऱ्हेची चिकित्सा करतां येते. तीव्र अवस्थेंत रक्तवाहिनी फुटून रक्ताचा स्राव झालेला असतो. त्याचें प्रसादन करणें व फुटलेल्या रक्तवाहिनीचे घटक नवीन तयार होऊन ती सांधली जाईल अशी तजवीज करणें, आणि जुनाट अवस्थेंत रक्तवाहिनी फुगण्याची अगर फुटण्याची शरीरास लागलेली संवय नाहींशी करण्याचा प्रयत्न करणें. आपल्या इकडे रक्तप्रसादन करणारीं जीं औषधें आहेत; त्यांत ताप्यादि लोह, माक्षिक, शिलाजतु, गुग्गुल हीं मुख्य आहेत. यांच्या योगानें रक्ताचें प्रसादन होऊन फुटलेली रक्तवाहिनी सांधते. रक्तवाहिनी सांधली गेली म्हणजे थोडा कालपर्यंत बरें वाटतें. परंतु पुनः पूर्ववत कारण घडल्यास रोग्यास पुनः पक्षाघाताचा झटका येतो. म्हणून रक्तवाहिन्यांना जडलेली ही संवय नाहींशी करणारें असें एकादें औषध या जुनाट अवस्थेंत देणें जरूर असतें. आयुर्वेदाच्या उपपत्तीप्रमाणें रक्ताचें वहनकार्य वायूच्या प्रेरकत्वामुळें घडून येत असतें. वाताचा उद्रेक जास्त झाला म्हणजे रक्ताचें उद्वहनकार्यहि जास्त वेगानें होतें. रक्तवाहिनीची फुटण्याची संवय नाहींशी करावयाची असल्यास रक्ताचें उद्वहनकार्य बेतावर आणणें जरूर असतें. हें कार्य एकांगवीराच्या योगानें चांगल्या प्रकारें घडून येतें.

पक्षाघात हा केवळ शरीराच्या अर्ध्या भागालाच होतो असें नाहीं, तर कित्येक वेळेला फक्त एका हाताला किंवा पायाला किंवा कमरेच्या खालील भागाला किंवा तोंडाच्या एका बाजूला अशा प्रकारानें निरनिराळे पक्षाघात होतात. ह्या सर्व ठिकाणीं विशिष्ट स्नायूंची चलनवलनादि शक्ति कमी झालेली असते. ह्या सर्व प्रकारांत एकांगवीर निरनिराळ्या योग्य अनुपानांबरोबर द्यावा.

धनुर्वाताच्या विकारांत शरीराच्या कोणत्या तरी भागांत अभिघातजन्य किंवा इतर अशी जखम झालेली असते. आणि ती जखम व्रणचिकित्सेच्या अनुरोधानें नीट चिकित्सित न झाल्यास आणि दूषित झाल्यास त्या जखमेंतून धनुर्वाताचे विवक्षित जंतू शरीरांत प्रविष्ट होऊन वातप्रकोपास निमित्तकारण होतात. वातदोष स्नायू व शिरा यांत प्रकुपित होऊन सर्व शरीराला धनुष्याप्रमाणें वांकवितो, आणि म्हणूनच यास धनुर्वात असें म्हणतात. यालाच अपतानक, आयाम इत्यादि

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

संज्ञा लक्षणानुरोधें प्राप्त झालेल्या आहेत. ह्या रोगाच्या प्रथमावस्थेंत मोठमोठाले झटके येऊन सर्वांग वांकतें, दाभाड बसतें, मनुष्यास शुद्धि असते, परंतु गिळण्याची सोय असत नाहीं. ह्या अवस्थेंत कालकूट रसाचा चांगला उपयोग होतो. परंतु तीव्रावस्था नाहींशी झाल्यानंतर सर्वांगास एक प्रकारचा लळेपणा आलेला असल्यास व स्नायूंची शक्ति क्षीण झाल्यासारखी असल्यास एकांगवीराचा त्यानंतर उपयोग होतो.

कुल्ल्यापासून प्रारंभ होऊन कंबर, मांडचा, गुडघे, जांघाडें व पायापर्यंत वारंवार चमका निघतात. सगळा पाय ताठल्यासारखा होतो. पाय लुला पडल्यासारखा होतो, अति तीव्र वेदना कित्येक वेळेला होतात. सुयांनीं टोंचल्यासारखें होतें. पण जागच्या जागीं जखडल्यासारखा होतो आणि जरा वेळ पाय उभा केला कीं, वारंवार त्यांत स्पंद उत्पन्न होतात. ह्या वातविकारास गृध्रसी अशी संज्ञा आहे. ह्यांत वातप्रधान लक्षणें विशेष असतां एकांगवीर द्यावा.

हातांच्या बोटांपासून वेदना सारख्या चढत चढत जाऊन हात अगदीं भारावून जातात. बोटांनीं कांहीं काम होऊं शकत नाहीं. यत्किंचित् उचललें किंवा कांहीं धरलें कीं, सर्व बोटांतून सारख्या मुंग्या येऊन धरलेला जिन्नस पडून जातो, व तो केव्हां पडला ही जाणीव राहात नाहीं. या अवस्थेंत एकांगवीराचा चांगला उपयोग होतो.

एकांगवीरांत कांत, वंग, नाग, ताम्र, अभ्रक व तीक्ष्णलोह हीं बृंहण, जीवन व रसायन अशीं आहेत. वातरोगांत बृंहण हेंच शमन असतें. या न्यायानें हीं औषधें वातप्रशमन करणारीं आहेत. पारद कज्जली–रसायन, योगवाही व जंतुघ्न अशी आहे. यास दिलेल्या भावना वातप्रशमन करणाऱ्या औषधांच्याच आहेत. हें औषध अत्यंत तीक्ष्ण आहे. त्यामुळें याचा उपयोग वातप्रधान किंवा वातकफप्रधान विकारांत करावा. पित्तानुबंध असतां उपयोग करणें इष्ट नसतें.

१६. कज्जली

*शुद्ध पारा व शुद्ध गंधक हीं एकत्र खलून त्यांची झालेली काळी पूड म्हणजेच कज्जली होय. ही काळी पूड जितका जितका खल जास्त होईल तितकी तितकी गहिरी काळी व मऊ होते. बहुतेक मोठमोटचा खल्वी रसायनांतून कज्जली संयोग केलेला असतो. याचीं कारणें उपोद्घातांत सविस्तर दिलेलीं आहेत. या ठिकाणीं

* धात्रीस्वरसनिपीता रसगंधककज्जली सितासहिता ।। यो. र. ।।
वरुणादिकषायेण रसगंधककज्जली भुक्त्वा निहंति माषैका बाह्यमंतश्च विद्रधिम्।।
यो. र. व योगतरंगिणी

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

फक्त कज्जलीचे स्वतंत्र औषधी गुणधर्म दिले आहेत. कज्जलीवर निरनिराळ्या औषधींच्या भावना दिल्या असतां निरनिराळीं कार्ये होतात. कज्जलीस आंवळ्यांचे रसाची भावना दिली असतां तिचा मदात्ययांत उपयोग होतो. वायवरण्याच्या काढ्याच्या भावना दिल्या असतां विद्रधींत उपयोग होतो. या ग्रंथोक्त वचनावरून कज्जली संस्कारत: अनेक निरनिराळ्या रोगांत उपयोगी पडते हें सिद्ध होतें. अशा प्रकारें संस्कृत कज्जलीचे गुणधर्म विस्तारभयास्तव येथें न देतां केवळ कज्जलीचे–असंस्कृत कज्जलीचे–गुणधर्म येथें देण्याचें योजिलें आहे.

प्रमाण:—एक ते दोन गुंजा

कज्जली स्वभावत: उत्तेजक, जंतुघ्न, वृष्य असून आंतड्यांतील सेंद्रिय विषार-जन्य विकार नाहींशी करणारी आहे. कज्जली, रसायनी–म्हणजे सप्त धातूंना व्यवस्थित करून सर्व शरीर पुष्ट करणारी आहे. एकट्या कज्जलीचा योग्य उपयोग करतां आल्यास बऱ्याचशा विकारांपासून मनुष्य प्राणी अलिप्त राहूं शकेल असें रसतंत्रकारांचें म्हणणें आहे. (एकोऽसौ रसराजः शरीरमजरामरं कुरुते –रस-हृदये गोविंदपूज्यपादाः।) कज्जलीचा उपयोग केवळ पारद ज्या ठिकाणीं उपयोगांत आणावयाचा असेल त्या ठिकाणीं करावा.

गळ्यांतील वदामी गांठी (गिलायु) सुजल्या असतां व त्यांतून लाळ सुटून त्या दुखऱ्या झाल्या असतां कज्जलीचा उपयोग करावा. वारंवार सर्दी होण्याचा विकार, पडसें, घसा खवखवणें, खोकला हीं लक्षणें असून त्यांची व्याप्ति केवळ कंठ-देशांतच झाली असली तर असल्या प्रकारची संवय मोडण्याकरितां नुसत्या कज्जलीचा उपयोग करावा.

सर्दीच्या योगानें आंतून फुफ्फुसें दुखल्यासारखीं वाटणें, खोकला येतांना छाती दाबून धरावीशी वाटणें, सगळ्या छातींत, बरगड्यांतून सुया टोंचल्यासारख्या बारीक बारीक चमका निघणें, कोणत्याही बाजूवर पडून चैन न पडणें व त्याबरोबरच किंचित् ज्वर असणें, वारंवार सारख्या फटाफट शिंका येणें, नाकांतून पाणी गळणें, उबाऱ्याच्या खोलींत लोंकरीचे कपडे घालून बसावेंसें वाटणें, यत्किंचितहि गारव्याची झुळुक सहन न होणें, सारखा घाम येत असून बरें न वाटणें इत्यादि लक्षणें असतां कज्जलीचा उपयोग करावा. विड्याच्या पानांच्या रसांत कज्जली घेतली असतां अंगास उबारा वाटूं लागतो व शरीरास एक प्रकारची तरतरीहि वाटूं लागते.

कफभूयिष्ठ आम्लपित्तांत सारखी मळमळ सुटून फेंसाळफेंसाळ अशी वांति एक-सारखी होत असते. अन्न बिलकूल पचत नाहीं व तें खावेंसेंहि वाटत नाहीं. या विकारांत पोटांत एक प्रकारचा पिच्छिल स्राव जास्त होऊन त्याच्या योगानें पित्तां-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

तील पाचकपणा बराचसा कमी झालेला असतो. या विकारांत कज्जली दिली असतां हा पिच्छिल स्राव कमी होऊन वांति होण्याचेंहि थांबतें.

मुलांना दूध न पचल्यापासून होणाऱ्या अतिसारांत व विशेषतः उन्हाळ्याच्या दिवसांत आंबलेलें दूध पाजलें गेल्यामुळें उत्पन्न होणाऱ्या जंतुजन्य अतिसारांत रसराजाच्या ऐवजीं कज्जलीचा उपयोग केला असतां चालतो. ज्या मुलांना कढत, मोठमोठे पाण्यासारखे पातळ जुलाब होऊन मुलाच्या गुदाचा पाकहि झाल्यासारखा वाटतो, अशा विकारांत रसराज देणें चांगलें. हिरवट चोथापाणी, पालेभाजी कालवून किंवा पिळून पाणी काढल्यासारखे हिरवट जुलाब होत असल्यास त्या मुलास कज्जली देणें चांगलें.

विसर्प (धांवरें) यांतहि वरीलप्रमाणें मोठमोठाले जुलाब होत असल्यास त्यांत कज्जली देणें जास्त फायदेशीर आहे.

कज्जलीस आंवळ्याच्या रसाच्या सात भावना द्याव्यात. नंतर कज्जलीच्या इतकीच साखर मिसळून वारंवार दिली असतां मदात्यय नाहींसा होतो असें योग-रत्नाकरांत लिहिलें आहे.

वायवरण्याच्या काढ्याच्या सात भावना देऊन तयार केलेली कज्जली बाह्य व अंतर्विद्रधींत विद्रधीचें प्रसादन करणारी आणि म्हणून विद्रधिनाशक आहे असें बृहद्योगतरंगिणीकारांचें म्हणणें आहे.

कज्जलीस आल्याच्या रसाच्या व नागवेलीच्या रसाच्या भावना देऊन तयार केल्यास ती उत्तेजक म्हणून वापरतां येते.

कज्जलीचा उपयोग बाह्यतःहि चांगल्या प्रकारें होतो. डोक्यांत उत्पन्न होणारे अरूंषि (ओले खवडे), कोरडी पैण किंवा आगपैण या विकारांत तुपांतून किंवा लोण्यांतून कज्जलीचें मलम तयार करून लावण्यास द्यावें. हें मलम जंतुघ्न व व्रण-रोपक आहे. खरूज, गजकर्ण, नायटे इत्यादि त्वग्रोगांत कज्जलीचा मलम तयार करून द्यावा. १० तोळे लोण्यांत ६ मासे कज्जली घालून हा मलम तयार करावा.

गरमीच्या चट्टयांवर कज्जली व संजिरें यांची योग्य प्रमाणांत तयार केलेली पूड किंवा लोण्यांत तयार केलेला मलम यांचा चांगला उपयोग होतो.

* एक भाग पारा व दोन भाग गंधक यांची विधियुक्त कज्जली तयार करून गायीचे तुपांत योग्य प्रमाणानें एकवीस दिवसपर्यंत द्यावी. गव्हाचें अन्न व तूप हें पथ्यास द्यावें, मीठ बिलकूल देऊं नये. हा योग उपदंशामध्यें अत्यंत प्रशस्त होय असें तज्ज्ञांचें मत आहे.

---

* कर्षमात्रं रसं शुद्धं द्विकर्षं गन्धकं स्मृतम् ।
विधिवत् कज्जलीं कृत्वा तच्च गोघृतसंयुतम् ।

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

१७. कनकसुंदर रस

† हिंगूळ, मिरें, गंधक, टांकणखाराची लाही, पिंपळी, बचनाग आणि धोतऱ्याचें बीं हीं सर्व औषधें समभाग घेऊन त्यांचा भांगेच्या काढयांत सात दिवसपर्यंत खल करावा; आणि हरभऱ्याएवढ्या गोळ्या कराव्या. (सध्यांच्या दिवसांत हरभऱ्याएवढी गोळी सोसत नाहीं. अल्प प्रमाण द्यावें लागतें. यालाच कोणी हेमसुंदर किंवा कनकप्रभा म्हणतात.)

प्रमाण:—अर्धी ते दीड गुंज.

ग्रंथोक्त गुणधर्मः—

भक्षणाद् ग्रहणीं हन्ति रसः कनकसुंदरः ॥
अग्निमांद्यं ज्वरं तीव्रमतिसारं च नाशयेत् ।
दध्यन्नं दापयेत्पथ्यं महातक्रौदनं चरेत् ॥ र. चं. ॥

कनकसुंदर हें लहान मुलांचें उत्कृष्ट औषध आहे. लहान मुलांच्या दन्तोद्भव रोगांत उत्पन्न होणारीं त्रासदायक लक्षणें कनकसुंदराच्या योगानें फार लवकर कमी होतात. दांत निघत असतांना वहुतेक वातविकृतीपासून लक्षणें होत असतात. मूल त्रासिक होतें, रडतें, त्याचें पचन बिघडतें. त्यामुळें पोटांत गुबारा धरून वांत्या होतात किंवा जुलाब होतात. जुलाब बहुशः हिरवट रंगाचे, चोथापाणी असे व दुधाचे दधिकण ज्यांत जसेच्या तसे आहेत असे होतात. मुलाची मानसिक स्थिति अस्थिर होते. त्याला कोठेंच चैन पडत नाहीं. एकाजवळून दुसरीकडे, दुसऱ्याकडून तिसरीकडे जाण्याचा प्रयत्न करतें. आरडणें, ओरडणें, डसणें, चावणें, ओरबाडणें व हिरडयांनीं आपल्या मुठी घट्ट दाबून धरण्याचा प्रयत्न करणें, निद्रानाश व त्यामुळें डोळ्यांची अगदीं तारवटलेली स्थिति, या स्थितींत कनकसुंदराचा फार चांगला

माषमात्रं प्रतिदिनं दद्यादेवं त्रिसप्तकम् ।
गोधूमान्नघृतं पथ्यं कारयेल्लवणं विना ॥
उपदंशापहः श्रेष्ठो योगो मुनिभिरीरितः ॥ र. चं. ॥

† हिंगुलं मरिचं गन्धं पिप्पलीं टङ्कणं विषम् ।
कनकस्य च बीजानि समांशं विजयाद्रवैः ॥
मर्दयेद्याममात्रं तु चणमात्रा वटी कृता ।
भक्षणाद् ग्रहणीं हन्ति रसः कनकसुंदरः ॥ र. चं. व र. चि. ॥
मरीचबलिहिङ्गुलैर्गरलपिप्पलीटङ्कणैः ।
सुवर्णभवबीजकैः समलवैर्दिनार्धावधि ॥
जयारसविमर्दितैः कनकसुंदरः सुंदरि ।
स्मतो ग्रहणिकाज्वरातिसतिवन्हिमांद्यापहः ॥ यो. र. ॥

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

उपयोग होतो. दंतोद्भव ज्वरांत ज्वरोष्मा फारसा तीव्र नसतां कनकसुंदराचा उपयोग करावा. यांतील धोतऱ्यामुळें वाताचा प्रकोप कमी होऊन ज्वरहि बेतावर येतो.

ग्रहणीच्या विकारांत निराम-अवस्थेंत या औषधाचा चांगला उपयोग होतो. म्हणजे ग्रहणीचा आजार सुरू झाल्यानंतर आंव विशेष पडत असल्यास प्रथमतः एक दोन दिवस लंघन द्यावें. आणि नंतर लंघन चांगलें झालें आहे असें पाहून याची योजना करावी. प्रत्येक शौचाच्या वेळीं रक्तमिश्रित थोडी आंव पडणें व त्या मानानें पोटांत अतिशय कळा निघून जोराजोरानें कुंथावेंसें वाटणें, किंबहुना जितकें जास्त कुंथावें तितकें बरेंच वाटणें, कित्येक वेळां ही कुंथ इतकी जोराची असते कीं, रोगी एकदां शौचास बसला कीं, बराच वेळ कुंथत बसतो, तेथून उठावेंसें त्याला वाटत नाहीं. या अवस्थेंत केवळ स्तंभक-अफूसारखें-औषध दिल्यास आंतड्यांतील सूक्ष्म पेशींचें स्तंभन होऊन आम व मल यांचें निस्सरण चांगल्या प्रकारें होत नाहीं आणि ते तसेच शरीरांत राहून जास्तच विकार उत्पन्न करितात. कनकसुंदरांतील धोतरा व भांग यांचें वेदनाशामक कार्य तर होतेंच, परंतु आंतील पेशींचें स्तंभन न होतां उरफाटी मलनिस्सरणास मदत होते. दरदाचा जंतुघ्न असा परिणाम घडून संग्रहणीचें मूळ विषार निर्विष बनतें. हें औषध लहान मुलांना संग्रहणीच्या विकारांत मोठ्या माणसांच्यापेक्षां जास्त लागू पडतें. मोठ्या माणसांत, विशेषतः वातप्रकृतीच्या रोग्यांत, याचा उपयोग जास्त होतो. जुनाट रोगापेक्षां नवीनच उत्पन्न झालेल्या विकारांत हें विशेष लागू पडतें.

अतिसाराच्या विकारांत वातप्रधान लक्षणें असतां या औषधाचा चांगला उपयोग होतो. अतिसारामध्यें आंतड्यांतील पिच्छात्वचेंतून स्राव जास्त होत असतो. हा स्राव केवळ स्तंभक औषधांच्या योगानें थांबविण्याचा प्रयत्न केल्यास आंतड्यांत तो पडून राहून विकृत होतो, व अतिसार जास्त जास्तच वाढत जातो. करितां या विकारांत केवळ स्तंभक औषधें न देतां पिच्छात्वचेंतून होणारा स्राव (अब्धातुवर्धन) कमी करणारीं औषधें देणें जरूरीचें असतें. धोतरा हें पिच्छात्वचेंतून होणारा स्राव नियमित करणारें औषध आहे. हें फार बेतानें द्यावें लागतें, म्हणूनच कनकसुंदरांत याचा प्रमाणशीर उपयोग केलेला आहे. वातातिसार किंवा वातकफातिसार या दोन्ही प्रकारच्या अतिसारांत कनकसुंदराचा उपयोग झालेला आहे.

पुष्कळ दिवस अतिसाराचा विकार चालू राहिल्यामुळें गुदकांड व त्रिवळी यांतील अंतस्त्वचेंतून एक प्रकारें अगदीं पुवासारखा व घाणेरडा स्राव मलाबरोबर होत राहातो. एकंदर मलाच्या दाबामुळें व आंतड्यांच्या दाबामुळें हा स्राव जास्त जास्तच होत राहातो. या ठिकाणीं कनकसुंदराचा बेलफळाच्या काढ्याबरोबर चांगला उपयोग होतो.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

वातूळ पदार्थ जास्त खाण्यांत आल्यामुळें अन्नरस विकृत असा उत्पन्न होतो, त्यानें अतिसार सुरू होतो. या अतिसारांत ज्वरहि असतो, वारंवार वेडेवांकडे ढेंकर व पोटाला फुगवटी, असें असतां कनकसुंदराचा उपयोग करावा.

आमाशय अतिशय शिथिल झाल्यामुळें त्यांत उत्पन्न होणारें पाचकपित्त नीट उत्पन्न होत नाहीं आणि त्यामुळें खाल्लेल्या अन्नाचें नीट पचनहि होत नाहीं. अग्निमांद्य उत्पन्न होतें. याचा परिणाम पुढील पचनेंद्रियावर होऊन निरनिराळीं पाचक पित्तें सम्यक् उत्पन्न होत नाहींत व सर्वच पचन बिघडतें. अशा प्रकारें अग्निमांद्यापासून अतिसार सुरू होतो, त्यांत कुजट, खवट, घाणेरडे असे मोठमोठे जुलाब होत राहातात. या विकारांत कनकसुंदर हें एक अमोलिक औषध आहे.

कनकसुंदरांतील हिंगूळ—आमाशय व पक्वाशयांतील विकृत रसांचें अनपायी व उपयुक्त रसांत रूपांतर करणारा, जंतुघ्न व आमपाचक; धोतरा—वेदनाशामक, वातांतील प्रस्पंद वाढलेले असल्यास ते कमी करणारा, आंतड्यांतील अंत:पुर:सरण-क्रिया नियमित करणारा, व पिच्छात्वचेंतील अब्धातु कमी करणारा; टङ्कण—वेदनाशामक, आक्षेपनाशक, व थोडेसें जंतुघ्न; बचनाग—वेदनानाशक, व ज्वरघ्न, आणि पिंपळी मिरें—पाचक व दीपक; गंधक—योगवाही व रसायन; अशा प्रकारें निरनिराळ्या गुणयुक्त औषधांनीं बनलेलें हें औषध ग्रहणी, अतिसार, अग्निमांद्य, दंतोद्भव रोग व ज्वरातिसार वगैरेंत उपयोगी पडतें.

१८. कफकुठाररस

* पारा, गंधक, सुंठ, मिरें, पिंपळी, ताम्रभस्म, लोहभस्म यांचा एकत्र खल करून त्यास रिंगणीच्या फळांच्या रसाची दोन प्रहरपर्यंत भावना द्यावी. नंतर हिरडा व काळा धोतरा (धोत्र्याच्या पानांचा रस) यांची एक एक भावना द्यावी. दोन गुंज प्रमाणाच्या गोळ्या कराव्या असें ग्रंथकारानें सांगितलें आहे. परंतु एवढी गोळी सहन होत नाहीं. सबब अर्ध्या गुंजेच्या गोळ्या कराव्यात आणि विड्याच्या पानाबरोबर त्या द्याव्या.

प्रमाण—अर्धी ते दीड गुंज

हें औषध अत्यंत तीक्ष्ण आहे. याचा उपयोग उद्रिक्त कफ व तज्जन्य कास, ज्वर या विकारांत होतो. कफ छातींत पुष्कळ सांठलेला असून फार खोकून खोकून

---

* पारदं गन्धकं व्योषं मृतं ताम्रं मृतायसम् ॥
कंटकारिफलद्रावैर्भाव्यं तद्यामयुग्मकम् ॥
रोहिण्यास्तु रसेनैव धत्तूरस्वरसेन च ॥
गञ्जाद्वयं पर्णखण्डैर्देयं श्लेष्मज्वरापहम् ॥ र. चं. ॥

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मोठा घट्ट व तोंडभर असा बेडका पडत असल्यास औषधयोजनेची मोठी अडचण पडते. खोकला फार त्रासदायक व वारंवार येत असल्यामुळें या खोकल्याचें शमन करण्याकरितां कांहीं वेळां अफू देण्यांत येते. परंतु अफूच्या स्तंभक व शामक कार्या-मुळें खोकला जरी कमी वाटला तरी कफ आंतल्या आंत सांचून राहून दुष्ट होतो व अपाय करतो. म्हणन असल्या त्रासदायक खोकल्यांत अफूसारखीं केवळ शामक औषधें न देतां कफस्त्रावी व श्वासवाहिन्यांवर शामक कार्य करणारीं धोतऱ्यासारखीं औषधें जास्त उपयोगी होत. रिंगणी ही उत्तेजक, कफस्त्रावी अशी असून कुटकीच्या योगानें कफांतील घट्टपणा कमी होऊन श्वासवाहिन्यांत कफ सांचून राहिल्यामुळें रोग्याचा होणारा कोंडमारा व घवराट, याच्या योगानें कमी होते. कफ फार सांचून राहून दूषित झाल्यामुळें ज्वर उत्पन्न झालेला असतो. या ज्वराचें मूळ कारण कफ-दुष्टि असल्यामुळें कफ जसजसा पडून जाईल तसतसा ज्वरहि कमी होतो. या ज्वरांत ज्वरोष्मा बराच असला तरी नाडी तीव्र नसते. सर्व आंग ओलसर व जड जड असें होतें. रोगी आळसून अगदीं जड पडल्यासारखा होतो. अंग, विशेषतः छाती, अगदीं जखडल्यासारखी होते. पुढें पुढें खोकल्याचा जोर जसजसा वाढत जातो तसतशा छातींतून चमका निघूं लागतात. खोकत असतां चमका जास्त व छातींतून वांब्र आल्याप्रमाणें निघतात व खोकला येऊन कफ पडून गेला म्हणजे या कळा कमी पडतात. रोगी अशक्त व फिक्कट पडलेला असतो. अशा विकारांत कफकुठार रसाचा उपयोग चांगला होतो.

कफकुठारांतील कज्जली—योगवाही व रसायन; सुंठ, मिरें—पाचक व दीपक; पिपळी–कफस्त्रावी; ताम्र–वेदनाशामक,आक्षेपनाशक व कफोत्पत्ति कमी करविणारें; लोहभस्म—शक्तिवर्धक; रिंगणी—उत्तेजक व कफस्त्रावी; कुटकी—कफ पातळ करणारी व वामक; काळा धोतरा—कासवेग कमी करून कफ बाहेर पडण्यास मदत करणारा, वातवाहिन्यांना शामक, व अन्तस्त्राव नियमित करणारा असा आहे.

१९. कर्पूर रस

*हिंगूळ, अफू, नागरमोथे, इंद्रजव, जायफळ व कापूर हीं सर्व औषधें समभाग घेऊन बारीक करून पाण्यांत त्याच्या मुगाएवढाल्या बारीक म्हणजे अर्ध्या गुंजेच्या गोळ्या कराव्यात. यालाच कोणी कर्पूर वटी म्हणतात.

प्रमाण—पाव ते एक गुंज

---

* हिङ्गुलंचाहिफेनं च मुस्तकेन्द्रयवं तथा ।।
जातीफलं च कर्पूरं सर्वं संमर्द्य यत्नतः ।।
जलेन वटिका कार्या द्विगुंजापरिमाणतः ।। र. चं. ।।

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

ग्रंथोक्त गुणधर्मः--

ज्वरातिसारिणे चैव तथातीसाररोगिणे ।।
ग्रहणीषट्प्रकारेषु रक्तातीसार उल्बणे ।। र. चं. ।।
तत्तद्रोगानुपानेन नियोज्योऽयं रसोत्तमः ।।

कर्पूररसाचे वाङमयांत एकंदर एकोणतीस पाठ उपलब्ध आहेत. कर्पूररसांत अफू व जायफळ हीं दोन औषधें फार स्तंभक असल्याकारणानें त्यांचा उपयोग अतिसार व संग्रहणी यांच्या आमावस्थेंत न केलेला बरा. पित्तातिसार व त्याबरोबरच ज्वर व तहान, दाह, चक्कर येणें हीं लक्षणें असतां, आणि पिवळट, निळसर व अरुण रंगाची अशी शौचास होत राहिल्यास या रसाचा तेथें जास्त उपयोग होतो. सर्व प्रकारच्या अतिसारांत याचा तादृश उपयोग होत नाहीं. संग्रहणीच्या विकारांतहि, सहाहि प्रकारांत याचा उपयोग होतो असें ग्रंथकारांनीं सांगितलें आहे. परंतु पित्तज व वातज संग्रहणी यांतच फक्त या रसाचा उपयोग नीट होतो. वातज संग्रहणींत अन्न नीट पचत नाहीं, उग्रट, घाणकट व आंबूस असे ढेंकर येतात. तोंड व घसा सुकतो, तहान लागते, डोळ्यांपुढें अंधेरी येते, कानांत आवाज होतात. बरगड्या, मांड्या, जांघाडें आणि मान यांत वेदना होतात. पोटांत सुया टोंचल्यासारखें होतें. हृदयाच्या ठिकाणीं पीडा, बलहीनत्व, कृशता, तोंडाला बेचवपणा, सर्वान्न खावेंसें वाटणें, परंतु पोटांत अन्न गेल्याबरोबर पोट कातरल्यासारखी पीडा होते. रोगाच्या मानानें भूक बरी लागते. रोग्यास वारंवार गळाल्यासारखें वाटतें, कशांतही हुरूप वाटत नाहीं. अन्न जिरत असतांना पोट फुगतें, पुष्कळ वेळानें पुष्कळ वेळ कुंथून पातळ, चिकट, आंव जात आहे असें, भरभरित मोठा आवाज होऊन फेंसाळ, फेंसाळ असें पुनःपुन्हां शौचास होतें. यांत रोग्यास फारसें कुंथावेंसें वाटत नाहीं. परंतु शौचास पूर्ण झालें असें कधींच वाटत नाहीं. शौचाची शंका सारखी राहिलेली असते; त्यामुळें शौचाचे वेग वारंवार येतात आणि शौचास बसावेंसें वाटतें. थोडें कुंथून शौचास झाल्यास लागलीच थोडेंसें बरें वाटतें, पण पुन्हां लागलीच शौचास जावेंसें वाटतें. असा हा क्रम सारखा चाललेला असतो. या स्थितींत कर्पूररसासारखें उत्तम शामक औषध पाहिजे असतें. यांतील अफू, जायफळ वगैरे शामक औषधांनीं वातवाहिन्यांचा झालेला क्षोभ कमी होतो व शौचाची शंका कमी पडते.

पित्तप्रधान संग्रहणींत निळसर, पिवळट, व रक्तयुक्त, पातळ, घाणकट, असें शौचास फार होतें. त्यांत वेदना किंवा कुंथ फारशी असूं शकत नाहीं. परंतु पोटांत आग, शौचाची आग, विशेषतः उत्सर्ग झाल्यानंतर गुदमार्गाची आग, गुदपाक, सर्वांगाचा दाह, अरुचि, तृषा हीं लक्षणें जास्त असतात. या अवस्थेंत कर्पूररसाचा उपयोग ठीक होतो.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

रक्तातिसारांत अफूसारख्या तीव्रस्तंभक औषधापेक्षां गव्हला, लोध्र, अर्जुन, किंवा धायटीचीं फुलें यांसारखीं रक्तस्तंभन व रक्तप्रसादन करणारीं औषधें देणें जास्त चांगलें. अफू तीव्र शामक असल्याकारणानें हिच्या योगानें अंतरिंद्रियांतील व्यापार प्रमाणाबाहेर मंदावतात, आणि त्यांची क्रियाशक्ति, पुष्कळ वेळां नष्टप्राय होते, ती पुन्हां सम्यक् प्राप्त होण्यास फार कालावधि लागतो. सबब या विकारांत अफुयुक्त औषधें किंवा अफू यांचा उपयोग न केलेला बरा.

कर्पूररसांतील हिंगूळ–ग्रहणी दोषनाशक, व जंतुघ्न; अफू–तीव्रशामक, वेदनानाशक, तीव्रस्तंभक व आंतड्यांतील आणि ग्रहणींतील पुरस्सरणक्रिया मंद करणारी; कापूर–कृमिघ्न, रक्तस्थिति कायम ठेवणारा, स्रोतसांचें आकुंचन नाहींसें करणारा, रक्तवाहिन्या विस्फारित करणारा व पित्तशामक; जायफळ–स्तंभक; इंद्रजव–पित्तविरेचन करणारें असें आहे.

[कर्पूर (रस)––रसकर्पूर याचे गुणधर्म पुढें दिले आहेत.]

२०. कामदुघा रस

* मौक्तिकभस्म, प्रवाळभस्म, शौक्तिकभस्म, कपर्दिकभस्म, शंखभस्म, सुवर्णगैरिक (सोनकाव), गुळवेलीचें सत्त्व हीं समभाग घेऊन त्यांचा एकत्र खल करावा. यास कामदुघा रस म्हणतात.

प्रमाणः––एक ते तीन गुंजा.

ग्रंथोक्त गुणधर्मः––

जीर्णज्वरभ्रमोन्मादपित्तरोगेषु शस्यते ।
आम्लपित्ते सोमरोगे योज्यः कामदुघारसः ॥ र. सा. ॥

कामदुघा, शांतवीर्य (शीतवीर्य) औषध असून त्याचा परिणाम पचनक्रिया रुधिराभिसरण, वातवहनक्रिया व मूत्रमार्ग यांवर शामक असा होतो. या औषधाच्या योगानें वरील अवयवसमूहांत उत्पन्न झालेला दाह लवकर कमी होतो. भ्रम, भोंवळ वगैरे विकारांपासून तों थेट वेडाच्या परिस्थितीपर्यंत डोक्याच्या विकारांवर, आमाशयापासून सर्व महास्रोतांच्या विकारांत, मूत्राघात, मूत्रोत्सर्ग मूत्रकृच्छ्र, या मूत्र विकारांवर,साधें रक्त पडणें, घुणा फुटणें, यांपासून तों रक्तपित्ताच्या भयंकर स्थितीपर्यंत रुधिराभिसरणावर रक्तस्तंभक असें कामदुघेचें निरनिराळ्या प्रकारचें कार्य होतें.

---

* मौक्तिकस्य प्रवालस्य मुक्ताशुक्तिभवस्य च ।
वराटिकायाः शङ्खस्य भस्मानि गैरिकं तथा ।
गुडचिकोद्भवं सत्त्वं समभागानि कारयेत् ।
अजाजिकासिताभ्यां च गृण्हीयाद्रक्तिकाद्वयम् ॥ र. सा. ॥

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

ह्यांत मुख्यतः चुन्याचे कल्प असल्याकारणानें याचा साधारण शक्तिवर्धक असा उपयोग होतो. जीर्णज्वरांत वाटत असलेला शक्तिपात याच्या योगानें नाहींसा होतो. शंखकपर्दिकादि भस्मांच्यामुळें प्लीहावृद्धि नाहींशी होऊन मूळची स्थिति प्राप्त होते, अग्निसाद नाहींसा होतो व त्यामुळें भूक चांगल्या प्रकारें लागूं लागते. हिवतापाच्या विकारांत कडू औषधांचा उपयोग बराच करण्यांत येतो. त्यांतल्या त्यांत कोयनेलसारखें औषध जास्त वापरण्यांत आल्यामुळें बाधिर्य, अग्निसाद, भ्रम, अरुचि, अन्नाची इच्छा कमी; हीं लक्षणें उत्पन्न झालीं असतां कामदुघा चांगल्या प्रकारें कार्य करते. याबरोबरच फिकेपणा अधिक, मळमळ, पोटांत कळकळून मोठमोठाल्या वांत्या होणें, हीं लक्षणें असतां कामदुघेबरोबर माक्षिकाचाहि उपयोग करावा.

पित्त विदग्ध झाल्यामुळें रक्तहि विदग्ध होतें, आणि त्यामुळें रक्तवाहिनीच्या आंतील त्वचा विकृत होऊन, पातळ होऊन रक्तवाहिन्यांतून वाहिन्या फुटून रक्त बाहेर येऊं लागतें. या परिस्थितींत चुन्याचा अंश बराच कमी झालेला असतो. रक्तपित्ताबरोबर सर्वांगाचा दाह, भोंवळ, यत्किंचित् डोळे उघडले तरी सर्व घरदार ब्रह्मांड फिरतें आहे असें वाटणें आणि त्यामुळें रोगी डोळे झांकून स्वस्थ पडलेला असणें, पडल्या पडल्या एकाद्या झोल्यांत घातल्यासारखें वाटणें, मूत्राची आग, रक्त जळजळीत व जेथून पडत असेल तेथील आग अशीं लक्षणें असतां, म्हणजे पित्तप्रधान रक्तपित्त असतां, कामदुघेचा चांगला उपयोग होतो.

पित्तभूयिष्ठ किंवा वातभूयिष्ठ शीर्षशूल (डोकेदुखी) या विकारांत कामदुघेचा चांगला उपयोग होतो. कित्येकांना डोकें दुखण्याची पुष्कळ दिवसांची संवय असते. डोकें दुखून दुखून नंतर वांति झाल्यावर डोकें दुखणें कमी होतें. या अवस्थेंत कामदुघा द्यावी. वांति झाल्यानंतरहि सारखें डोकें दुखत राहिल्यास कामदुघेपेक्षां सूतशेखराचा उपयोग जास्त होतो. पित्तभूयिष्ठ शीर्षशूलांत रोगी फार चिडखोर, त्रासिक, यत्किंचित् कारणावरून डोक्यांत राख घालणारा, बिलकूल सहनशक्ति नसलेला, मोठ्यानें हंसणें, मोठ्यानें बोलणें, वाद्यांचा आवाज किंवा मुलांचें रडणें, कित्येक वेळां पक्षांचा किलकिलाटसुद्धां सहन न होणें, इतकी रोग्याची मनःस्थिति पराकाष्ठेची नाजूक व तलम बनलेली असते. असल्या नाजूक चिडखोर मनुष्यास सूतशेखरापेक्षां कामदुघेचा जास्त चांगला उपयोग होतो. असल्या रोगांत पित्ताचा संसर्ग असतो, तो कामदुघेच्या योगानें शमन पावतो. सूतशेखरानें पित्ताची उत्पत्ति नियमित होते म्हणजे तें जास्त तीव्र किंवा जास्त प्रमाणांत उत्पन्न होत नाहीं. कामदुघेच्या योगानें पित्तांतील तीव्रता व आम्लता कमी होते आणि अशा प्रकारें पित्तांतील जोरदारपणा नाहींसा होतो. आणि म्हणून जेव्हां जेव्हां पित्ताच्या तीव्रतेमुळें जास्त त्रास होत असेल अशा प्रत्येक वेळीं कामदुघेचा उपयोग करावा.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

जागरणानें, अति मानसिक श्रमानें, अति अभ्यासानें किंवा ऊन, शेक वगैरेजवळ बसल्यानें डोळ्याला त्रास होऊन डोकें दुखत असल्यास, संत्रस्त झालें असल्यास, कामदुघेचा उपयोग करावा. हाच क्षोभ वाढत जाऊन मेंदूची विचारशक्ति व धारणाशक्ति कमी होत होत जात असल्यास या अवस्थेंत कामदुघेसारखें क्षोभनाशक व शक्तिदायक औषध योजावें लागतें.

आमाशयस्थ पित्त वाढून जळजळ, आंबट ढेंकर येणें, डोकें दुखणें, चक्कर येणें इत्यादि लक्षणें होऊन आंबट व कडू अशी वांति होणें यासच आपण आम्लपित्त असें म्हणतों. या विकारांत प्रमाणापेक्षां पित्तस्राव जास्त होतो किंवा त्याची तीव्रता तरी वाढलेली असते. पित्ताचा स्राव जास्त वाढून खाल्लेलें अन्न आंबट होऊन आंबट आंबट अशी वांति होते. अशा वेळीं सूतशेखराचा उपयोग जास्त होतो. परंतु पित्ताची तीव्रता जास्त वाढून वांति होतांना जास्त त्रास व थोडें थोडें पित्त पडणें, हीं लक्षणें असतां कामदुघेचा उपयोग करावा. कामदुघा नुसती न देतां तूप व आंवळकाठी किंवा तूप व नागकेशराचें चूर्ण यांच्याशीं मिश्र करून द्यावी, म्हणजे पित्ताची तीव्रता न जाणवतां आम्लपित्त कमी होतें. हा आम्लपित्ताचा विकार वाढत गेल्यास पित्ताच्या तीव्रतेमुळें व अन्नाच्या सारख्या विदाहामुळें पुढें पुढें पोटाच्या पिच्छात्वचेचा क्षोभ होतो; दाह होतो व क्वचित् बारीक बारीक व्रणहि उत्पन्न होतात. अशा प्रकारें आम्लपित्तजन्य विकृतींत कामदुघेचा उत्तम उपयोग होतो. ही शांतवीर्य असल्याकारणानें पित्तांतील तीक्ष्ण द्रव्यें हिच्या परिणामानें सौम्य बनतात. तसेंच तिच्यांतील गेरू वगैरे शामक व स्तंभक औषधांच्या परिणामानें पित्ताचा स्राव कमी होतो. कामदुघेच्या योगानें रक्ताचें प्रसादन होतें, रक्तवाहिन्यांचें प्रसादन होतें आणि अशा प्रकारें क्षोभ कमी होतो.

कामदुघेचा हा शामकपणा पित्तातिसार, रक्तातिसार यांत प्रतीत होतो. हिच्या योगानें अंतस्त्वचेचा क्षोभ शम पावतो. रक्तातिसारांत व पित्तातिसारांत पक्वाशय व आंत्र यांच्या अंतस्त्वचेचा क्षोभ झालेला असतो. पोटांत सारखी आग होत असते. पाणी पिण्याची इच्छा, शौचास होतांना आग कढत, जळजळीत, पिवळट असे जुलाब, गुदपाक, गुदाची आग, या सर्वांस पित्तकारक कारणें घडलेलीं अशा स्थितींत कामदुघा उत्तम काम करिते.

विदग्ध पित्ताच्या योगानें रक्ताचा विदाह होतो. त्यामुळें रक्तांत तीक्ष्णोष्णत्वादि पित्ताचे धर्म वाढतात. एवंगुणविशिष्ट रक्त, रक्तवाहिन्यांमधून वाहूं लागल्यानें रक्तवाहिन्यांची अंतस्त्वचा जास्त जास्त पातळ होते आणि कांहीं क्षोभकारक कारणानें रक्तवाहिनी फुटून तिच्यांतून रक्त बाहेर येऊं लागतें. या सर्वांस विदग्ध पित्त हें कारण आणि रक्तपित्त हें त्याचें कार्य होय. या रक्तपित्ताच्या विकारांत प्रवाळ मौक्तिकादि औषधांचा उपयोग होतोच; परंतु या औषधांत स्तंभकपणा नसल्या-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

कारणानें कांहीं विशेष अवस्थांतून कामदुघा योजावी लागते. वारंवार सारखें रक्त पडत राहाणें, बंद झालें तरी फार थोडा वेळ बंद होणें, एका ठिकाणचें बंद झाल्यास दुसऱ्या ठिकाणीं पुन्हां सुरू होणें, रक्तांतील खपली धरण्याची (गोठण्याची) क्रिया मंद झाल्यासारखी असणें आणि त्याचमुळें सारखें रक्त वाहात राहाणें, सर्वांगाचा दाह, हातापायांची व डोळ्यांची जळजळ, मूत्राचा दाह, सारखा वारा घ्यावासा वाटणें, डोकें फिरल्यासारखें होणें, सर्व घरदार, अस्मान फिरतें आहे असें वाटणें, आणि कित्येक वेळां हा भ्रम वाढून मूर्छा आल्यासारखें होणें, हीं लक्षणें असतां कामदुघा चांगली उपयोगी पडते.

पित्तदोषाच्या दुष्टीमुळें पचन बिघडून अंत:कोष्ठांत सेंद्रिय विषारें निर्माण होऊं लागतात. हीं अर्थातच पित्तगुणभूयिष्ठ असतात, यांच्या कोपामुळें उन्मादासारखे विकार उत्पन्न होतात. या घोर दोषसंचयाचा परिणाम मनोवृत्तीवर होऊन अल्प सत्त्व मनुष्याचें मन चंचल बनतें, त्यांत चलबिचल होते आणि मनोवृत्तीचा विभ्रम सुरू होतो. यासच आपण उन्माद असें म्हणतों. यांत बुद्धीचा विभ्रम, मनाचें स्थैर्य नष्ट होणें, दृष्टि अस्थिर, चंचल व आकुल होते, धैर्य नष्ट होतें, वाटेल तशी असंबद्ध बडबड सुरू होते आणि हृदयांत एकदम शून्यत्व, विचारराहित्य उत्पन्न होतें. वारंवार भोंवळ येते, ती इतकी कीं, रोगी भोंवळ येऊन बेशुद्ध पडतो. असल्या प्रकारच्या उन्मादांत कामदुघा चांगलें कार्य करिते.

हृदयाच्या विकारांत पित्तलक्षणें जास्त असतां कामदुघेचा उपयोग करावा. यांत हृदयाची व नाडीची गति वाढते, वारंवार चक्कर व भोंवळ येतात, हृत्स्पंद जास्त होतात व इतरहि पित्तलक्षणें जास्त असतात. या परिस्थितींत कामदुघेचा उपयोग करावा.

सर्वांगशोफाच्या विकारांत कळमळणें, भोंवळ येणें, अकारण श्रम वाटणें, वांति, डोकें दुखणें, पोटांत दाह झाल्यासारखा होणें वगैरे पित्तलक्षणें असून, मूत्राचें प्रमाण फार कमी व जितकें होतें, तेंहि लाल, गढूळसर असें असतां तीव्र, क्षार, मूत्रल औषधें उपयोगी पडत नाहींत. तीं दिल्यास मूत्रपिंडाचा दाह अधिकच वाढून शोफहि वाढेल. अशा परिस्थितींत तीव्र, क्षार, मूत्रल औषधें न देतां शामक औषधांचा उपयोग करावा. शामक मूत्रल औषधें दिलीं असतांहि मूत्रपिंडास जास्त काम करावें लागतें. तेंहि कित्येक अवस्थेंत इष्ट नसतें. केवळ क्षोभनाशक, शीतवीर्य, प्रसादन अशा औषधांचा या अवस्थेंत जास्त उपयोग होतो. हें काम कामदुघेनें साधतें. कामदुघा शांतवीर्य असल्याकारणानें मूत्रपिंडास होणारा त्रास इच्या योगानें बराच नाहींसा होतो. ही शामक असल्याकारणानें रक्ताचें प्रसादन करिते व सूजहि कमी करते. म्हणून असल्या प्रकारच्या पित्तभूयिष्ठ सर्वांगशोफांत कामदुघा योजावी.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मूत्रवह स्रोतसांतून मूत्र येत असतां दाह होणें, त्या जागीं पुळचा असणें, स्रोतसें स्फोटयुक्त चिरण्या पडल्यासारखीं होणें, हीं लक्षणें असतां कामदुघा योजावी.

स्त्रियांच्या रक्तप्रदरांत कामदुघेचा उपयोग होतो. गरोदरपणीं, होणाऱ्या वांत्या कडू, आंबट, जळजळीत, दाहयुक्त अशा होत असल्यास त्यांतहि कामदुघेचा चांगला उपयोग होतो.

मुलांच्या डांग्या खोकल्यांत कामदुघा हें बऱ्यापैकीं औषध आहे.

हिच्यांतील प्रवाळ–शामक, शीतवीर्य, मूत्रल व रक्तप्रसादक; शंखभस्म–पाचक व माधुर्योत्पादक; कपर्दिक–पाचक; शौक्तिक–शीतवीर्य, स्तंभक व पाचक; मौक्तिक–रक्तप्रसादक, रक्तांतील तीक्ष्णत्वादि धर्म कमी करणारें, शीतवीर्य, मूत्रल व शामक; गुळवेलीचें सत्त्व–उपलेपक, शामक व ज्वरघ्न; सुवर्णगैरिक–स्तंभक, रक्तप्रसादक, व क्षोभनाशक अशीं आहेत.

२१. कामधेनु रस

* शुद्ध पारा, शुद्ध गंधक, वचनाग, सुंठ, मिरें, पिंपळी, लोहभस्म, अभ्रकभस्म, हीं सर्व समभाग घेऊन त्रिफळेच्या काढयांत त्यांचा खल करावा व एकेक गुंज प्रमाणाच्या गोळचा कराव्यात.

प्रमाणः—एक ते तीन गुंजा.

ग्रंथोक्त गुणधर्मः—

धातुक्षयं पांडुरोगं पुराणं विषमज्वरम् ॥
प्रमेहं रक्तपित्तं च अम्लपित्तं तथैव च ॥
सन्निपातं महावातं शूलगुल्मकृमींस्तथा ॥
अर्शांसि ग्रहणीरोगान्नाशयेत्तत्क्षणादपि ॥
कामधेनुरसो नाम सर्वरोगेषु दापयेत् ॥ र. सा. ॥

हें औषध बल्य, रसायन, पचन वाढविणारें व धातुपरिपोषणक्रमास एका विवक्षित तऱ्हेनें मदत करणारें आहे. रसधातूपासून शुक्रधातूपर्यंतचे सर्व धातू क्षीण होत जाणें, या अवस्थेस धातुक्षय अशी संज्ञा देतां येईल. यांत अन्नरसापासून बनत असलेला रसधातु नीट व सकस बनत नाहीं; आणि त्यामुळें पुढचे पुढचे रक्तादि धातू यांतहि क्षीणता येते. या अवस्थेंत पूर्वधातूंमध्यें परधातूस आवश्यक असलेलीं द्रव्यें परिपूर्ण असावीं लागतात हें जितकें खरें, तितकेंच परधातूस जरूर असलेलीं द्रव्यें पूर्व धातूंतून

* सूतं गंधं विषं व्योषं लोहमभ्रं समांशकम् ।
मर्दयेत्त्रिफलाक्वाथैः सिद्धो भवति स रसः ।
पिप्पलीमधुसंयुक्तं सेव्यं द्विवल्लमात्रकम् ॥ र. सा. ॥

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

घेऊन आपलीशीं करण्याचा धर्महि परधातूंत चांगल्या प्रकारें असावा लागतो. कामधेन, रसक्षय व रक्तक्षय या दोन प्रकारच्या धातुक्षयांत उपयोगी पडणारें औषध आहे. रसक्षयांतील रसधातु बनण्याची क्रिया याच्या योगानें सुधारते. पोटांत गुबारा, मोठमोठाले पाण्यासारखे पांढरट जुलाब होणें, पोटास जडपणा वाटणें, रात्रंदिवस मळमळ, तृप्ति, तोंडास व जिभेस चिकटा, फोड किंवा व्रण नसून त्याऐवजीं उपलेप या लक्षणांत कामधेनुरसाची योजना करावी.

रक्तक्षयांत रक्तांतील रक्तकण कमी होतात व रक्तधातूहि कमी होतो. रक्तकण कमी झाले असतां, फिकेपणा अधिक वाढतो आणि रक्तधातु कमी झाला असतां दाह, ज्वर, तृषा, भोंवळ, घबराट, शरीरांतील नाड्यांचें जास्त स्पंदन, वारंवार घाबरेपणा, जीभ कोरडी, फिकट, लवरहित, कितीहि पाणी प्यालें तरी तृप्ति न वाटणें यकृत् व प्लीहा या इंद्रियांची किंचिन्मात्र वृद्धि, त्वचेला व सर्वांगाला एक प्रकारें विवर्णता, किंवहुना काळसरपणा विशेष, हीं लक्षणें असतां कामधेनुरसाची योजना करावी. हा आजार चिंता, शोक, भय, मनोव्याघात, अतिचिंतन, अभ्यास किंवा मानसिक श्रम हे जास्त झाल्यामुळें उत्पन्न झालेला असल्यास कामधेनुरस चांगल्या रीतीनें उपयोगी पडतो. या विकारांत ज्वर व अपचन हीं लक्षणें प्रमुखत्वानें असतां कामधेनुरसाची योजना करावी.

जुनाट विषमज्वरांत दोषदूष्यसंयोग पाहून आयुर्वेदांतील निरनिराळ्या औषधांची योजना करावी लागते. संतत व सतत (सारखा टिकणारा व कांहीं काल निघून पुन्हां येणारा) ह्या दोन्ही ज्वरांच्या तीव्रावस्थेंत कामधेनूसारखें औषध उपयोगी पडत नाहीं. परंतु या ज्वरांच्या जीर्णावस्थेंत ज्वरदोषांचा (विषारांचा) परिणाम रस व रक्त या धातूंवर होऊन धातू क्षीण होऊं लागतात; त्या अवस्थेंत कामधेनुरसाची योजना करावी. संतत म्हणजे सारख्या टिकणाऱ्या, ज्वराचा परिणाम हा ज्वर येऊं लागल्यापासून तिसऱ्या किंवा चौथ्या दिवशीं रसधातूवर होऊं लागतो. सर्वांगास जडपणा, विशेषत: पोटांत जाड्य, तोंडाला मळमळ, पाणी सुटणें, आंग गळून गेल्यासारखें होणें, ग्लानि विशेष, वांति, कळकट गोडसर पाणी वांतीवाटे पडणें, अरुचि, आणि विशेष लक्षण म्हणजे रोग्याचा चेहरा म्लान व दीनवाणा दिसणें या विकारांत कामधेनुरसाची योजना करावी. महिनानुमहिने येणाऱ्या सतत ज्वराचा परिणाम रक्तधातूवर विशेष होतो. त्यामुळें दाह, फिकेपणा, वारंवार मन गोंधळून जाणें, वारंवार आंबट–कडू अशी वांति होणें, विभ्रम, अंगावर पुटकुळ्या उठल्यासारखें होणें, दादर येणें, तहान आणि असंबद्ध नसला तरी संबद्ध प्रलाप म्हणजे बडबड करण्याची प्रवृत्ति अधिक, रोगी फिकट, दीनवाणा व चिंताग्रस्त असा असतां कामधेनुरस चांगला उपयोगी पडतो.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पिवळट रंगाचें, वारंवार अधिक प्रमाणानें मूत्र, त्याचबरोबर तहान, सर्वांगाचा दाह, अंगास एक प्रकारचा चिकटपणा, चिकट घाम, बेचकळचा, बगला वगरेंना एक प्रकारची घाण, अशा प्रकारच्या पित्तभूयिष्ठ प्रमेहांत कामधेनु रस जांभळांच्या लेहाबरोबर किंवा शिलाजतूबरोबर द्यावा.

अधोग रक्तपित्त व रक्तार्श या दोन्ही विकारांत रक्तधातू क्षीण होऊन दाह, दैन्य, तृषा, भ्रम, घाबरेपणा इत्यादि लक्षणें असतां कामधेनुरसाची योजना करावी.

आमाशयाच्या अशक्ततेमुळें व त्या ठिकाणीं पित्तोत्पत्तीच्या वेळीं जरूर असलेला रक्ताचा पुरवठा सम्यक् न झाल्यामुळें, पित्तस्राव सर्वगुणयुक्त व सम्यक् होत नाहीं. त्यामुळें पित्तांतील कांहीं गुण वाढून आम्लपित्ताचा विकार उत्पन्न होतो. ह्या आम्लपित्तांत अन्नाचा विदाह, अन्न न पचतां आमाशयांत, तसेंच बराच कालपर्यंत पडून राहाणें, त्यामुळें पोटास जडपणा, तोंडाला वारंवार चळचळ पाणी सुटणें, तें मळमळीत, वेडेंवाकडें असल्यामुळें वारंवार कळवळणें, जीव घाबरणें, स्थिरपणा न वाटणें व पोटांतील अन्न सारखें डचडचून त्रास देऊन देऊन काहीं कालानें आंबूस घाणेरडें क्लेदयुक्त अन्न वांतीवाटे पडणें. आम्लपित्ताच्या असल्या प्रकारांत कामधेनूरसाची योजना करावी.ह्याचाबरोबर हलकें अन्न किंवहुना नुसते फलरस,तरवणी अशा सारखें अन्न देणें चांगलें.

कामधेनूंतील कज्जली—जंतुघ्न योगवाही व रसायन; बचनाग—ज्वरघ्न, वेदनाहर, संज्ञास्थापक, स्वेदल व मूत्रशोधक; त्रिकटू—पाचक, दीपक व धात्वग्नींना बलदायक; अभ्रक—धातुपरिपोषणक्रम व्यवस्थित करणारें, रसायन योगवाही, बल्य व मनोदोषनाशक; लोह—रक्त वाढविणारें, रक्तधातूची विकृति कमी करणारें, प्रसादन, शक्तिदायक, रसायन व योगवाही; त्रिफळा—रसायनी, योगवाही व धातुपरिपोषणक्रमास मदत करणारी; अशीं आहेत.

२२. कालकूट रस

* शुद्ध बचनाग अक्रा भाग, शुद्ध पारा तीन भाग, शुद्ध गंधक पांच भाग, शुद्ध मनशीळ सहा भाग, ताम्रभस्म चार भाग, टाकणखाराची लाही सहा

* रुद्रसंख्यविषं चैव त्रिभागः सूत एव च ।
गंधकः पंचभागः स्याच्छिला स्यादृतुभागिका ॥
ताम्रभस्म चतुर्भागमृतुभागं च टंकणम् ।
तालकं रत्नसंख्याकं वन्हिमूलं तथैव च ॥
त्रिकटोर्द्वादशज्ञेयास्त्रिफला दशभागिका ।
हिंगुनश्चन्द्रभागः स्याद्वचायाश्च तथैव च ॥

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

भाग, शुद्ध हरताळ नऊ भाग, चित्रक नऊ भाग, सुंठ, मिरें, पिंपळी बारा बारा भाग, हिरडा, बेहेडा, आवळकाठी दहा दहा भाग, हिंग एक भाग, वेखंड एक भाग, हीं सर्व औषधें एकत्र कुटून वस्त्रगाळ करून खलांत घालावींत. नंतर त्यास आलें, चित्रक, झामराचा रस, लसणीचा रस, सागरगोटयाच्या पाल्याचा रस, रुईच्या मुळांचा काढा, कळलावीच्या (करळी) मुळीचा रस, धोतऱ्याच्या मुळीचा रस, नागवेली-च्या पानांचा रस, अंकोलाच्या मुळीचा रस व शेवग्याच्या मुळीचा रस, पंचकोलाचा रस, बृहत्पंचमूलांचा रस, यांच्या प्रत्येकीं एकेक प्रहर भावना द्याव्यात. खल पूर्ण झाल्यावर अर्धगुंज प्रमाणाच्या बारीक बारीक गोळ्या कराव्यात व सामान्यतः आल्याच्या रसांत एकेक गोळी द्यावी.

प्रमाणः—पाव ते अर्धी गुंज.

ग्रंथोक्त गुणधर्मः—

सर्वज्वरहरो योगः सन्निपातकुलान्तकः।
स्नानं कुर्यात्प्रयत्नेन श्रीखण्डालेपमाचरेत्।
दध्यन्नं दापयेत्पथ्यं खर्जूरादिफलान्यपि।
ताम्बूलचर्वणं कुर्यात्क्रमादेवं समाचरेत्।
कालकूटरसो नाम महेशेन प्रकाशितः ।। र. सा. ।।

कालकूट फार तीक्ष्ण, उष्ण, विकाशी व व्यवायी औषध आहे. ह्यांतील औषधें व त्यांवर दिलेल्या निरनिराळ्या भावना, ह्यांमुळें हें औषध फार कडक बनलेलें आहे. कालकूटाचा उपयोग करतांना नाडी पूर्ण, पूर्णप्लुत किंवा टणक दोरी-सारखी हस्तस्पर्शास लागणारी नसावी, नाडीचीं हीं सर्व लक्षणें रक्ताचा दाब वाढल्या-चींच द्योतकें होत. त्याचप्रमाणें कोठूनहि रक्तस्राव होत नसावा. कारण काल-कूटाच्या तीक्ष्णत्वादि गुणांमुळें रक्तस्राव जास्त वाढण्याचा संभव असतो. रक्ताचा दाबहि वाढतो, हृदयास अतिशय उत्तेजन प्राप्त होतें, तें इतकें कीं, हें औषध दिल्या-पासून तास अर्ध्या तासांत नाडीचा वेग खूप सपाटून वाढतो आणि नाडीचे ठोके दर मिनिटास वीस ते तीसपर्यंत अधिक वाढतात. म्हणून नाडीचा वेग वाढला असतां व डोळे लालबुंद, मान हलवणें, किंचाळणें, इत्यादि लक्षणें असतां हा रस न देणें

एवं खल्वे च संस्थाप्यमार्द्रकं वन्हिमूलकं ।
जम्बीरं लशुनं चैव शाङ्गेंष्टार्कस्य मूलकं ।।
लांगली स्वर्णमलं च सिंधुनागदलं तथा ।
अंकोलशिग्रुमूलानि प्रत्येकं याममात्रकं
पंच कोलकषायेण पंचमूलेन मर्दयेत् ।
गुंजामात्रप्रमाणेन वटकान्कारयेत्ततः ।।
वटीमेकां प्रयुंजीत शृंगवेराम्भसा युताम् ।। र. सा. ।।

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

चांगलें. याच्या तीव्रत्वामुळें कित्येक वेळां रक्तवाहिन्या फुटून त्यांतून रक्तस्रावहि होऊं लागतो. या औषधाचे शरीरावर घडणारे असले वाईट परिणाम व हें औषध न देण्याच्या विशिष्टावस्था इतक्या विस्तृतपणें सांगण्याचें कारण कीं, ह्या औषधाचा दुरुपयोग फार होतो; आणि जेथें देऊं नये तेथें हें हटकून दिलें जातें; आणि मग त्याचीं लक्षणें जास्त तीव्र स्वरूपांत दिसूं लागतात. अगोदर संनिपात म्हटला म्हणजे फार कठिण आणि त्यांत अशी भलतीच औषधाची योजना झाली म्हणजे रोग्याच्या त्रासाची अगदीं परमावधि होते. म्हणन असल्या औषधांच्या अवगुणांकडे पूर्ण लक्ष असावें. येवढ्याचकरितां ते वर विस्तृतपणें दिले आहेत.

विशिष्ट अवगुण असलेलें हें औषध, कफप्रधान वातसंसर्गी संनिपातांत फार उत्तम काम करणारें आहे. याचा मुख्यत: उपयोग ग्रंथिक संनिपातांत करण्यांत आला, आणि याच्या गुणामुळें प्लेगाच्या मुख्य औषधांपैकीं हें औषध बनलें. अर्थातच त्याच्या अवगुणांकडे लक्ष न देतां जेथें जेथें हें भरमसाटपणें वापरलें गेलें, तेथें तेथें त्याचा दुरुपयोग होऊन रोगी प्लेगला व औषधाच्या दुर्गुणाला बळी पडले. परंतु ज्या ठिकाणीं याचा बरोबर उपयोग झाला तेथें यानें फारच वहारीचें काम केलेलें आहे.

कफप्रधान संनिपातांत खालील लक्षणें विशेषत: असतां कालकूट रस द्यावा. नाडी स्तिमित, सर्वांग जड, डोकें, विशेषत: आंतील मेंदूचाहि भाग अतिशय जड पडल्यासारखा, तो इतका कीं, जणूं काय डोक्याला जड दगड बांधला आहे असें वाटणें, डोकें उचलतांना अगर हालवितांना सुद्धां तें जड, भयंकर जड, पडलें आहे असें वाटणें. डोकें हलविलें नाहीं किंवा उचलण्याचा प्रयत्न केला नाहीं तोंवर डोकें आपणांस नाहींच असें वाटणें, इतकेंच नव्हे तर, आपण जे जे विचार म्हणन करतों, ते ते आपले नसून दुसऱ्याचे आहेत अशी भावना होणें. ज्ञान, विज्ञान, संज्ञादि सर्व भावना मठ्ठ होणें म्हणजे पुष्कळ प्रयत्न केल्यानंतर फार सावकाश वेळानें थोडी थोडी भावना उमटणें, डोकें विशेष दुखत नाहीं, परंतु एखादी वेदना आलीच तर ती जड, जाड आणि मोठी गंभीर स्वरूपाची असते. डोकें हलविणें म्हणजे जसें कांहीं दहा मणांचें ओझें उचलण्याइतके श्रम होतात. डोळे झांपड पडल्यासारखे, जड, वरच्या पापण्या पडलेल्या, डोळ्यांतील पाणी कमी होऊन ते फटफटीत पडल्यासारखे, डोळ्यांच्या आंतील बाहुली जड झाल्यासारखी, कुणीकडेहि पाहूं नये असें वाटणें, जाड्यता फार म्हणून पाहावेंसें न वाटणें, उजेडाची विशेष आवड, अंधार, गार पाणी किंवा शीतस्पर्शी औषधें यांचा कंटाळा, कित्येक वेळां डोळ्यांतून जाडसर चिकट स्राव होणें, डोळ्यांत जाडसर कांहीं तरी शल्य आहे असें वाटणें, नाकांतून जाडसर श्लेष्मल स्राव किंवा अस्राव, नाकास वास न येणें, गरम पदार्थ किंवा तीक्ष्ण तपकीर हुंगण्यास दिल्यास ठीक असें वाटणें, वासाचा तिटकारा, सगळ्याचाच तिटकारा, ही भावना विशेष असते; जीभ जड, जाडसर झाल्यासारखी वाटणें, त्या

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

जडपणामुळें तोतरे वांकडे शब्द येणें, जिभेवर पांढरट जाड बुरशी असणें, दांतांच्या भागांत व जिभेंतहि मुंग्या निघाल्यासारखें वाटणें व दाभाड जड पडणें.

श्वासोच्छ्वास मोठ्या कष्टानें, श्वासोच्छ्वासाच्या मार्गांत कांहीं विशेष अडथळा नसतो. कफस्थानदुष्टी कमी असून कफदोषदुष्टी जास्त असते. ह्यामुळें श्वासोच्छ्वास फार सावकाश हलके हलके चालू असतो. खोकला विशेष असतोच असें नाहीं. आणि आलाच तर खोल, गंभीर व कुंद असा खोकला येतो. बेडका पांढरा, जाड, जड, घट्ट व जणूं काय आंतून तोंड भरून आल्याप्रमाणें मोठा येतो. बेडक्याला मातरट, गोडसर किंवा कसलीच चव नसते. नाडी मंद स्तिमित असून नाडीचे ठोके एका मिनिटास चाळीस ते पन्नासपर्यंत असतात. असल्या प्रकारची नाडी असतां व कफवातात्मक दुष्टी असतां कालकूटरस जरूर द्यावा. ह्यानें नाडीचा जोर वाढतो, स्तैमित्य कमी होतें, जाड्य जातें आणि ठोकेहि वाढतात.

हातपाय जाड, हातापायांना मुंग्या येणें, हातपाय हलविण्याचा कंटाळा व असामर्थ्य, हातापायांस झटके येणें, ते झटके उन्मादादिकांसारखे नसतात. झटके फार उशिराउशिरानें येतात. झटके म्हणण्यासारखे तीव्र असत नाहींत. अंग जड पडल्यानंतर मनुष्य ज्याप्रमाणें आळेपिळे देतो, त्यासारखे हे असतात. परंतु आळेपिळे हेतुपुरःसर मनुष्य देतो आणि हे झटके अहेतुक असतात. म्हणजे रोग्याला तसें करावेंसें वाटत नसून हें होत असतें. रोग्याला खरोखरी जाणीव अशी फारच थोडी असते. बहुतेक धुंदीच असते. तेव्हां त्याला आळेपिळे देण्याची जाणीव नसतेच. तरी पण वेळावेळानें आळेपिळे येतातच, अशा प्रकारें झटक्यांचें स्वरूप असतें. या विकारांत कालकूट रसाची योजना करावी.

वातकफप्रधान ज्वर (इन्फ्लुएन्झा) या विकारांत कफसंसर्ग व वातलक्षणें असतां कालकूट रस द्यावा. वातलक्षणांचें स्वरूप वर संनिपात ज्वर प्रकरणांत दिलेंच आहे. या ज्वरांत प्रथम प्रथम कापराचा उपयोग बराच होतो. प्रथमपासून कापूर दिला तर या रोगाची वृद्धि फारशी होत नाहीं. परंतु प्रथमतः उपेक्षा केली असतां कफलक्षणें व वातलक्षणें वाढूं लागतात. वातलक्षणांचे दोन प्रकार दिसूं लागतात. एकांत रोगी अर्धवट शुद्धींत असून तगमग, बडबड, भ्रमण, वारंवार घाम सुटणें वगैरे लक्षणें असून मान हलविणें, वारंवार किंकाळ्या मारणें, अशी अवस्था असतां व ज्वरोष्मा कमी असतां लक्ष्मीविलासगुटी हें औषध द्यावें. ज्वरोष्मा जास्त म्हणजे १०२° ते १०४° पर्यंत असल्यास वातविध्वंसन रस द्यावा. परंतु रोगी धुंद, जड, हालचाल अगदीं मंद व मंदज्वर अशीं लक्षणें असतां कालकूट जास्त उपयोगी पडतो. या स्थितींत स्मृतिनाश व झटके असल्यास स्मृतिसागर द्यावा.

कालकूट हें धनुर्वाताच्या विकारांत प्रशस्त औषध आहे. या विकारांत कफप्रधान दुष्टी असल्यास कालकूटाचा प्रशस्त उपयोग होतो. गर्भपातानंतर उत्पन्न होणाऱ्या

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

धनुर्वातांत याचा उपयोग होतो. गर्भपात झाल्यानंतर नीट व्यवस्था राहिली तर मग असला कांहीं विकार उत्पन्न होत नाहीं. परंतु अव्यवस्था झाल्यानें अस्वच्छ हात, कपडे यांचा संसर्ग झाल्यानें धनुर्वात उत्पन्न होतो. या प्रकारच्या धनुर्वातांत रक्तस्राव फारसा होत नाहीं, किंबहुना मुळींच होत नाहीं, अशी खात्री करून घ्यावी. रक्तस्राव किंचितहि असेल तर कालकूट देणें योग्य होणार नाहीं. कालकूटानें धनुर्वाताच्या जन्तूंना प्रतिकारी परिस्थिति शरीरांत निर्माण होते.

गर्भपातानंतर ज्या संप्राप्तीनें धनुर्वात होतो तीच संप्राप्ति सूतिकेलाहि लागू आहे. आयुर्वेदांतील उपपत्तीप्रमाणें निरनिराळ्या अवस्थांतून ह्याच विकारांत निरनिराळीं औषधेंहि द्यावीं लागतात. प्रसूतीच्या नंतर उत्पन्न होणाऱ्या धनुर्वातांत निरनिराळ्या दोषसंयोगानुरोधें सूतिकाभरण, प्रतापलंकेश्वर, ताप्यादिलोह आणि कालकूट ह्या औषधांचा उपयोग विशेष होतो. मक्कल्लशूलादि वातप्रधान लक्षणें जास्त असतां प्रतापलंकेश्वर द्यावा; पित्तभूयिष्ठ लक्षणें असून त्यांत मोठमोठे झटके येत असल्यास ताप्यादिलोह द्यावा, आणि लक्षणें अल्प असतां सूतिकाभरण द्यावा. कफप्रधान लक्षणें, जाड्य, धुंदी, गुंगी, वगैरे लक्षणें असतां कालकूट द्यावा. कालकूट देत असतां रक्तस्राव होत नाहीं याच्याबद्दल खात्री करून घ्यावी.

लहान मुलांना होणारा पूयवृक्क नामक विकार बहुशा सैन्धव व हिरडा यांच्या योगानें बरा होतो. या रोगांत ज्वर पुष्कळ व जोराचा असतो. पायांस व तोंडास सूज असते. तोंडास व सर्वांगास भस्मट रंग येतो. लघवी थोडी, लाल, त्यांत पुवाचे कण असतात. ह्या विकारांत पुढें पुढें मूल तंद्रायुक्त होतें; कित्येक वेळां झटके अगदीं थोडे थोडे येतात, जाड्य फार येतें, आणि मुलाची स्थिति फार भयंकर होते. या स्थितींत कालकूट हें उत्तम कार्य करणारें औषध आहे.

भुग्ननेत्र नामक संनिपाताच्या तीव्रावस्थेंत याचा चांगला उपयोग होतो.

हें औषध फार कडक असल्यामुळें गर्भिणींना देऊं नये. लहान मुलांत याचा, फारच जपून उपयोग करावा. मोठ्या माणसासहि द्यावयाचें तें अगदीं जपून आणि अगदीं जरूर तितकेच दिवस योग्य प्रमाणानें द्यावें. जास्त दिवस सारखें सुरू ठेवूं नये. कित्येक वेळां कालकूटानें गळा सोलून जातो, जीभ येते आणि फार उष्णता वाढते.

कालकूटांतील बचनाग–ज्वरघ्न, स्वेदल व वेदनाहर; कज्जली–जंतुघ्न, व्यवायी व विकाशी; मनशीळ–रसायन व उष्णवीर्य; ताम्रभस्म– आक्षेपकघ्न, यकृत्पित्तस्रावी व म्हणन ग्रहणींतील सेंद्रिय विषारांचें शमन करणारें; टांकणखाराची लाही–आक्षेपकघ्न, जंतुघ्न व कफघ्न; हरताळ–उष्णवीर्य, रसायन व योगवाही; चित्रक–यकृत्पित्ताचा सम्यक् स्राव करविणारें, आक्षेपकघ्न, पाचक, दीपक, वातहर व

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आंत्रांतील सेंद्रिय विषारांचा नाश करविणारें; त्रिकटु–पाचक व दीपक; त्रिफळा–रसायन व किंचित् सारक; हिंग–आक्षेपकघ्न, वातनाशक, व शूलघ्न; वेखंड–आक्षेपकघ्न; ह्यांस देण्यांत येणाऱ्या भावना–वातघ्न, रसायन व योगवाही अशा औषधांच्या आहेत.

२३. कासकुठार रस

*हिंगूळ, मिरें, गंधक, सुंठ, मिरें, पिंपळी, टांकणखाराची लाही ह्यांचा [illegible] याच्या रसांत खल करावा. यास कासकुठार असें म्हणतात.

प्रमाण:–एक ते दोन गुंजा.

हें औषध ओल्यांत भिजल्यानें, अत्यंत शीतोपचार केल्यानें उत्पन्न होणाऱ्या सान्निपातिक ज्वरांत किंवा कफप्रधान ज्वरांत चांगल्या प्रकारें उपयोगी पडतें. हीं कारणें होऊन नुसता जडपणा व त्याबरोबर वेदना, अंगाची ठसठस वगैरे लक्षणें असतां हें औषध फारसें उपयोगी पडत नाहीं. परंतु याच्या पुढची अवस्था म्हणजे कफस्राव पुष्कळ होऊन अगदीं खवखवल्यासारखा पुष्कळ कफ पडणारा असा खोकला असतां या रसाचा उपयोग करावा. कफभूयिष्ठ दोषापासून उत्पन्न होणारा शिरोरोग, यांत डोकें भारी भारी वाटणें, वेदना तीव्र नसून जडपणा विशेष वाटण, हीं लक्षणें असतां कासकुठार द्यावा.

कासकुठारांतील हिंगूळ–जंतुघ्न, कफांतील क्लेद कमी करणारा व उष्णवीर्य; मिरें–उष्णवीर्य, कफोत्क्लेश कमी करणारें व पाचक; गंधक–जंतुघ्न व रसायन; त्रिकटु–पाचक व दीपक; आणि टांकणखाराची लाही–आक्षेपकघ्न, कफांतील घाण व कफाचें स्कन्नत्व कमी करणारी आहे.

२४. कुमुदेश्वर रस

‡ दोन भाग ताम्रभस्म, एक भाग वंगभस्म, हीं एकत्र खलून ज्येष्ठमधाच्या रसाच्या चांगल्या प्रकारें संमिश्र होईपर्यन्त (त्यास) भावना द्याव्यात. अर्धा ते एक मासा प्रमाणाच्या गोळ्या कराव्यात.

प्रमाण:—अर्धी ते दीड गुंज.

---

* हिंगुलं मरिचं गंधं सव्योषं टङ्कणं तथा।
द्विगुञ्जं चार्द्रकद्रावैः सन्निपातं तु दारुणम्।
कासं नानाविधं हन्ति शिरोरोगं च दारुणम् ॥ र. सा. ॥

‡ मृतताम्रस्य भागौ द्वौ भागैकं वङ्गभस्मकम्।
यष्टीमधुरसैर्भाव्यं शुष्कं माषार्धकं शुभम्॥
सेवयेच्चानुपानेन वक्ष्यमाणेन बुद्धिमान्।

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

ग्रंथोक्त गुणधर्मः—

छर्दि तृष्णां निहन्त्याशु रसो यं कुमुदेश्वरः ॥ र. चं. ॥

ग्रंथांत हा रस तृष्णाचिकित्सेंत दिलेला आहे. तृष्णा हें उपलक्षण आहे. स्वतंत्र रोग नाहीं. ह्या औषधाचा पाठ व भावना यांचा विचार करतां, केवल पित्तज तृष्णा या औषधानें शमन पावते असें नसून मधुमेहांत उत्पन्न होणारी किंवा आमज तृष्णेंत याचा उपयोग विशेष होतो. मधुमेहाचा विकार यकृताच्या अशक्ततेपासून निर्माण झालेला असल्यास, वारंवार पुष्कळ मूत्रोत्सर्ग होत असल्यास व रोगी कृश असून ओजक्षय पुष्कळ झालेला असल्यास कुमुदेश्वर द्यावा. कुमुदेश्वर चंदन, सारिवा, नागरमोथा, क्षुद्रैला, नागकेशर, व लाह्या ह्यांच्या काढ्यांत मध टाकून त्याबरोबर दिल्यास जास्त उपयोग होतो.

आमज तृष्णेंतहि या औषधाचा, ज्येष्ठमधाच्या काढ्याबरोबर दिल्यास, चांगला उपयोग होतो.

शुक्रस्खलनाच्या संवयीमुळें अपचन व बद्धकोष्ठ हे विकार उत्पन्न होतात आणि मग यत्किंचित् जड अन्न वगैरे सेवन केल्यास तें पचन होत नाहीं आणि मग अपचन वाढल्यामळें शुक्रस्राव वारंवार होत राहातो. अशा प्रकारें रोगी अगदीं जर्जर होऊन जातो. रोगी कृश होतो, त्याच्या तोंडावरचें ओज अगदीं कमी होतें, तो दीनवाणा होतो आणि आपल्या जिवास अगदीं कंटाळल्यासारखा होऊन जातो. हा विकार अतिशय त्रासदायक असून याचा फैलाव हल्लीं पुष्कळ झालेला आहे. कुमुदेश्वर रसानें या विकारांत फार लवकर व चांगल्या प्रकारें बरें वाटतें.

कुमुदेश्वरांतील वंगभस्म—मेहनाशक, ओजोवृद्धिकर व शुक्रस्तंभक आहे. ताम्रभस्म—यकृताला शक्तिदायक, पचन वाढविणारें व आमपाचक आहे; यष्टिमधु—कफघ्न, जीवनीय व रसायन असें आहे.

२५. कुष्ठकुठार रस (गलत्कुष्ठारिः)

* पारदभस्म (तदभावे रससिंदूर), शुद्ध गंधक, लोहभस्म, ताम्रभस्म, गुग्गुळ,

---

चंदनं सारिवा मुस्तं क्षुद्रैलां नागकेशरम् ॥
सर्वतुल्यास्तथा लाजाः पचेच्छोडशिकैर्जलैः ।
अर्धशेषं हरेत् क्वाथं सिताक्षौद्रयुतस्तु सः ॥
छर्दि तृष्णां निहन्त्याशु रसो यं कुमुदेश्वरः ॥ र. चं. ॥

कुमुदेश्वराचे वाङ्मयांत आणखीहि तीन पाठ सांपडतात; स्थलसंकोचास्तव येथें ते दिले नाहींत. जिज्ञासूंनीं रसयोगसागर वगैरे ग्रंथांत ते पाहावे.

* सूतभस्मसमं गंधं मृतायस्ताम्रगुग्गुलुः ।
त्रिफलाविषमुष्टिश्च चित्रकश्च शिलाजतु ॥

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

सुंठ, मिरें, पिंपळी, शुद्ध कुचला, चित्रक, शिलाजतु हीं सर्व सोळा सोळा भाग, चौसष्ट भाग करंजबीज चूर्ण व चौसष्ट भाग अभ्रकभस्म हीं सर्व एकत्र मिश्र करून चांगलें उत्तम मिश्रण झाल्यानंतर तें तूप व मध यांत चांगलें मिसळावें व स्निग्ध भांड्यांत तें सर्व मिश्रण ठेवून द्यावें. यास कुष्ठकुठार रस असें म्हणतात. हें औषध देत असतां मधुर रस विशेष खाण्यास द्यावा.

प्रमाणः––एक ते चार गुंजा.

ग्रंथोक्त गुणधर्मः––

रसः कुष्ठकुठारोऽयं गलत्कुष्ठनिकृन्तनः ।
पथ्यं तु मधुरं देयं तदभावे गुडौदनम् ॥

हें औषध गलत्कुष्ठावस्थेंत चांगलें उपयोगी पडतें.अभ्रकांतील धातुपरिपोषण-क्रम व्यवस्थित करण्याचा धर्म ह्या औषधांत चांगल्या तऱ्हेनें प्रत्ययास येतो. कुष्ठामध्यें त्वचा, रक्त, मांस व रक्तांतील लसिका, या क्रमानें शरीरांत दुष्टी होते. गलत्कुष्ठांत त्वचा अगदीं कुजल्यासारखी होऊन जाते. तिच्यांतील वरचे वरचे भाग विशेषेंकरून बोटांचे भाग, टवकेच्या टवके पडून गळून गेल्यासारखे होतात, त्वचेची संवेदना कमी झाल्यामुळें किंबहुना नष्टप्राय झाल्यामुळें बोटांचे किंवा पायांचे इतकाले टवके निघूनहि त्यांपासून पीडा तारतम्यानें बेताची असते. ज्या भागांतून टवका निघून मांसल भाग उघडा पडेल त्या भागांतून सारखा लसिकास्राव क्लेदयुक्त, घाणेरडा होत राहून तो सगळा भाग अगदीं फदफदित व उतून आल्यासारखा होतो. आणि इतकें असूनहि आग किंवा वेदना, अगदीं बेताची असते. जडपणा, हातपाय उचलूं नयेसें वाटणें, आळस, तो इतका कीं, निजल्या जागींच किती तरी वेळ पडावेंसें वाटणें, झोंप फार, त्वचेचा वर्ण बदलणें, सर्वांगास अत्यंत रुक्षता, त्वचा सगळी फुटीर, फुगल्यासारखी, स्पर्श बरोबर न कळणें, खाज, व्रण झाला असतां त्यांतून घाणकट स्राव व व्रणभाग लवकर भरून न येणें, घाम पुष्कळ व त्याला एक प्रकारची घाण, असल्या प्रकारच्या कुष्ठाच्या अवस्थेंत हा रस द्यावा. त्याबरोबर मधुर रसाचें सेवन जास्त करावें. गलत्कुष्ठारि रसाचा उपयोग करीत असतां कित्येक वेळां दाह

इत्येवं चूर्णितं कुर्यात्प्रत्येकं निष्कषोडश ।
चतुःषष्टि करंजस्य बीजचर्णं प्रकल्पयेत् ॥
चतुःषष्टि मृतं चाभ्रं मध्वाज्याभ्यां विलोडयेत् ।
स्निग्ध भाण्डगतं खादेत् द्विमाषं सर्वकुष्ठजित् ॥ र. सा. ॥
पातालगारुडीमूलं मधुपुष्पी च धान्यकम् ।
सितया भक्षयेत्कर्षमतितापप्रणुत्तये ॥
लिहयान्नागबलामूलं मध्वाज्यैर्हन्तितापकम् ॥ र. सा. ॥

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

जास्त होतो. या रसाचा मुख्य उद्देशच संज्ञावाहिन्यांना पुन्हां संज्ञा सम्यक् प्राप्त होईल अशा प्रकारें कार्य करण्याचा असल्यामुळें यापासून दाह होणें क्रमप्राप्तच होय. असा दाह होऊं लागला असतां पातालगरुडीचें मूळ, मधुपुष्पीचें फूल व वनें यांचें समभाग चूर्ण करून त्यांत समभाग साखर टाकून हें चूर्ण एक तोळा प्रमाणानें घ्यावें, म्हणजे दाह कमी होतो.

कुष्ठकुठाराचा जुनाट बद्धकोष्ठाच्या विकारांत उपयोग करतां येईल.

कुष्ठकुठारांतील पारदभस्म–रसायन व योगवाही; गंधक–त्वग्गत दोषदुष्टिनाशक व रक्तप्रसादक; लोहभस्म–शक्तिवर्धक व रक्तप्रसारक; ताम्रभस्म–यकृतोत्तेजक, पित्तस्रावक व ग्रहणींतील सेंद्रिय विषारें नाहींशीं करणारें; गुग्गुळ–रसायन, योगवाही, वातशामक व कोष्ठशुद्धिकर; त्रिफला– रसायन व मृदु विरेचक; कुचला–यकृतोत्तेजक, वातवाहिन्यांना उत्तेजक, शक्तिवर्धक व संज्ञावाहिन्यांची संवेदना वाढविणारा; चित्रक–पाचक, यकृतोत्तेजक व यकृत्पित्ताचा सम्यक् स्राव करविणारें; शिलाजतु–धातु परिपोषणक्रम सुधारणारें, रसायन व योगवाही; करंजाचें बीं–रक्तप्रसादक, संशोधक व त्वग्गत कुष्ठदोषांचें शमन करणारें; अभ्रक–धातुपरिपोषणक्रम व्यवस्थित करणारें, मनोव्याघातजन्य दोष नष्ट करणारें, शारीरिक घटकांची प्रतिकार शक्ति वाढविणारें, जीवनीय, बल्य व रसायन असें आहे.

२६. कृमिकुठार रस

* कापूर आठ भाग, इंद्रजव एक भाग, त्रायमाण, अजमोदा, वावडिंग, हिंगूळ, बचनाग, नागकेशर हीं सर्व एक एक भाग घेऊन त्या सर्वांचा माक्याच्या रसांत प्रथम खल करावा. नंतर सर्वांच्या[१] बरोबरीनें[१] पळसाच्या बियांचें चूर्ण मिसळून उंदिरकानीच्या रसाची भावना देऊन नंतर ब्राह्मीच्या रसाची भावना द्यावी, व एक ते दोन गुंजा प्रमाणांत गोळ्या करून योग्य त्या अनुपानाबरोबर द्याव्या.

---

* कर्पूरं चाष्टभागं च कौटजश्चैकभागिकः ।
तत्समानं त्रायमाणमजमोदाविडङ्गकम् ।।
हिंगूलं विषभागं[१] च तत्समानं च केसरम् ।
सर्वं दृढं च संमर्द्य भृंगराजरसैस्तथा ।।
पलाशबीजं संमिश्र्य उन्दरीरसभावितम् ।
ब्राह्मीरसं ततो दत्त्वा सिध्येत्कृमिकुठारकः ।।
वल्लमात्रां वटीं कुर्याद्दद्याद्धेमसमन्विताम् ।
कुर्यात्कृमिविनाशं च सर्वशः सप्तभिर्दिनैः ।। र. चं. ।।

१ संस्कृत पाठांत पळसाचें बीं घालून उंदिर कानीच्या रसाची भावना द्यावी असें आहे. पण प्रथा जशी आहे कीं सर्वांच्या बरोबरीनें पळसपापडी चूर्ण घालायचें.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

प्रमाणः—एक ते दोन गुंजा.

क्रमींच्या एकंदर वीस जाती आयुर्वेदांत दिलेल्या आहेत. हल्लीं पुष्कळ प्रकारचे क्रमि ज़ास्तहि शोधून काढण्यांत आलेले आहेत. कांहीं क्रमि दृश्य तर कांहीं अत्यंत सूक्ष्म असल्याकारणानें (साध्या डोळयांनीं) अदृश्य असे आहेत. क्रमींपासून निरनिराळे अनेक व्याधी निर्माण होतात. ह्या व्याधींस क्रमि हें निमित्तकारण असतें. क्रमींपासून दोषप्रकोप व दोषप्रकोपापासून रोग अशी परंपरा कांहीं ठिकाणीं असते. तर मलसंचय अधिक व नंतर त्यांत क्रमींची उत्पत्ति अशीहि परंपरा कांहीं ठिकाणीं असते. कफजक्रमि, पुरीषजक्रमि हें दुसऱ्या प्रकारचें उदाहरण होय. व जंतांपासून अतिसार, कोष्ठशूल, आचके वगैरे हें पहिल्या प्रकारचें उदाहरण होय. क्रमींच्या निरनिराळ्या जातींपासून निरनिराळे लक्षणयुक्त रोग निर्माण होतात. जंत, बारीक आळ्यासारखे क्रमि, गव्हले, बोटवे यांच्या सारखे क्रमि, यांच्या योगानें शूल, अतिसार, वातरोग, वगैरे निर्माण झालेले असल्यास क्रमिकुठाराचा उपयोग करावा; गोल व लांबट जंत पडण्याकरितां क्रमिकुठाराचा कितपत उपयोग होतो याबद्दल शंका आहे; परंतु बाकीच्या क्रमींमध्यें मात्र क्रमिकुठार हें उत्कृष्ट औषध आहे.

सूक्ष्मदर्शक यंत्रानें दिसणारे बारीक क्रमि व त्यांच्यापासून होणारे पांडुरोग, अतिसार हे विकार; यांमध्यें डोळयांचीं पोटें सुजतात, भुवयांच्या वरचा भाग सुजतो, कानफटावर सूज असते, हातपाय, नाभि व मेहन यांवरहि सूज असते, वर्ण अगदीं पांढरा फटफटीत पडलेला असतो, आणि शौचास रवत पडतें, आंव पडते व त्याबरोबर भरभरित मलहि पडतो. या प्रकारच्या क्रमिकोष्ठांत क्रमिकुठार हें चांगल्या प्रकारें लागू पडतें. मात्र याच्या गोळ्या गिळण्यास सांगाव्या, किंवा गोळी एकाद्या कांजी-बरोबर गिळण्यास द्यावी. हेतु हा कीं, याचें आमाशयांत वियोजन होऊं नये. आमाशयांत त्याचें वियोजन झाल्यास आमाशयाचा क्षोभ होतो आणि यांतील कांहीं औषधींचें आमाशयांतच पचन होऊन क्रमिहरत्व कमी होतें. याचें वियोजन पक्वाशय व ग्रहणी म्हणजे लहान व मोठीं आंतडीं यांत व्हावें लागतें.

पक्वाशय व ग्रहणी यांत पुरीषज क्रमि वास्तव्य करितात. त्यांपासून ज्वर, मळमळ सुटणें, नाकास व सर्वांगास खाज सुटणें, सर्वांगावर गांधी येऊन शीतपित्त व उदर्द यांसारखीं मोठमोठालीं चकंदळीं उठणें ह्या विकारांत क्रमिकुठाराचा उपयोग करावा.

क्रमिज हृद्रोग, वस्तुतः हा विकार हृदयाचा नसून हृत्संनिध भागाचा (आमाशयाचा) असतो. आमाशयांत कफसंचय झाल्याच्या योगानें किंवा जुनाट व्रण पुष्कळ दिवस असल्याकारणानें त्यांत बारीक बारीक क्रमि उत्पन्न होतात, पोट फार दुखतें, आम्लपित्तासारखी जळजळीत, आंबट, वारंवार वांति होते, अन्नाचें पचन

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

होत नाहीं; त्यामुळें रोगी अत्यंत क्षीण होतो. ह्या विकारांत कामदुघा, सूतशेखर, या औषधांचा पुढें उपयोग होतो; परंतु प्रथमतः कृमिकुठार देऊन कृमींचा नाश करणें जरूर असतें. हे कृमि एकदम नष्ट होत नाहींत; वारंवार कृमिकुठार द्यावा लागतो.

मध्यम कोष्ठांत निरनिराळ्या प्रकारच्या कृमींच्या योगानें कित्येक वेळां अगदीं क्षयासारखीं लक्षणें होतात. वरवर पाहणारास हीं लक्षणें, क्षयलक्षणें आहेत, असेंहि भासण्याचा संभव असतो; परंतु उदरपरीक्षण आणि लक्षणांचें निरीक्षण यांयोगें निदान स्वच्छ होतें. कृमींचें निदान झाल्यास कृमिकुठार देऊन नंतर विरेचन द्यावें. या औषधानें असल्या रोग्यास पुष्कळ वेळां जीवदान दिलें आहे.

लहान मुलांस आचके येणें, मोठ्या माणसाचा आक्षेप किंवा झटके, शीर्षशूल, कोष्ठशूल, विशेषतः आंत्रपुच्छाजवळ शूल, बद्धकोष्ठ, पांडुता इत्यादि रोगांत कृमि कारण असू शकतात. यांत कृमिकुठाराचा चांगला उपयोग होतो.

कुठारांत कापूर व पळसपापडी असल्याकारणानें त्याचा उपयोग कफस्रावी असाही होतो. लहान मुलांच्या खोकल्यांत याचा उपयोग करावा. हें किंचित् हृद्यही आहे.

कृमिकुठाराचा मोठ्या प्रमाणांत उपयोग केल्यास त्यापासून घाम सुटणें, उमासे, हातापायाला मुंग्या येणें वगैरे लक्षणें होतात. सबब मोठें प्रमाण केव्हांहि देऊं नये. कृमिकुठारांतील कापूर–बारीक जातीचे जंतू गुंगविणारा; पळसपापडी–वामक परंतु बऱ्याच निरनिराळ्या जातींचे कृमिहारक; वावडिंग आल्यासारखें बारीक कृमिनाशक इंद्रजव–यकृतोत्तेजक, पित्तविरेचक व किंचित सारक; त्रायमाण– सारक; नागकेशर–पळसपापडीनें येणारे उमासे कमी करणारें; बचनाग–शूलघ्न आणि हिंगूळ–जंतुघ्न, रसायन व योगवाही; माका वातशामक व पक्वाशयस्थ दोष शमन करणारा.

२७. कृमिमुद्गर रस

*पारा, गंधक, अजमोदा, वावडिंग, कुचला आणि पळसपापडी (पळसाचें बीं) हीं क्रमवृद्धीनें घेऊन त्यांचें चूर्ण करावें. नंतर त्यास नागरमोथ्याच्या काढ्याच्या भावना देऊन चांगलें सुकवावें. नंतर मधांत खलून त्याच्या गोळ्या तयार कराव्यात. ग्रंथकारानें चूर्ण मधाबरोबर घेऊन त्यानंतर नागरमोथ्याचा काढा वर पिण्यास सांगितलें आहे. परंतु आजच्या स्थितींत पळसपापडी व कुचला यांचें एवढें मोठें

---

* क्रमेणवृद्धं रसगंधकाजमोदा विडङ्गम् विषमुष्टिकं च ।
पलाशबीजं च विचूर्ण्यमस्य निष्कप्रमाणं मधुनाऽवलीढम् ॥
पिबेत्कषायं घनजं तदूर्ध्वं रसोयमुक्तः कृमिमुद्गराख्यः ॥ यो. र. व बृ. यो. त. ॥

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

प्रमाण मधाबरोबर चाटणें प्रकृतीस सहन होणें कठीण आहे. सबब वर लिहिल्याप्रमाणें पर्याय करावा.

प्रमाणः—पाव ते एक गुंज

ग्रंथोक्त गुणधर्म—

क्रमिन्निहन्ति कृमीजांश्च रोगान् संदीपयत्यग्निमयं निराद्मात् ॥
यो. र. व बृ. यो. त.

ह्या रसाचा विशेष असा कीं, कोष्ठास प्राप्त झालेलें शैथिल्य व त्यामळें क्रमींना बाहेर ढकलून देण्याची अशक्तता, ह्या रसांतील कुचल्याच्या योगानें कोष्ठाला, विशेषत: पक्वाशय व ग्रहणी या अवयवांना उत्तेजन मिळून नाहींशी होते. पुष्कळ वेळां कृमिघ्न औषधांचा परिणाम आपणांस इष्ट असा होत नाहीं. याचें कारण कोष्ठावयवांची स्वतःची तयारी ह्या अक्षमतेमुळें नसते. कोणतेंही औषध आपापलें काम नीट व्यवस्थितपणें करूं लागल्यास शरीराच्या मदतीची फार जरूरी असते. ही मदत शरीराकडून होत नसल्यास औषधींचें कार्य व्हावें तसें होत नाहीं. किंबहुना ती तशीच पडून जाते असें म्हटलें तरी चालेल. ही अडचण लक्षांत घेऊन आयुर्वेदानें मोठ्या मार्मिकपणें अशा प्रकारें द्रव्यसंयोगाची योजना केलेली आहे.

क्रमिमुद्गर रस जास्त तीव्र आहे. त्यामुळें हा रस कफजक्रमि व पुरीषज क्रमि यांत जास्त उपयोगी पडतो. क्रमींच्या योगानें वातक्षीणतेचीं लक्षणें उत्पन्न झालेलीं असल्यास क्रमिमुद्गर रसाचा उपयोग करावा. अजमोदा, वावडिंग यांमुळें पलाशबीज कोष्ठांत त्रास देत नाहीं, स्थिरावून राहातें व आपला प्रभाव दाखवितें.

कफापासून उत्पन्न होणारे क्रमि बहुतेक आमाशयांत उत्पन्न होतात; आणि ते वाढले म्हणजे आमाशयाच्या सर्व भागांत इतस्ततः वावरतात. जाडसर सुरवंटासारखे असे कांहीं क्रमि असतात, तर कांहीं गांडूळासारखे असेहि असतात. कांहीं धान्याच्या मोडासारखे, कांहीं अतिशय बारीक, कांहीं बरेच लांबट तर कांहीं क्रमि इतके बारीक असतात कीं, साध्या डोळ्यानें ते दिसत नाहींत. ह्या सर्व क्रमींपैकीं कांहींचा वर्ण पांढऱ्या आळ्यांसारखा, कांहींचा तांबूस, तर कांहींचा काळसर-तांबूस असा असतो. मळमळ सुटणें, तोंडास पाणी सुटणें, अन्नाचा विपाक बरोबर न होणें, व अरुचि हीं लक्षणें यांत प्रामुख्यानें असतात. क्रमींची वृद्धि फार होऊन बलवान दोषदुष्टि झाल्यास सारखी सतत वांति, ज्वर, व त्यांतच मूर्च्छा, पोट फुगणें, वारंवार उचकी हीं लक्षणें उत्पन्न होतात. हे क्रमि पुष्कळ दिवस शरीरांत राहिल्यास रसादि धातू चांगल्या प्रकारें उत्पन्न न झाल्यामुळें मनुष्य कृश होतो. त्यास वारंवार पडसें येतें,

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

शिका येतात, खोकला येतो, पोटदुखी लागते आणि अशा प्रकारचें त्याचें आयुष्य मोठें कष्टमय होऊन बसतें. या सर्व प्रकारांत कृमिमुद्गर रसाचा उपयोग करावा.

कृमिमुद्गरांतील कज्जली–रसायनी, योगवाही व जंतुघ्न; अजमोदा–दीपक व पाचक; वावडिंग व पळसपापडी–कृमिहारक; कुचला–उत्तेजक, शैथिल्यनाशक व शक्तिदायक आणि नागरमोथा–आमपाचक व दीपक अशीं आहेत.

२८. क्रव्याद रस

* आठ तोळे गंधक, चार तोळे पारा, एक तोळा ताम्रभस्म आणि एक तोळा लोहभस्म हीं एकत्र खलून त्यांची कज्जली करावी. नंतर लोखंडाच्या कढईंत अग्नीवर ही कज्जली पातळ करून एरंडाच्या पानावर तो रस ओतावा; आणि पर्पटी–विधीनें त्याची पर्पटी तयार करावी. पर्पटी बारीक करून पुन्हां लोखंडाच्या कढईंत टाकून ती कढई चुलीवर ठेवावी आणि खालीं अगदीं मंदाग्नि लावावा. त्यावर ज्ञासराचा रस वारंवार टाकून जिरवावा. २५६ तोळेपर्यंत रस जिरल्यानंतर कढई खालीं उतरून निवूं द्यावी. नंतर त्यास पिंपळी, पिंपळमूळ, चवक, चित्रक, सुंठ व अम्लवेतस यांच्या काढ्याच्या पन्नास भावना द्याव्या. नंतर त्याच्या बरोबरीनें टांकणखाराची लाही त्यांत मिळवावी. टांकणखाराच्या लाहीच्या निम्म्यानें त्यांत पंचलवण मिसळावें व सर्वांच्या बरोबरीनें मिऱ्यांचें चूर्ण त्यांत मिश्रण करावें. नंतर ह्या सर्व मिश्रणास हरभऱ्याच्या क्षार पाण्याच्या सात भावना देऊन कडक वाळवून चांगलें बारीक चूर्ण करून कांचेच्या बाटलींत भरून ठेवावें. याला महाक्रव्याद रस असें म्हणतात.

प्रमाण:—दोन ते चार गुंजा.

---

* द्विपलं गंधकं शुद्धं द्रावयित्वा विनिक्षिपेत् ।
पारदं पलमानेन मृतशुल्बायसी पुनः ।।
कर्षमानेन संमिश्र्य पञ्चाङ्गुलदले क्षिपेत् ।।
ततो विचूर्ण्य यत्नेन निक्षिप्यायसपात्रके ।
चुल्यां निवेश्य यत्नेन चालयेन्मृदुवन्हिना ।।
पात्रं पात्रं हि जंबीररसं तत्र प्रचारयेत् ।
पञ्चकोलसमुद्भूतैः कषायैः साम्लवेतसैः : ।।
भावनाः खलु दातव्याः पञ्चाशत्प्रमितास्तथा ।
भृष्टटंकणचूर्णेन तुल्येन सह मेलयेत् ।।
तदर्धैः पंचलवणैः सर्वतुल्यमरीचकैः ।
सप्तधा भावयेत्पश्चाच्चणकक्षारवारिणा ।।
ततः संशोष्य संपेष्य कूपिकाभ्यंतरे क्षिपेत् ।। यो. र. ।।

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

ग्रंथोक्त गुणधर्म:—

अत्यंतगुरुभोज्यानि गुरुमांसान्यनेकशः ।
भक्षयेत्कंठपर्यंतं ततो देयो रसोत्तमः ।।
चतुर्वल्लमितो देयः तक्रैः सलवणैरपि ।
भुक्तं जीर्यति तत्क्षिप्रं जायते दीपनं परं ।।
रसः क्रव्यादनामायं प्रोक्तो मंथानभैरवैः ।
सिंहलक्षोणिपालाय भूरिमांसभुजे तथा ।।
ततः क्रव्यादयं प्रोक्तो दृष्टप्रत्ययकारकः ।
कुर्याद्दीपनमुद्धतं पवनजं देहे परं शोषणम् ।।
पाठभेद–पचनं दुष्टामसंशोषणम् ।।
तुन्दस्थौल्यनिबर्हणो गरहरो दुष्टव्रणार्तिप्रणुत् ।।
पाठभेद–मूलार्तिशूलापहम् ।।
कासश्वासविनाशनो ग्रहणिकाविध्वंसनः स्रंसनो ।।
पाठभेद–गुल्मप्लीहविनाशनः ।।
गुल्मप्लीहजलोदरोपशमनः क्रव्यादनामा रसः ।।
पाठभेद–वातग्रंथिमहोदरापहरणः ।।
विश्वहिंगविडैः सार्धं क्रव्यादो भक्षितो रसः ।।
गुल्मानशेषान्प्लीहानं विद्रधीनपि नाशयेत् ।। यो. र. ।।

क्रव्याद रसाचे महाक्रव्याद, क्रव्याद व लघुक्रव्याद रस असे तीन पाठ वाङमयांत सांपडतात. परंतु महाक्रव्यादासच क्रव्याद म्हणण्याची परंपरा आहे व त्या अनुरोधें येथें क्रव्याद रसाचा पाठ दिला आहे. हा रस अत्यंत दीपन, पचन वाढविणारा असून मध्यम कोष्ठांतील सर्व पचनेंद्रियांना उत्तेजित करून त्यांचें शैथिल्य नाहींसें करून पचनेंद्रियांचे व्यापार जोरकस करणारा असा आहे.

मांसाशी लोकांना व इतर प्रकारचीं जड अन्नें खाणाऱ्या लोकांना हें औषध चांगल्या प्रकारें उपयोगी पडतें. मांसाचें किंवा जडान्नाचें चांगल्या प्रकारें पचन न झाल्यामुळें अलसक, विलंबिका, विषूचिका इत्यादि अजीर्णजन्य विकार उत्पन्न झाल्यास त्यांत या रसाची योजना ताक व मीठ यांजबरोबर करावी. पित्तजन्य विदग्धाजीर्ण व त्यापासून उत्पन्न झालेला अतिसार यांत मात्र या रसाचा उपयोग न केलेला बरा.

अन्नाचें पचन नीट न झाल्यामुळें अन्नरस नीट तयार होत नाहीं, आणि त्याचें-हि रूपांतर व्यवस्थित न झाल्यामुळें आमोत्पत्ति होते. अशा प्रकारें आमाचा संचय झाल्यामुळें आम दुष्ट होतो, आणि त्याच्यामुळें निरनिराळे आमविकार उत्पन्न होतात.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आमाजीर्ण, रसशेषाजीर्ण हे त्याचे तीव्र प्रकार आहेत. आमसंचय जास्त झाल्यास शूल, अतिसार, ग्रहणी, बद्धकोष्ठ वगैरे विकार उत्पन्न होतात. या सर्व विकारांच्या बुडाशीं असलेल्या दुष्ट आमाचें पचन करून संशोधन करणें हें कार्य क्रव्यादरसाच्या योगानें फार चांगल्या प्रकारें होतें. (प्रथमतः लंघन देऊन नंतर क्रव्यादरसाची योजना करावी.)

धातुपरिपोषणक्रमाचा एकंदर व्यापार असा आहे कीं, पूर्वधातूतून परधातू आपले अंश शोषून घेऊन ते आपलेसे करून स्वतः तो धातु वाढतो व त्यानें झालेली झीज अशा रीतीनें भरून निघते. जोंवर हा क्रम नीट व्यवस्थित चाललेला असतो तोंवर, एकच एक धातु जास्त वाढत नाहीं. परंतु एकदां एकादा धातु वाढण्याची प्रवृत्ति शरीरांत झाली म्हणजे तोच तो धातु जास्त वाढत जातो व पुढचे इतर धातू त्या मानानें चांगल्या तऱ्हेनें वाढत नाहींत. या न्यायानें शरीरांत एकदां मेद वाढावयास लागला म्हणजे तो सारखा वाढतच जातो व मनुष्य खूप स्थूल व तुंदिल बनतो. हें स्थौल्य किंवा तुंदिलत्व नाहींसें होण्याकरितां धातूंमधील परधातूंना लागणारीं द्रव्यें बनविण्याचा धर्म अर्थात् पचन वाढलें पाहिजे म्हणजे एकाच धातूची झालेली वृद्धि कमी होऊन पुढचे पुढचे दुसरे धातू चांगल्या प्रकारें वाढूं लागतात. हें कार्य क्रव्याद रसाच्या योगानें धात्वंतरगत पचन वाढून चांगल्या प्रकारें होतें.

मध्यम कोष्ठांत पुष्कळ दिवसांच्या अपचनापासून अन्नांतील सारांश किंवा किट्टांश संचित होतात. या संचयामुळें निरनिराळ्या प्रकारचीं सेंद्रिय विषारें निर्माण होतात. हीं विषारें पुष्कळ दिवसपर्यंत तेथेंच वास्तव्य करून सर्व शरीर दुष्ट करीत असतात हीं जुनाट स्वरूपाचीं असतात. विरुद्ध, दूषित व वेड्यावांकड्या अन्नाच्या योगानें गरनिर्मिति होते. विशेषतः आम्बलेल्या, शिळ्या, मांसयुक्त अशा अन्नांत गरनिर्मिति फार होते. गर, यालाच कृत्रिमविष किंवा निर्विष पदार्थांत स्वयंदुष्टि होऊन उत्पन्न झालेलीं विषारें, अशी संज्ञा आहे. गर विषाप्रमाणेंच किंबहुना विषापेक्षांहि जास्त भयंकर आहे. गरांचीं लक्षणें दोषानुरोधें निरनिराळ्या प्रकारचीं होतात. ज्या प्रकारच्या गराच्या योगानें कफप्रधान व कफवातप्रधान अशीं लक्षणें उत्पन्न होतात त्या ठिकाणीं क्रव्यादरसाचा चांगल्या तऱ्हेनें उपयोग होतो.

मुळव्याधीच्या आजारांत कफप्रधान दोष असतां आणि मुळव्याधीच्या मोडास ठणका, शौचास चिकट, फेंसाळ, मोड पांढरे लठ्ठ व वारंवार शौचास शंका हीं लक्षणें असतां क्रव्याद रसाचा ताकावरोबर उपयोग करावा.

पुष्कळ दिवसांचें अपचन, विशेषेंकरून गुरु व स्निग्ध अन्न जास्त खाल्ल्याच्या योगानें उत्पन्न झालेलें किंवा मांसाशनाच्या योगानें उत्पन्न झालेलें अपचन व त्यामुळें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आमसंचय होऊन त्याच्या योगानें वारंवार शूल उत्पन्न होणें, पोट जड वाटणें, पोटांत वारंवार ढवळून येणें, तोंड फिकट व टापसल्यासारखें होणें, हीं लक्षणें असतां क्रव्याद रसाची योजना करावी. याच्या योगानें आमाचें पचन होऊन शूल नाहींसा होतो.

वातगुल्म व कफगुल्म या विकारांत क्रव्यादरसाचा उपयोग करावा.

जीर्णज्वरानंतर प्लीहावृद्धि व अग्निसाद हीं दोन लक्षणें फार जोराचीं असतां आणि ज्वरवेग कमी होऊन आलस्य, तंद्रा, गुरुता, हृदयोत्क्लेश, आंग गळून जाणें, वांति होणें, अरोचक, हीं लक्षणें असून प्लीहा टणक, कडा कठिण व पुष्कळ दिवसांची स्थिरावलेली वृद्धि असल्यास क्रव्यादरसाच्या योगानें फार उत्तम उपयोग झाल्याचीं उदाहरणें आहेत. या ठिकाणीं हिरडयाच्या हिमाबरोबर किंवा कुमारी आसवाच्या बरोबर क्रव्याद रस द्यावा. जुनाट वृद्धींतच या औषधाचा उपयोग होतो. वृद्धि नवीन असून त्याबरोबर ज्वर, हातापायाची आग, रसरस, वगैरे लक्षणें असतां या रसाचा उपयोग करूं नये.

प्लीहावृद्धीप्रमाणें यकृत्वृद्धींतहि क्रव्यादरसाचा उपयोग होतो. यकृत्वृद्धि पुष्कळ दिवसांची जुनाट आणि सर्व लक्षणें कफभूयिष्ठ असावींत.

संग्रहणीच्या विकारांत अन्न अत्यंत कष्टानें पचणें, तोंडाला पाणी सुटणें, वांति होईल असें वाटणें, अरुचि, तोंडाला चिकटा व गोडपणा, खोकला, वारंवार लाळ सुटून चिकट, फेंसाळ अशी थुंकी पडणें, नाक कोंदणें, पडसें आल्यासारखें होणें, पोट जड भारावल्यासारखें व त्यांत पाणी भरलें आहे कीं काय असें वाटणें, ढेंकर गोडसर व घाणेरडा, आंग अतिशय गळून जाणें, रोगी विशेष कृश नसतांहि त्याला अत्यंत बलहीनत्व वाटणें, तें इतकें कीं, यत्किंचितहि हालचाल करतां न येणें, फुटीर, आमयुक्त बेडके पडणें, तुकतुकीत व भस्रट असें वारंवार शौचास होणें; हीं लक्षणें असतां तीव्र दीपक व पाचक असें औषध देणें जरूर असतें. क्रव्यादरस हें एक या अवस्थेंत उत्तम औषध आहे.

वाताष्ठीलेच्या विकारांत क्रव्यादरसाचा उपयोग करावा.

श्वासाचा विकार कित्येक वेळां अपचनापासून जास्त उद्भूत होतो. पोटांत जास्त जास्त गुबारा धरतो, वारंवार ढेंकर जास्त येतात, तरी पण गुबारा कमी होत नाहीं. शौचाचा अवरोध व कांहीं थोडें खाल्लें तरी व कितीहि हलकें खाल्लें तरी पोटांत गुबारा धरून शौचाचा अवरोध होत राहातो. यां अवस्थेंत वातहारक व बद्धकोष्ठाचा नाश करून शौचास साफ करविणारें क्रव्याद हें एक उत्तम औषध आहे. अशा प्रकारें अपचनाचीं लक्षणें कमी झाल्यामळें श्वासहि याच्या योगानें कमी होतो.

जलोदराच्या आजारांत निमित्तकारण स्निग्धान्नभोजन किंवा मांसाशन हें असून त्याच्या योगानें अपचन व तज्जन्य यकृत्वृद्धि असा संप्राप्तिक्रम असतां हातापायांवर

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

व तोंडावर सूज, अत्यंत पांढरट फिक्केपणा, आंग अत्यंत गळून गेल्यासारखें होणें, जडपणा, सर्वांगास मुंग्या येणें, झोंप फार, पोट अतिशय जड, ताणल्यासारखें व आंत पाणी पुष्कळ सांचलेलें, त्यामुळें खोकला, श्वास, यत्किंचितहि चालण्याची शक्ति नसणें, हीं लक्षणें असतां क्रव्यादरसाचा उपयोग करावा. क्रव्यादरसाचा कोणत्याहि आसवाबरोबर किंवा अरिष्टाबरोबर उपयोग करावा. पाणी फारच सांचलें असल्यास तें शस्त्रकर्मानें काढून नंतर मग औषधाचा उपयोग केल्यास लवकर बरें वाटतें.

क्रव्यादरस हा मांसभोजी, स्निग्ध, गुरु, व पुष्कळ अन्न खाण्याची इच्छा असणाऱ्या लोकांकरितां विशेषतः तयार केलेला आहे.

यांतील पर्पटी, ताम्र व लोह—योगवाही, रसायन व बल्य असून त्यांवर लिंबाच्या रसाचा संस्कार करून तीं विशेष पाचक बनविलीं आहेत. पंचकोल व अम्लवेतस यांच्या भावना व लवण आणि मिरीं यांचा संयोग अत्यंत दीपनत्व वाढविणारा आहे. टांकणखाराची लाही ही ग्रहणींतील कोथनाशक, आक्षेपकघ्न व कासश्वासनिबर्हण अशी आहे आणि हरभऱ्याच्या क्षारोदकाच्या भावना दिल्यामुळें याच्या योगानें पित्तांतील तीक्ष्णत्व गुण वाढून पित्त अत्यंत प्रभावशाली बनतें व त्यामुळें पाचन व दीपन जास्त वाढतें.

२९. गण्डमालाकण्डन रस

* एक तोळा शुद्ध पारा, गंधक अर्धा तोळा, ताम्रभस्म दीड तोळा, मंडूरभस्म तीन तोळे; सुंठ, मिरें, पिंपळी, यांचें चूर्ण सहा सहा तोळे, पांढरा सैंधव अर्धा तोळा,

प्रमाणः—तीन ते सहा गुंजा.

ग्रंथोक्त गुणधर्मः—

गण्डमालाकण्डनोऽयं रसो माषत्रयात्मकः ।
भुक्तो निहन्ति गण्डानि गण्डमालां च दारुणाम ॥

---

* कर्षसूतं शुद्धमस्य गन्धकं त्वर्धमुत्तमम् ।
सार्धकर्षं ताम्रभस्मं मृतं किट्टं त्रिकर्षकम् ॥
व्योषं षट्कर्षतुलितमक्षार्धं सैंधवं सितम् ।
काञ्चनारत्वचश्चर्णं पलत्रयमितं क्षिपेत् ॥
पलत्रयं गुग्गुलोश्च शुद्धस्य समुपाहरेत् ॥
एतद्युक्त्या तु संमेल्य दृढं सुरभिसर्पिषा ।
गण्डमालाकण्डनो यं रसो माषत्रयात्मकः ॥ यो. र. ; बृ. यो. त.॥

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

कांचनाराच्या सालीचें चूर्ण व शुद्ध केलेला गुग्गुळ बारा बारा तोळे, हीं सर्व औषधें एकत्र खलून योग्य मिश्रण होईपर्यंत त्यांत गायीचें तूप घालावें.

गण्डमालाकण्डन रस हें औषध स्थूल प्रकृतीच्या रोग्यास विशेष लागू पडणारें आहे. याचा उपयोग नवीन व जुनाट अशा दोन्ही प्रकारच्या गंडमालांच्या विकारांत होतो. गंडमालांचा विकार आयुर्वेदाच्या मताप्रमाणें खालीलप्रमाणें आहे. मेद व कफ यांची वृद्धि–मानेच्या व कांखेंतल्या गांठींत गळ्यांतील व वंक्षणांतील गांठींत–फार झाल्यामुळें या गांठी वाढतात. त्यांसच गंडमाला अशी संज्ञा आहे. नुसत्या वंक्षणांत गांठी असल्यास किंवा नुसत्या पोटांत गांठी असल्यास त्यांना गंडमाला अशी संज्ञा देतां येणार नाहीं. प्रथमतः त्यांचा उद्भव मानेवर गळ्याशीं होऊन नंतर त्यांचा प्रसर बाकीच्या ठिकाणीं होतो.

ह्या विकारांत बारीक ज्वर बहुशः असतो. सर्वांगाची रसरस, हातपाय गळून गेल्याप्रमाणें होणें, पुढें पुढें बलमांसविहीनत्व; क्षुधा मंद, हीं लक्षणें प्रथमारंभापासून असतात. या गांठी पुढें पुढें मोठ्या होऊन पिकून फुटतात. गांठी फुटून व्रण बरा होतो व पुन्हां गांठी फुगतात. गांठी फुटून गेल्यानंतर कांहीं नाहींशा होतात, कांहीं पुन्हां फुगतात. असा क्रम वर्षानुवर्षे चाललेला असतो. या अवस्थेस ‘ अपचि ’ असें म्हणतात. गंडमाला फुटून तिच्यामधून पांढरट, क्लेदयुक्त, पुवाळ असा स्राव होत असतो. स्रावानंतर कांहीं कालपर्यंत गांठ कांहीं कमी झाल्यासारखी वाटते; पण पुन्हां फुगून पुन्हां अशा प्रकारचा किंचित् रक्तयुक्त असा स्राव सुरू होतो. असला हा त्रासदायक विकार, त्यावर चिकित्सा बहुतेक वेळेवारी करण्यांत येत नसल्यामुळें, दृढमूल होतो आणि मग शस्त्रप्रयोग करूनहि तो समूळ नाहींसा होत नाहीं.

गण्डमाला उत्पन्न झाल्याबरोबर गण्डमालाकण्डनरसाची योजना सुरू केली असतां त्या हलके हलके कमी होण्यास सुरुवात होते. विशेषेंकरून फिकट व गंडमालांच्या योगानें ज्यांचें तोंड फुगल्यासारखें झालें आहे, हातापायास फिक्केपणा व सूज आल्यासारखी झाली आहे, अपचन, पचनेंद्रिय शिथिल झाल्यामुळें बद्धकोष्ठ हीं लक्षणें असतां या रसाचा उपयोग विशेषें होतो. कांचनाची साल हें गंडमालेच्या रोगांत प्रभावशाली औषध आहे.

ग्रंथींची तीव्र वृद्धि, यांत इतर विशेष रोगबीजें (उपदंश वगैरे) नसतां केवळ मेद व कफ यांपासून ग्रंथी वाढलेल्या असल्यास या रसाचा उपयोग करावा.

ह्या औषधांतील कज्जली–योगवाही व रसायन; ताम्र–ग्रंथींतील मेदाचें पचन करणारें; मंडूर–रक्तास सकस करून रक्तकण वाढविणारा व शक्तिदायक; कांचनाची साल–आपल्या प्रभावानें गंडमालाविषघ्न; सुंठ, मिरें व पिंपळी–पाचक व रसायन; सैंधव–अभिष्यंदी व पाचक; गुग्गुळ–प्रसादन, शोथनाशक व रसायन.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

३०. गंधक रसायन

* शुद्ध गंधक घेऊन त्यास गायीच्या दुधाच्या प्रथम सात भावना द्याव्यात. नंतर दालचिनी, तमालपत्र, वेलची दाणे, नागकेशर, गुळवेल, हिरडे, बेहडे, आंवळकंठी, सुंठ, माका, यांच्या काढ्यांच्या प्रत्येकीं आठ आठ भावना द्याव्यात. प्रत्येकाच्या[१] आठव्या भावनेनंतर एक भावना आल्याच्या रसाची द्यावी आणि शेवटीं आल्याच्या रसाच्या आठ आठ भावना द्याव्या. याप्रमाणें भावना देऊन याच्या मोठमोठाल्या मात्रा तयार करून ठेवाव्या. नुसती बारीक पूड न ठेवलेली बरी.

प्रमाणः—अर्धा ते तीन गुंजा.

ग्रंथोक्त गुणधर्मः—

कर्षोन्मितं सेवितमेति मर्त्यो वीर्यस्य वृद्धिं दृढदेहमग्निम् ।। १ ।।
कण्डूं च कुष्ठं विषदोषमुग्रं मासद्वयेनेह जयेत्प्रयोगः ।
घोरातिसारं ग्रहणीगदं च हरेच्च रक्तं दृढशूलयुक्तं ।। २ ।।
जीर्णज्वरे मेहगणे प्रकृष्टं वातामयानां हरणे समर्थम् ।
प्रजाकरं केशमतीव कृष्णं करोति चेद्भक्षति चार्धवर्षम् ।। ३ ।।
रसायनं पर्वतजातमबीजं क्षाराम्लतैलादिकराजिवर्ज्यम् ।
ससोमरोगं सह मुष्कवृद्धिं हरेच्च वै गन्धकराजयोगः ।। ४ ।।
हरति सकल रोगान् गन्धकाख्यः प्रयोगो ।
मृगसदृशनराणां प्राणदो दीर्घमायुः ।।
तदनुविहितयोगो भस्मसूतं सहेम ।
रमयिति त्रिदशानां देहदीप्ति सुरूपाम् ।। ५ ।।
वीर्यस्य वृद्धिं दृढदेहवन्हिमशीतिवातान्विनिहन्ति कुष्ठम् ।
प्रमेहदुष्टोदररोगजालं विशेषतो हन्ति तु सन्निपातम् ।। ६ ।।
दोषज्वरं राजरुजं प्रमेहं पाण्डुक्षयश्वासगुदाङ्कुरादीन् ।।
एतान्हि रोगान्विनिहन्ति शीघ्रं रसायनं जल्पितमीश्वरेण ।। ७ ।। यो. र. ।।

---

* शुद्धो बलिर्गोपयसा विभाव्यस्ततश्चतुर्जातगूडूचिकाभिः ।
पथ्याक्षधात्र्यौषधभृङ्गराजैर्भाव्योऽष्टवारं पृथगार्द्रकेण ।।
सिद्धे सितां योजय[२] तुल्यभागां रसायनं गन्धकराजसंज्ञम् ।।
कर्षोन्मितं सेवितमेति मर्त्यो वीर्यस्य वृद्धिं दृढदेहमग्निम् ।। यो. र. ।।

१ (प्रत्येक वनस्पतीच्या आठ भावनांनंतर आल्याच्या रसाची एक एक भावना देण्याची एक प्रथा आहे. ग्रंथांत तसा उल्लेख नाहीं.)

२ सर्व भावना पुऱ्या होऊन औषध तयार झालें कीं त्यांत त्याच्या वजनाच्या निम्यांशानें साखर मिसळावयास सांगितली आहे. याचाच कोणी असा अर्थ करितात कीं गंधक रसायन तयार झाल्यानंतर तें रोग्यास देतांना समभाग साखरेबरोबर द्यावें.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

गंधकरसायन हा पारदकल्प नव्हे, परंतु गंधकाचाच हा कल्प असल्यामुळें आणि केवळ गंधकाचे इतर कल्प फारसे नसल्यामुळें त्याचा अंतर्भाव कज्जलीकल्पयुक्त संयुक्तकल्प औषधांत केला आहे. गन्धकरसायन व महागंधकरसायन असे त्याचे दोन कल्प हल्लीं तयार करण्यांत येतात. येथें दिलेलें आहे ,तें महागंधकरसायन होय. यांतच दिलेल्या औषधांची गंधकास फक्त एकेक भावना देऊन लघुगंधक रसायन तयार करतात. येथें महागंधकरसायनाचेच गुणधर्म दिलेले आहेत. लघुगंधकरसायनाचें प्रमाण जरा जास्त द्यावें लागतें (१ ते ६ गुंजा) आणि तें महागंधकरसायनाइतकें प्रभावशालीही असत नाहीं. हा दोहोंत मोठा फरक आहे.

गन्धकरसायनाचा गुणपाठ पाहिल्यास त्यांत अनेक प्रकारचे व्याधी दिलेले आहेत. परंतु गन्धकरसायनास एक विशेष प्रकारची दोषदुष्यांची संगति असावी लागते. गन्धकरसायनाचें कार्यक्षेत्र रक्त व त्वचा हें असून कोणत्याहि विषारानें दूषित झालेलें रक्त शुद्ध करून तें सकस बनविण्याचा मोठा धर्म गन्धकरसायनांत आहे. तसेंच याचे योगानें शरीरांत सांचलेल्या विकृत द्रव्यांचें रूपांतर व निर्दालन केलें जातें. रसादि सप्त धातूंमध्यें रक्तांतील अशुद्धीमुळें मालिन्य उत्पन्न होऊन त्यांना आवश्यक असलेल्या द्रव्यांचें संशोषण करून रूपांतरानें आत्मसात् बनविण्याचा धातूंचा महत्त्वाचा धर्म मंद झाला असेल तर गन्धकरसायनाचे योगानें रक्तांतील मालिन्य नाहींसें होऊन धातूंमध्यें असलेला हा धर्म उत्तम प्रकारें प्रस्थापित होतो. सर्व शरीरसंचारी विशिष्ट विषारें पुष्कळ दिवसपर्यंत शरीरांत राहिल्यानें सप्त धातूंत लीन होऊन निरनिराळ्या प्रकारचे जुनाट व हट्टी व्याधी उत्पन्न करतात. अशा प्रकारच्या दोषदूष्यांच्या जुनाट संयोगांत गंधकरसायन हें अमृतवल्लीप्रमाणें कार्य करणारें आहे. विषारें दोन प्रकारचीं येथें विवक्षित आहेत. स्थावरजंगमात्मक तीव्र व शरीरांतल्या शरीरांत सूक्ष्म अणूंच्यापासून उत्पन्न होणारीं तीव्र किंवा जीर्ण सामान्य विषारें; आणि उपदंश, पूयप्रमेह वगैरे विशिष्ट विषारें या दोन्ही प्रकारांच्या जीर्णावस्थेंत गंधकरसायनाचा उत्तम उपयोग होतो.

गंधकरसायन ज्या रोगांत उपयोगी पडतें, त्या रोगांत मुख्य लक्षण दाह हें असावें लागतें. लघवीची जळजळ, हातापायांची आग, पोटांत आग, सर्वांगाचा दाह, मस्तकांतील आंतल्या शिरांत, घशांत, जिभेंत वगैरे ठिकाणीं आग, शौचास कढत जुलाब, कढत वायु सरणें, यत्किंचित् हालचाल केल्याबरोबर सर्वांगाचा दाह झाल्यासारखा होणें, हातपाय टेकले असतां आग होणें, हातापायांवर गार पाण्याचीं फडकीं ठेवण्याची इच्छा होणें हीं लक्षणें असतां पित्ताची तीव्रता वाढली आहे असें समजावें. हीं लक्षणें कांहीं विशिष्ट विषारें शरीरांत संचित झाल्यापासूनहि उत्पन्न होतात. फिरंगोपदंशाच्या जीर्णावस्थेंत गंधकरसायनाशिवाय उपदंशसूर्य व अष्टमूर्ति हीं

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

औषधें उपयोगी पडतात. परंतु हीं दोन्हीही दाह विशेष असतांना उपयोगी पडत नाहींत. उपदंशसूर्य, उपदंशाच्या विशिष्ट जंतूंना मारक असलें तरी त्यांच्या योगानें जो निरनिराळा दोषदूष्यसंयोग उत्पन्न होतो त्या अनुरोधें आयुर्वेदांत निरनिराळी चिकित्सा करावी लागते. या विषारामुळें किंवा पूयशुक्र (गोनोऱ्हिया), इतर सेंद्रिय विषारें किंवा क्षुद्रकुष्ठजनक सेंद्रिय विषारें यांच्या योगानें पित्तदोष वाढून विशेषत: पित्तांतील तीक्ष्णोष्णत्वादि गुण वाढून, पित्त रक्तस्थित झालें असतां वर सांगितलेलें दाह हें लक्षण असतें. गंधकरसायनाचा या दोषदूष्यसंयोगांत विशेष उपयोग होतो.

अंगावर, त्वचेवर, बारीकबारीक पुरळ किंवा फोड, अंगास अतिशय खाज सुटणें, शौचास साफ न होणें, कोरडी खरूज, अत्यंत कंडूयुक्त, खाजवून खाजवून अंगांतून रक्त येणें, व खाजवल्यानंतर ह्या ठिकाणीं आग होणें हीं लक्षणें असतां गंधकरसायनाचा उपयोग साखरेबरोबर करावा. कोरड्या खरजेप्रमाणेंच पुष्कळ दिवसपर्यंत टिकणारी व त्रासदायक ओली खरूज यांतहि गंधकरसायनाचा उपयोग चांगला होतो. खरजेचे विशिष्ट प्रकारचे कीटाणु असतात. हे फार चेंगट व त्रासदायक असतात. गंधकरसायन, पोटांत गेल्यानंतर ह्या कीटाणूंना पोषण मिळणार नाहीं, अशा प्रकारें त्वचेंत व रक्तांत फरक घडवून आणतें. गंधक त्वचेंतून बाहेर पडतो. गंधकरसायन घेतल्यानंतर दोनतीन दिवसांतच खरजेचे फोड उमरून येतात, टपोरदार फुगतात, किंचित् विकार वाढल्यासारखा वाटतो, परंतु हें खरोखर गंधक रसायन उत्तम लागू पडल्याचें चिन्ह आहे. वर्षानुवर्ष खरजेनें खितपत पडलेले रोगी गंधकरसायनानें बरे झालेले दिसून येतात. जितका विकार जुना तितकें हें जास्त कार्यकारी होतें.

खरजेप्रमाणें इतर क्षुद्रकुष्ठांतहि गंधकरसायनाचा उपयोग १ ते २ गुंजांपर्यंत करावा व नंतर जसजसा रोगाचा जोर कमी होत जाईल तसतसें याचें प्रमाण कमी करीत जावें, तें इतकें कीं, आठवड्यांतून एकदां एक गुंज याप्रमाणें हें औषध त्वचा अगदीं साफ बरी होईपर्यंत देत जावें.

डोक्यांत फोड येणें व त्यांतून घाणकट दुर्गंधियुक्त असे गोळेगोळे व गांठी पडणें, पिंवळा, पांढरा पू वाहणें, या विकारांत गंधकरसायनापेक्षां रसराज किंवा रसपर्पटी यांचा चांगला उपयोग होतो. परंतु तेच फोड कोरडे कंडूयुक्त वर पांढरी पूड किंवा कोंडा निघणारे व खाजवलें असतां अतिशय आग, या लक्षणांनीं युक्त असतील तर गंधकरसायनासारखें दुसरें अप्रतिम औषध नाहीं. मस्तकावर चाई अर्थात् इंद्रलुप्त या विकारांत डोक्याची आग, भगभग, होत असतां गंधकरसायनाचा उपयोग चांगला होतो.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

महाकुष्ठांत विशेषेंकरून पित्तप्रधान महाकुष्ठांत, या औषधाचा उपयोग चांगला होतो. परंतु त्यामध्येंहि दाह हें विशेष लक्षण असावें लागतें. कुष्ठ कोरडें असून फुटलेलें नसावें. रक्त व त्वचा यांपर्यंत त्याचें विषार गेलेलें असावें. अंगावरील उठलेल्या चकंदळचांत किंवा गांधींत लाली, खाज, व आग विशेष असून सर्वच त्वचेची थोडीफार आग होत असतां गंधकरसायन द्यावें. या कुष्ठांत खालील काढ्यावरोबर गंधकरसायन दिलें असतां कुष्ठें बरीं झाल्याचीं उदाहरणें आहेत. मात्र हा प्रयोग सतत तीन वर्षेपर्यंत करावा लागतो. काढा:—"दारुहळद, मंजिष्ठा, अनंता, आंवळकाठी, गोखरूं, गुळवेल, काळ्या खैराची साल, हाळकुंडें, चोपचिनी व लिंबोण्या (कडुनिंबाच्या बिया) यांचा विधिपूर्वक काढा करावा." हा काढा व गंधकरसायन महिनाभर घेऊन महिनाभर सोडावें, पुन्हां महिनाभर घेऊन महिनाभर सोडावें, अशा तऱ्हेनें हा प्रयोग तीन वर्षे करावा.

खरूज दबल्यानंतर पुष्कळ वेळां निरनिराळे वरेच विकार उत्पन्न झाल्याचें प्रत्ययास येतें. कांहीं वेळेला तर खरूज आणि दुसरा विकार आळीपाळीनें शरीरांत उद्भवल्याचें दिसून येतें. म्हणजे खरूज उद्भवली असतां दुसरा विकार शम पावतो व दुसरा विकार उत्पन्न झाला असतां खरूज शम पावते. असा हा रोगानुबंध क्रम कितीतरी दिवस सारखा चालू असतो. असल्या प्रकारें उत्पन्न झालेल्या विकारांत गंधकरसायन हेंच एक औषध उत्तम कार्य करणारें आहे. कांहीं वेळेला खरूज अजिबात शमून दुसऱ्या रोगांस निदानार्थकर होते. त्यांत पुन्हां खरूज उत्पन्न होत नाहीं. तोच रोग मात्र पुष्कळ दिवसपर्यंत त्रास देत राहातो. अतिसार, संग्रहणी, शीर्षशूल, मुखपाक, पोटांत गुडगुडणें, अंगाची आग होणें, पोटांत आग होणें या विकारांत गंधकरसायन फार अल्प प्रमाणांत दिलें असतां फार चांगलें काम होतें.

उपदंशाचे जीर्ण विषार, इतर दूषीविषें, पारदविष (लोकव्यवहारांत ज्यास 'रसायन खाल्लें' असें म्हणतात तें.) व इतर जंगम विषांच्या जीर्णावस्था ह्यांच्या-मुळें घोर अशा प्रकारचा अतिसार किंवा ग्रहणीरोग, त्याबरोबर रक्त व आंव पडणें, पोटांत अतिशय कळ निघणें किंवा कातरल्यासारखी पीडा होणें ह्या विकारांत गंधकरसायन अत्यंत उपयुक्त कार्य करितें.

उपदंशाच्या किंवा इतर सेंद्रिय विषारांच्या जीर्णावस्थेंत उत्पन्न झालेली प्लीहा-वृद्धि अग्निमांद्य या विकारांत सर्वांगाचा दाह हें लक्षण असतां गंधकरसायनाचा उपयोग करावा.

प्रमेह, मधुमेह, हे स्थूल माणसास, त्याचप्रमाणें अत्यंत कृश अशा माणसासहि होतात. स्थूल माणसांना झालेल्या या रोगांत गुग्गुळ, शिलाजतु, त्रिफळा वगैरेंचा उपयोग जास्त होतो. कृश माणसांस, विशेषतः जननेंद्रियसंबंधीं रोग पूर्वीं झालेले

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

असून त्यानंतर हा विकार उत्पन्न झाला असतां, गंधकरसायन अनंतादिवर्गा-बरोबर द्यावें.

उपदंशादिक जीर्ण विषारांचा परिणाम वातवाहिन्यांवर होऊन त्या विकृत झाल्यामुळें उत्पन्न होणारा सर्वांग रोग, पक्षाघात वगैरे, हालचाल व इतर व्यापार लुळे करणारे विकार यांत गंधकरसायन उत्तम काम करतें. या लुळेपणाचा परिणाम आंतड्यांवरहि होऊन आंतडीं अगदीं अशक्त, बद्धकोष्ठ, कोष्ठाच्या ठिकाणीं अशक्त-पणा, पोटांत आग, भगभग, शौचास सुपारीसारख्या किंवा त्याहीपेक्षां बारीक अशा कडक गांठी होणें. त्या गांठी बाहेर टाकण्याची आंतड्यांस ताकद नसणें. या विकारांत प्रथम स्नेहन करून नंतर गंधकरसायनाचा उपयोग करावा.

उपदंशाच्या जुनाट अवस्थेंत सांधे सुजणें, दांतांतून रक्त येणें, सगळें शरीर गांठाळ गुठाळ होणें, शरीरांतल्या शिरा जाड जाड होणें, उभें राहण्याची ताकद नसणें, हातपाय थरथर कापणें,कित्येक वेळां हा विकार अतिशय वाढून रोगी अगदीं जमिनीवर खिळलेला असतो, छातींत व सर्वांगांत कळा निघत असतात, हृदयाच्या ठिकाणीं खाजल्यासारखें होत असतें, सर्वांगावर बारीक बार आल्यासारखा होतो. ह्या विकारांत गंधकरसायन उत्तम काम करितें.

पूयशुक्राच्या जुनाट अवस्थेंत सर्वांगाचा दाह, अण्डकोष मोठा होऊन त्यांत दुखरेपणा येणें, त्याला थोडी सूज असणें, मूत्रोत्सर्ग करतांना मूत्रमार्गाची आग होणें, मूत्राशयाच्या तोंडाशीं किंवा मूत्रवाहिन्यांच्या बुडाशीं दाबलें असतांना दुखणें, त्यांतून थोडासा पू येणें, या विकारांत गंधकरसायनानें पुष्कळ वेळां उत्तम काम केलेलें आहे.

पूयशुक्र व प्रदर हे दोन्ही विकार कित्येक वेळां अज्ञानानें एकच समजले जातात. परंतु पूयशुक्र हा विकार मूत्रवाहिनी व मूत्राशय यांचा असून त्याचा स्राव मूत्रवाहिनी-मधूनच होत असतो. प्रदराचा विकार अपत्यमार्गांतला असून त्यांतील स्राव अपत्य-मार्गांतून होत असतो. जुनाट विकारांत पूयशुक्राचें विषार पुष्कळ खोल जाऊन अपत्यमार्ग गर्भाशयासुद्धां विकृत होतो आणि त्यामुळें एक प्रकारचा स्राव अपत्य-मार्गांतून होत असतो. पण या स्रावांत व प्रदरांत फरक आहेच. हा स्राव पिवळट, दुर्गंधयुक्त, दाहकारक असून ह्यामध्यें सर्वांगाची आग, दाह, रसरस, वगैरे पित्तप्रधान लक्षणें असतात. या प्रकारांत गंधकरसायनाचा उपयोग चांगल्या प्रकारें होतो.

मुळव्याधीचा विकार केवळ बद्धकोष्ठजन्य असल्यास त्या ठिकाणीं आरोग्य-वर्धिनीचा उपयोग होईल. गुदकांड व स्थूलग्रहणी यांत शैथिल्य उत्पन्न होऊन, त्रिवळीवर दाब पडून मुळव्याध उत्पन्न झालेली असल्यास ताप्यादिलोह व चित्रक-तक्रयोग यांचा उपयोग होईल. परंतु वर लिहिलेलीं सेंद्रिय विषारें, विशिष्ट विषारें, गर यांपासून बद्धकोष्ठ किंवा बद्धकोष्ठ नसतांहि गुदमार्गांत व्रण व त्यामुळें त्रिवळीवर

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

दाब पडून मुळव्याधीचा विकार उत्पन्न झाला असल्यास कडा सुजन त्यांतून रक्त जळजळीत व कढत पडणें, गुदमार्गाची व गुदकांडाची आग व भगभग होणें, सर्व शरीरभर तगमग, तळमळ होणें, हीं लक्षणें असतां गंधकरसायनाचा उत्तम उपयोग झाल्याचीं उदाहरणें आहेत.

मुळव्याधीचा विकार आनुवंशिकहि असूं शकतो. त्याचप्रमाणें इतर विकारांत उपद्रव म्हणूनहि उत्पन्न होतो. कांहीं कांहीं रोग्यांत मुळव्याध, कास व श्वास, मुळव्याध व संग्रहणी, तर कांहीं रोग्यांत मुळव्याध आणि अपस्मार अशीं विकारांचीं द्वंद्वें आळीपाळीनें उद्भूत होत असल्याचें आढळून येतें. या सर्व प्रकारांत गंधकरसायन उत्तम काम करितें.

डोळ्यांच्या कडा तांबड्या लाल, आंतून जळजळीत वाफा निघणें, डोळ्यांस अतिशय कंडू उद्भवणें, आग होणें, डोळे लाल होणें व यानंतर पूयाभिष्यंद ह्या विकारास कारण पारदातिसेवन, पूयशुक्रजन्य विष किंवा उपदंशजन्य विषार हें असल्यास गंधकरसायनाचा चांगला उपयोग होतो.

नासाव्रण कोरडा व दाहयुक्त; उपजिव्ह, अधिजिव्हक, दाहयुक्त, लहान मुलांना होणारा तालुकंटक, टाळूला मध्येंच भोंक पडणें, घशाला पुरळ येणें, त्यामुळें कोरडा खोकला उत्पन्न होणें, त्यामध्यें आग होणें, या विकारांत गंधकरसायन हें चांगलें उपयोगी पडतें.

जुनाट नाडीव्रण, जुनाट अस्थिगत व्रण, जुनाट मांसगत व्रण, यांमध्यें पू कमी, परंतु दाहयुक्त लसिकास्राव, व्रणाच्या ठिकाणीं भयंकर आग, ती इतकी कीं, रात्रं-दिवस रोगी सारखा तळमळत राहिलेला, व्रणाच्या प्रत्येक कणास जशी कांहीं मिरची लावल्यासारखी भगभग, असल्या विकारांत गंधकरसायनानें फार लवकर आराम पडल्याचीं उदाहरणें आहेत.

दंतव्रण दंतपुप्पुट या विकारांत हिरड्यांची आग, हिरड्यांना यत्किंचित् धक्का लागला असतांना रक्त पडणें, दाहयुक्त असा पू येणें, हाच विकार जुनाट होऊन त्या-पासून अग्निमांद्य, छर्दि, शूल, व तेंच विषार पक्वाशय ग्रहणी यांपर्यंत पोहोंचून त्यापासून अतिसार व ग्रहणी; यकृदातादि इंद्रियांचे जुनाट विकार उत्पन्न होऊन त्यांपासून दूष्योदर, त्यांत घबराट, मूत्र अगदीं कमी होणें, तें लाल होणें, सर्वांगाची आग, हीं लक्षणें असतां गंधकरसायन उत्तम काम करितें. इतर प्रकारच्या दूष्यो-दरांतहि पित्तलक्षणें जास्त असतां गंधकरसायनाचा अप्रतिम उपयोग होतो.

विशेष कोणत्याहि प्रकारचें कारण स्पष्ट नसतां रोगी हलके हलके झिजत जाऊन त्यास बलमांसविहीनत्व प्राप्त होतें. अंतरिंद्रियांतील जो जो अवयवसमूह अशा प्रकारें अशक्त होत जाईल, त्या त्या अवयवसमूहाचे विकार, अर्थात् पित्तप्रधान विकार

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

दिसूं लागतात. कितीहि बारीक तपासणी केली तरी रोगाचें विशिष्ट कारण सांपडत नाहीं. असात्म्येंद्रियार्थसंयोगासारखीं सामान्य कारणें सांपडतात. असल्या विकारांत उत्पन्न झालेलें बलमांसविहीनत्व, नष्ट झालेलें वीर्य, लुप्त झालेली शक्ति, मंद झालेला अग्नि, व लुळपट झालेले स्नायु, पुनश्च समस्थितींत आणून योग्य कार्यक्षम करण्याची पात्रता गंधकरसायन व षड्गुणबलिजारित रससिंदूर यांत आहे. रससिंदूराची विवक्षित अवस्था त्या प्रकरणीं दिली जाईलच. पित्तभूयिष्ठ लक्षणें असतां गंधकरसायन व कफप्रधान दुष्टी असतां बलिजारित रससिंदूर असा हा क्रम आहे.

गंधकरसायनाचें मूलभूत द्रव्य–गंधक—हें रसायन, कुष्ठघ्न, विषघ्न, जंतुघ्न व योगवाही आहे. त्याला ज्या निरनिराळ्या भावना दिल्या आहेत, त्यांपैकीं चतुर्जात म्हणजे दालचिनी, तमालपत्र, वेळादाणे व नागकेशर यांची भावना पित्तशामक व पित्तांतील तीक्ष्णोष्णादि धर्म शमन करणारी; गुळवेल–रसायनी, पित्तोद्रेकनाशक, दाहनाशक, ज्वरघ्न व मूत्रल; हिरडा–रसायन; आंवळा–पित्तघ्न, रसायन, वाजीकर, व बल्य, पूयशुक्र व प्रमेहनाशक; बेहडा–व्रणघ्न, स्तंभक व कफघ्न; भृंगराज (माका)–वातशामक, वातवाहिन्यांचा क्षोभ नाहींसा करणारा, कोष्ठस्थ दूषीविषें शमन करणारा व सुंठ आणि आलें–पाचक, दीपक व स्वादुपाकी अतएव रक्तप्रसादन करणारें. अशा भावनांनीं गंधक अत्यंत वीर्यवान, प्रभावशाली होऊन वर दिलेले त्याचे विविध प्रकारचे गुण आपणांस प्रत्ययास देतात.

३१. गर्भपाल रस

*शुद्ध हिंगूळ, नागभस्म, वंगभस्म, दालचिनी, तमालपत्र व वेलची–दाणे, सुंठ, मिरें, पिंपळी, काळें जिरें, धणे, चवक, मनुका व देवदार हीं सर्व औषधें एक एक तोळा, लोहभस्म अर्धा तोळा, यांचा सात दिवसपर्यंत विष्णुक्रांताच्या रसांत खल करावा, आणि एकेक गुंजेची गोळी करावी.

प्रमाणः—एक ते तीन गुंजा.

---

*हिंगुलं नागवङ्गौ च त्रिजातं च कटुत्रयम् ॥
धान्यकं कृष्णजीरं च चव्यं द्राक्षा सुरद्रुमः ॥
कर्षमानं पृथक् सर्वं कर्षार्धं लोहभस्म च ॥
सप्ताहं मर्दयेत्खल्ले विष्णुक्रान्तारसेन च ॥
गुञ्जामात्रा च वटिका द्राक्षाक्वाथेन योजयेत् ॥ र. चं. ॥

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

ग्रंथोक्त गुणधर्मः—

मासप्रथममारभ्य नवमासान्तमेव च।
गर्भिणीरोगनाशार्थं गर्भपालरसः स्मृतः ॥ र. चं. ॥

गर्भपालरस हें गर्भिणीचें औषध आहे. गर्भाशयाच्या अशक्ततेमुळें पूर्णमासपर्यंत गर्भाशयांत गर्भ टिकत नसल्यास व त्यामुळें वारंवार गर्भपात होत असल्यास गर्भपालरसाची योजना करावी.

गर्मीच्या विषारापासून गर्भाशयदुष्टी झाली असतांना वारंवार गर्भपात होण्याची संवय लागते. कांहीं वेळां गर्भस्राव होतो, म्हणजे चार महिन्यांपर्यंतच गर्भ टिकून नंतर तो पडतो, तर कांहीं वेळां गर्भपात होतो, म्हणजे पांच सहा महिनेपर्यंत गर्भ टिकून तो पडतो. जितके जितके जास्त दिवस लोटतात तितका तितका गर्भ टिकण्याचा संभव जास्ती. या विकारांत प्रथमतः उपदंशनाशक औषध देऊन नंतर गर्भपालरसाची योजना करावी. किंवा गर्भपालरसाबरोबरच उपदंशनाशक असें एकादें औषध द्यावें.

मनोव्याघात किंवा उन्मादप्रकृति यांचा परिणाम गर्भाशयावर होऊन गर्भपात होण्याची संवय लागते. असल्या गर्भपाताच्या संवयींत गर्भपालरस मनुकांच्या काढ्याबरोबर द्यावा.

उपदंशाचें किंवा परम्याचें विषार यांच्या योगानें गर्भाशय दुष्ट होऊन वांझपणा आलेला असल्यास अष्टमूर्ति किंवा राजवंगेश्वर यांच्याबरोबर गर्भपालरसाची योजना केल्यास गर्भधारणा होण्यास मदत होते.

स्त्रियांच्या अण्डकोषाची पूर्णपणें वाढ न झाल्यामुळें, स्त्रीबीजवाहिनी नीट विकसित न झाल्यामुळें किंवा स्त्रीजननेंद्रियाच्या व्यापारांत इतर विकृति उत्पन्न झाल्यामुळें गर्भधारणा होईनाशी होते किंवा झाल्यास ती टिकत नाहीं, अशा स्थितींत वंग, त्रिवंग, किंवा इतर गर्भाशयास बल्य अशा औषधांबरोबर गर्भपालरसाची, योजना केल्यास गर्भधारणा होण्यास मदत होते.

कांहीं कांहीं स्त्रियांना गर्भधारणा झाल्यापासून तों प्रसूति होईपर्यंत अनेक निरनिराळे त्रास होतात. कांहींना अत्यंत वांति होते, ती इतकी असते कीं, यत्किंचितहि अन्न पोटांत ठरत नाहीं. अन्न खाल्लें कीं ओकून पडतें, कांहींना या वांतीबरोबर रक्त पडतें, सारखें पडून राहावेंसें वाटतें, पडून राहिलें तरच जिवास थोडा तरी आराम वाटतो. चक्कर, भोंवळ, घबराट, डोकें दुखणें, गर्भाशयांतून व कमरेंतून शिलका, निघणें, मांड्या गळून गेल्यासारखें होणें, कित्येकांना उभें राहिलें कीं, पायांतून पेटके तरी येतात किंवा पाय थरथर कापतात. कित्येकांना अगदीं पडेन पडेन असें वाटत असतें. ह्या सर्व विकारांत गर्भपालरसाची योजना करावी.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

दोषानुरोधें गर्भपाल रसाबरोबर कामदुघा, प्रवाळ, माक्षिक किंवा वंग यांपैकीं एकादें औषध द्यावें.

गर्भधारणा सम्यक् होऊन निसर्गतः सुखप्रसूति झाल्यानंतर कांहीं कांहीं स्त्रियांचीं मुलें उपजतांच किंवा चारदोन दिवसांनंतर कांहीं विशेष कारण न घडतां आचकून मरतात, ससणी होऊन मरतात किंवा क्षीरालसकादि व्याधी होऊन मरतात. कांहीं कांहीं स्त्रियांच्या मुलांस चारदोन महिनेपर्यंत कांहीं न होतां यकृत्वृद्धि होऊन नंतर मूल पिंवळें पडून, यकृतोदर होऊन तें गमावतें. अशीं लागोपाठ दहादहा, बाराबारा मुलें गेलेलीं आढळतात. या सर्व स्थितींत व एतत्सम अन्य स्थितींत, पुष्कळ वेळां स्त्रीदुग्धांत दोष असतो किंवा मूलबीजांत दोष असतो. दोष नाहींसे करण्याचें महत्त्वाचें काम गर्भपालरस उत्तम तऱ्हेनें करतो.

कोणताहि विशेष विकार नसतां केवळ शरीरप्रकृति नाजूक व अशक्त असल्यामुळें गर्भधारणेमुळें एकंदर प्रकृतीवर ताण पडून अत्यंत त्रास होतो. गर्भिणीस वारंवार कांहीं ना कांहीं होत राहातें व थेटपर्यंत दिवस कसे काय निभतील आणि सुखप्रसूति कशी होईल, याविषयींहि शंका उत्पन्न होते. अशा परिस्थितींत गर्भपाल रसानें उत्तम कामगिरी केल्याचीं उदाहरणें आहेत.

गर्भपालरसांतील हिंगूळ–योगवाही व रसायन; नाग व वंग हे गर्भाशयास पुष्टि देणारे व बल्य; त्रिजात (दालचिनी, तमालपत्र, वेलची दाणे)—पित्तशामक; धने, जिरें व मनुका–पित्तशामक, बल्य व कोष्ठाचा क्षोभ नाहींसे करणारे; लोहभस्म–सर्वसाधारण बलदायक; देवदार–गर्भाशयांतील विकृति नष्ट करून गर्भाशयास पुष्टि देणारें; विष्णुक्रांता–वातवाहिन्यांचा क्षोभ नाहींसा करून गर्भसंस्थापक, मूत्रल, शीतवीर्य, व गर्भाशयास पुष्टि देणारीं, अशीं आहेत.

[गल कुष्ठारि–कुष्ठकुठार रस पहा.]

३२. गुल्मकालानल रस

* पारा, गंधक, हरताळ, ताम्रभस्म, टांकणखार हीं सर्व प्रत्येकीं दोन दोन तोळे, सर्वांच्या समभाग जवखार, नागरमोथा, पिंपळी, सुंठ, मिरें, गजपिंपळी, हिरडे, वेखंड, कोष्ट एक एक तोळा, हीं सर्व एकत्र करून त्यांस खालील औषधांच्या भावना द्याव्यात:—

* पारदं गंधकं तालं ताम्रकं टंकणं समम् ॥
तोलद्वयमितं भागं यवक्षारं च तत्समम् ॥
मुस्तकं पिप्पली शुण्ठी मरिचं गजपिप्पली ॥

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पित्तपापडा, नागरमोथें, आलें, आघाडा, पहाडमूळ यांच्या प्रत्येकीं सात सात भावना देऊन नंतर बारीक बारीक गोळ्या करून ठेवाव्या.

प्रमाण:—एक ते चार गुंजा.

हरीतकीच्या काढ्याबरोबर विशेषत: याचा उपयोग करावा.

ग्रंथोक्त गुणधर्म:—

गुञ्जाचतुष्टयं खादेद्धरीतक्यनुपानतः ॥
वातिकं पैत्तिकं गुल्मं श्लैश्मिकं सान्निपातिकम् ॥
द्वंद्वजं विनिहन्त्याशु वातगुल्मं विशेषतः ॥
श्रीमद्‌गहननाथेन निर्मितो विश्वसंपदे ॥
गुल्मकालानलो नाम सर्वगुल्मकुलान्तकः ॥ भै० र० ॥

गुल्मकालानल या औषधाच्या नांवावरूनच विशेषत: गुल्मचिकित्सेंत याचा उपयोग होतो हें स्पष्ट आहे. आयुर्वेदांत गुल्म या शब्दानें आंतड्याच्या आंतल्या बाजूस जी निरनिराळ्या प्रकारची ग्रंथिरूपी रुग्णावस्था प्राप्त होते, ती ध्वनित होते. केवळ आंवाळूसारखी वृद्धि किंवा इतर कारणांनीं आंतल्या गांठी वाढणें यांसच गुल्म अशी संज्ञा नसून आंतड्यांत वात धरून त्याच्या योगानें गांठीसारखा फुगारा वारंवार येत राहिला व कमी होत राहिला तरी त्यास गुल्म अशी संज्ञा देण्यांत आली आहे. मांसल, तंतुयुक्त भाग एकमेकांशीं जाळ्यासारखे संलग्न होऊन त्यांपासून गांठीसारखा गोळा उत्पन्न होणें, आंतल्या बाजूस मेदासारखा भाग व बाहेरून श्लेष्मल त्वचा अशी ग्रंथिरूप वृद्धि होणें किंवा नुसता फुगारा धरून त्यानें ग्रंथिरूप भाग उत्पन्न होणें हे सर्व गुल्माचेच निरनिराळे भाग गणिले आहेत. पहिल्या प्रकारास पित्तगुल्म, दुसऱ्याला कफगुल्म व तिसऱ्यास वातगुल्म अशा संज्ञा आहेत. द्वंद्वज गुल्मांत या दोहोंचा संकर असतो. स्त्रियांना होणारा रक्तगुल्म हा प्रकार वरील प्रकाराहून भिन्न आहे. रक्तगुल्म—अंडकोष (ओव्हरी) किंवा गर्भाशय (यूटरस)–यांवर होतो. हा पित्तगुल्माच्या जातीचा असतो. याचीं लक्षणेंहि पित्तगुल्मासारखींच असतात.

ह्या रसाचा विशेष उपयोग वातगुल्मांत होतो असें ग्रंथकारानें प्रतिपादिलें आहे. वातगुल्म म्हणजे आंतड्यांत उत्पन्न झालेला फुगारा. हा फार लवकर कमी

हरीतकी वचा कुष्टं तोलैकं चूर्णयेत्सुधीः ॥
सर्वमेकीकृतं पात्रे भावना क्रियते ततः ॥
पर्पटं मुस्तकं शुण्ठ्यपामार्गं पापचेलिका ॥
तत्पुनश्चूर्णयेत् पश्चात् सर्वगुल्मनिवारणम् ॥ भै० र. ॥

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अधिक होऊं शकतो, शौचाचा अवरोध असतो, वायु सरत नाहीं, घशाला व तोंडाला कोरड पडते, मध्यें मध्यें थंडी वाजते, बारीक ज्वर आल्यासारखा होतो, छातीजवळ, कुशींत, बरगड्यांत व डोक्यांत केव्हां केव्हां चमका निघतात, अन्नपचन झाल्यानंतर पोटास तडणी लागते, थोडेंसें खाल्ल्याबरोबर साधारण बरें वाटतें, श्रम सहन होत नाहींत, रुक्ष पदार्थ वगैरे चालत नाहींत. या लक्षणांनीं युक्त असलेल्या गुल्मांत गुल्मकालानल रस तुपाबरोबर द्यावा.

ह्या औषधाचा उपयोग पित्तज गुल्मांत कितपत होतो याबद्दल शंका आहे. पित्तज गुल्माच्या अगदीं प्रथमावस्थेंत गुल्माचा परिपाक झालेला नसतां व पित्त गुल्मांत असणारी ज्वरपिपासा वगैरे लक्षणें पूर्णपणें उत्पन्न झालेलीं नसतां केवळ पित्तसंचय विरेचनद्वारां कमी व्हावा म्हणून या औषधाचा उपयोग मधुर व शामक औषधांबरोबर करावा.

कफगुल्माच्या विकारांत त्याचप्रमाणें कफवातात्मक किंवा कफपित्तात्मक गुल्मांत या औषधाचा उपयोग करावा. विशेषत: स्तैमित्य, शीतपूर्वक ज्वर, अंग गळून गेल्यासारखें होणें, तोंडाला मळमळ सुटणें, अरुचि, खोकला, आंग जड पडणें, सर्वांग थंड पडणें, गुल्म व त्याच्या भोंवतालच्या बाजूस अगदीं अल्प वेदना, गुल्माचा भाग कठिण व वर उचलून आल्यासारखा, वाटोळा, जाड व त्याच्या कडा सारख्या असलेल्या; हा गुल्म यकृत् किंवा प्लीहा या दोन्ही इंद्रियांना सोडून मध्यम कोष्ठांत उत्पन्न झालेला असतो. या औषधांतील यवक्षार, हरताळ, व ताम्र यांच्या क्षरण गुणामळें कफज गुल्मांतील घट्ट बनलेले घटक झरूं लागून गुल्म हलके हलके कमी होतो. फार मोठा वाढलेला, पुष्कळ दिवसांचा जुना गुल्म औषधीप्रक्रियेस दाद देत नाहीं. त्यावर शस्त्रप्रयोगच करावा लागतो.

रक्तगुल्म हा व्याधि अगदीं स्वतंत्र व त्याची संप्राप्तीहि स्वतंत्र असल्यामुळें त्या ठिकाणीं याचा उपयोग होत नाहीं.

गुल्मकालानल हें औषध जुनाट शीतपूर्वक विषमज्वर व त्यापासून उत्पन्न होणारे प्लीहावृद्धि, अग्निसाद, यकृत्वृद्धि या विकारांत उपयोगी पडण्याचा संभव आहे; मात्र या विकारांत कफदोषाचें प्राधान्य असावें लागतें.

या औषधांतील कज्जली—योगवाही व रसायन; ताम्र—तीक्ष्ण, उष्णवीर्य व क्षरण करणारें; टांकणखाराची लाही—आक्षेपकघ्न, जंतुघ्न व कफघ्न; यवक्षार—क्षरण करविणारा, कफघ्न, व वातानुलोमिक; नागरमोथे—आमपाचक; पिंपळी—रसायनी व पाचक; सुंठ व मिरें—दीपक व पाचक; गजपिंपळी व हरीतकी—सूक्ष्मविरेचक व रसायनी; अघाडा—कफघ्न व संघातभेदक; पाठा—मूत्रल, कफघ्न, संघातभेदक, व रसायन; अशीं आहेत.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

३३. गुल्मकुठार

* नागभस्म, वंगभस्म, अभ्रकभस्म, कांतलोहभस्म हीं समभाग घेऊन यांच्या समभाग ताम्रभस्म घेऊन त्याचा झामराच्या रसांत खल करून एकेक गुंज प्रमाणाच्या गोळ्या बांधाव्यात.

प्रमाणः—अर्धी ते दीड गुंज.

ग्रंथोक्त गुणधर्मः—

मधुनार्द्रकनीरेण क्षारयुग्मेन सेविता ।।
अजीर्णाम्लं च गंधं च हृत्पार्श्वोदरशूलके ।।
नाम्ना गुल्मकुठारोऽयं सर्वगुल्मान्व्यपोहति ।। यो. र. ।।

शोकापासून किंवा मनोव्याघातापासून प्रथमतः अपचन सुरू होऊन त्याचें अग्निमांद्यांत पर्यवसान होतें. हें अग्निमांद्य फार त्रासदायक व चमत्कारिक स्वरूपाचें असतें.

असल्या प्रकारचें अग्निमांद्य बरेच दिवस टिकून त्यापासून वातदोष क्षुभित होऊन गुल्म उत्पन्न होतो. असल्या प्रकारच्या गुल्मांत इतर लक्षणांबरोबर दैन्य, मनाची चंचलता, कोणत्याही गोष्टीची गोडी नसणें, मन अगदीं निरसलेलें, विटल्यासारखें होऊन गेलेलें, रोगी अगदीं फिकट, कृश व शरीराची कांति नष्ट होऊन पार बदललेली, असल्या प्रकारच्या वातगुल्मांत या औषधाचा उपयोग करावा.

गुल्माच्या निरनिराळ्या जाती गुल्मकालानल गुणधर्मप्रकरणीं सांगितल्या आहेत. त्यांपैकीं मांसाश्रित गुल्म व त्याबरोबर ज्वर, तहान, कितीही पाणी प्यालें तरी तहान कमी न होणें, गार पाण्याची, गार पदार्थाची इच्छा फार, तोंड व अंग यांच्यावर एक प्रकारची लाली, अन्नाचें पचन होत असतांना तीव्र शूल, वारंवार पुष्कळ घाम येणें, अन्नाचा विदाह होणें, गुल्माचा भाग फारसा कठिण नसणें, परंतु त्यास स्पर्श बिलकूल सहन न होणें, व्रणाप्रमाणें किंवा जखमेप्रमाणें, तो अगदीं हळुवार, जरा धक्का लागला किंवा किंचित् त्रास झाला तरी, त्यास असह्य पीडा होणें, त्या पीडा कित्येक वेळां इतक्या जबरदस्त होतात कीं, रोगी वेदनांच्या त्रासानें किंवा वेदना सहन न झाल्यामुळें पुष्कळ वेळां मधून मधून बेशुद्ध पडतो. असल्या प्रकारच्या गुल्मांत या औषधाचा उपयोग करावा, या औषधाबरोबर चतुर्जाताचा काढा द्यावा. किंवा दोष फार तीव्र असल्यास व रोगी वारंवार बेशुद्ध पडत असल्यास मंजिष्ठा, सारिवा अनंता, रास्ना व मनुका यांच्या काढ्याबरोबर या रसाची योजना करावी.

---

* नागवङ्गाभ्रकं कान्तं समं ताम्रं समांशकम् ।।
जम्बीरस्वरसैघृष्ट्वा वटी गुंजाप्रमाणिका ।। यो. र. ।।

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

स्त्रियांना होणारा रक्त गुल्म व गर्भ या दोहींचें निदान होण्याला पुष्कळ वेळां फार त्रास पडतो. कारण रक्तगुल्म गर्भाप्रमाणेंच हलके हलके वाढत असतो, गर्भ-धारणा झाली असतां जीं चिन्हें होतात तशाच प्रकारचीं–वांति होणें, अंग गळून जाणें, पोट जड वाटणें, चेहरा म्लान होणें, वगैरे–लक्षणें रक्तगुल्मांतहि होतात. या दोहोंत फरक एवढाच कीं, गर्भाच्या चौथ्या महिन्यापासून गर्भांत एक प्रकारचें स्पंदन व स्फुरण असून स्त्रियांस गर्भांतील अंग–प्रत्यंगाची जाणीव होण्याचा संभव असतो. गुल्मांत असलें स्पंदन, स्फुरण, हालचाल वगैरे कांहीं एक होत नसून एके ठिकाणीं कोठें तरी घट्ट चिकटल्यासारखा वर्धिष्णु गोळा बस्तिभागांत असतो. यांतहि स्त्रियांना रजोदर्शन होत नाहीं. परंतु थोडें सूक्ष्म निरीक्षण केलें असतां गुल्माचें स्वच्छ निदान होणें शक्य आहे. या गुल्मांत व पित्तज गुल्मांत लक्षणसामान्य बरेंचसें आहे. त्यामुळें ज्वर येणें, तहान लागणें, अंगावर तांबडीं चकंदळीं उठणें, पोट दुखणें, अंगाचा दाह, घशाशीं जळजळ, करपट ढेंकर येणें, आंबट आंबट वांत्या होणें, आंगास घाम सुटणें, त्या घामास एक प्रकारची घाण, असलीं लक्षणें गर्भधारणेंत असूं शकत नाहींत. हीं लक्षणें असतां रक्तगुल्म आहे असें समजून गुल्मकुठाराची योजना करावी. रक्तगुल्माची चिकित्सा दहा महिने पुरे लोटल्यानंतर करावी असें यासंबंधीं लिहिलेलें सांपडतें. त्याचप्रमाणें सुखसाध्यत्व, रक्तगुल्म जितका जुना तितकें जास्त असेहि उल्लेख सांपडतात. (रक्तगुल्मे पुराणत्वं सुखसाध्यस्य लक्षणम्— चरकाचार्य) परंतु या दोन्ही सूचना विशेष सावधगिरीच्या आहेत. कांहीं कांहीं वेळां रक्त-गुल्माची स्वच्छ खात्री झाल्यानंतर चिकित्सेस तावडतोब प्रारंभ केला असतां रक्त-गुल्माची पुढें होणारी वाढ खुंटते आणि चिकित्सापंथ सुकर होतो. परंतु निदानाची खात्री जेथें झाली नाहीं तेथें मात्र आचार्यांच्या सूचनेचा जरूर अवलंब करावा.

कित्येक वेळां रक्तगुल्म व गर्भ हीं एकत्र असलेलीं आढळतात. गर्भाशयांत गर्भ वाढत असतो व अंडकोषांत रक्तगुल्म असतो; अशा स्थितींत रक्तगुल्म जास्त वाढल्यास गर्भाशयास त्याचा व्यत्यय येऊन गर्भवृद्धीस अडचण येते. रक्तगुल्म जास्त वाढूं न देण्याचें महत्त्वाचें काम गर्भास कोणत्याहि प्रकारें त्रास न होतां गुल्मकुठार रसानें फार चांगल्या प्रकारें घडून येतें. याचबरोबर उशीरासव, सारिवा-सव, अशासारखें सौम्य व पित्तशामक औषध योजावें.

गुल्मरोगांत किंवा इतरत्र पित्तजन्य विदग्धाजीर्ण वारंवार होण्याची संवय अस-लेल्या रोग्यास गुल्मकुठाररस द्यावा.

पित्तज आम्लपित्तांत घशाशीं जळजळ, आंबट ढेंकर, पोटांत दाह व त्याबरोबर फुगारा, अशीं लक्षणें असून ढेंकर पुष्कळ येणें, शौचास साफ न होणें, पोट भरल्यासारखें वाटणें, आंतड्यांमध्यें गुरगुर होणें, वारंवार आम्लपित्त होण्याची संवय जडणें व दवसानुदिवस बलहानि होत आहे कीं काय असें वाटणें, हीं लक्षणें असतां गुल्म कुठार

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

रसाची योजना करावी. या अवस्थेंत आल्याचा रस व मध यांच्याबरोबर किंवा जवखार व सज्जीखार यांचें फार अल्प प्रमाण घेऊन त्याबरोबर या रसाची योजना करावी.

पित्तज परिणामशूल, यामुळें हृत्संनिध भाग, बरगडचा व पोट यांमध्यें अन्नाचें पचन होत असतांना वारंवार कळा निघणें, पोट फुगणें, हीं लक्षणें असतां गुल्मकुठार रसाची योजना करावी.

या रसाचा विशेषेंकरून जुनाट रोगांत व क्षीण रोग्यांत उपयोग करावा.

यांतील नागभस्म—बलदायक व रक्तप्रसारक; वंग—गर्भाशयास बल देऊन तेथें संचित झालेल्या रक्तादि धातूंचें प्रसादन करून त्यांचें अनुलोमन करणारें; अभ्रक—सर्वधातुपरिपोषणक्रम व्यवस्थित करविणारें, रसायन व योगवाही; कांतलोह—शक्तिवर्धक, रक्तप्रसारक व धातूंचें नियमन करणारें; ताम्रभस्म—क्षरण करविणारें, अर्थात् वाढलेले घटक झरवून नाहींसे करून इंद्रियांवर होणारी वाढ नाहींशी करणारें, तीक्ष्ण, व्यवायी व विकाशी; झामराचा रस—पाचक, दीपक व सूक्ष्मस्रोतोगामी अशीं आहेत.

३४. ग्रहणीकपाट

* पारा, गंधक, अतिविष, हिरडा, अभ्रकभस्म, यवखार, सज्जीखार, बांगडखार, मोचरस, वेखंड व काळी टाकळ यांचा झांबराच्या रसांत एकत्र खल करावा आणि अर्ध गुंज प्रमाणाच्या बारीक बारीक गोळ्या कराव्या.

प्रमाणः—अर्धा ते दीड गुंज.

ग्रंथोक्त गुणधर्मः—

तस्याष्टवल्लान्मधुना प्रभाते शम्बूकभस्माज्यमधूनि लिह्यात् ।
सक्षीरिणीजीरकमाणिमंथतीक्ष्णानि चादौ दधिभोजनं च ॥ यो. र. ॥

ग्रहणीकपाटाचे एकंदर वाङ्मयांत सत्तावीस पाठ सांपडतात. त्यांपैकीं येथें दिलेला पाठ जास्त फलदायी असा आहे. संग्रहणीच्या विकारांत तीव्र व जुनाट असे दोन प्रकारचे भेद स्पष्ट आहेत. जुनाट संग्रहणीच्या विकारांत पर्पटीकल्पांचा उपयोग होतो व नवीन संग्रहणीच्या विकारांत कज्जली कल्पांचा उपयोग होतो.

---

* रसेंद्रगन्धातिविषाभयाभ्रं क्षारत्रयं मोचरसो वचा च ॥
जया च जम्बीररसेन पिष्टं पिण्डीकृतं स्याद् ग्रहणीकपाटः ॥
॥ यो. र. ॥

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

कज्जलीकल्पांत केवल कज्जली कल्प, दरदकज्जली, संयुक्तकल्प व दरदकल्प असे दोन भेद संग्रहणींत उपयोगी पडणाऱ्या औषधांचे दिसतात. केवल कज्जली कल्पाचा उपयोग केवळ ग्रहणीस्थित दोष असतां, दरदकज्जलीकल्प यांचा उपयोग ग्रहणी व आमाशय ही स्थानदुष्टी असतां आणि दरदकज्जलीकल्प आमाशयप्रधान दोषदुष्टी असतां द्यावेत. अशा प्रकारची यांची संगति लागते.

ग्रहणीकपाट हें औषध विशेषेंकरून लहान मुलांना जास्त मानवतें. मोठ्या माणसांतहि याचा उपयोग होतोच. विशेषेंकरून, होणाऱ्या जुलावांचा रंग पांढरा, भस्रट, अपक्व, अन्नयुक्त, त्यांत पांढरी, घट्ट व बुळबुळीत अशी आंव मिश्र असलेली, किंचित् रसयुक्त, शौचाच्या वेळा कमी परंतु प्रत्येक वेळीं शौचास बरेंच होऊन शौचास होतांना त्रास म्हणजे कुंथ वगैरे बेताची, किंबहुना न कळतां शौचास होणें, किंवा शौचास लागली रे लागली कीं, असेल त्या परिस्थितींत असेल तेथें शौचास होणें, त्याबरोबरच वांति, त्यांतहि अपक्व, खवट, मोडशी युक्त असें खाल्लेलें अन्न पडणें, हीं लक्षणें असतां व त्याबरोबर किंचित् ज्वर आणि तो ज्वर शौचास जास्त झाल्यामुळें आलेला असल्यास ग्रहणीकपाटाचा उपयोग करावा.

मोठ्या माणसांच्या मनोव्याघात किंवा शोक यांच्यापासून उत्पन्न होणाऱ्या अतिसार व संग्रहणी या विकारांत ग्रहणीकपाटाचा बराचसा उपयोग होतो. शोकोत्पन्न व मनोव्याघातजन्य असल्या प्रकारचे विकार दुश्चिकित्स्य खरे. या विकारांत विशेषेंकरून मनोदेश जास्त प्रक्षुब्ध झालेला असतो. आणि त्यामुळें शरीरांत विकार उत्पन्न झालेला असतो. या विकारांनीं पीडित अशा माणसांस कोठेंच चैन पडत नाहीं. एकच एक विषय मनामध्यें घोळत असल्यामुळें आणि त्याच त्या विषयाचा वारंवार घोष किंवा ध्यास घेतल्यामुळें इतर इंद्रियांचे व्यापार मंदावतात व वातप्रक्षोभ जास्त होतो. त्यामुळें पचनेंद्रियें व ग्रहणी बिघडतात. आणि त्यामुळें ग्रहणीचा आजार किंवा अतिसार उत्पन्न होतो. या विकारांत अभ्रकभस्मयुक्त पाचक व ग्रहणीप्रदीपक औषधांची जरूरी असते. हें कार्य ग्रहणीकपाटाच्या योगानें फार चांगलें होतें.

क्षयाच्या आजारांत उत्पन्न होणारा ग्रहणीरोगाचा उपद्रव फार भयंकर होय. त्या विकारांत ग्रहणी अगदीं शिथिल झाल्यामुळें व पचन व्यापार मंदावल्यामुळें पांढरट, भसरट, आंवयुक्त, व नकळत शौचास होत असल्यास त्या ठिकाणीं ग्रहणी-कपाटाचा उपयोग करावा.

कित्येक वेळां संग्रहणीचा विकार पुष्कळ दिवस टिकून त्यानंतर अथवा त्याबरो-बरच श्वासाचा उपद्रव होतो. असल्या प्रकारच्या श्वासांत ग्रहणीकपाटाचा उपयोग बऱ्यापैकीं होतो.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

ग्रहणीकपाटांतील कज्जली–जंतुघ्न, रसायनी व योगवाही; अतिविष–शक्तिवर्धक, यकृतांतील पित्ताचा स्राव करविणारें, पाचक, व ज्वरघ्न; अभ्रक—शक्तिवर्धक, रसायन, मनोदेशदुष्टिनाशक व क्षयांत उपयोगी पडणारें; तिन्ही क्षार—पाचक व यकृतोत्तेजक; मोचरस—उपलेपक, स्तंभक व संग्राही; भांग—संग्राही, दीपक व पाचक; आणि जंबीररस—पाचक व अग्निप्रदीपक असा आहे.

३५. ग्रहणीगजकेसरी

* पारा, गंधक, अभ्रक, हिंगूळ, लोहभस्म, जायफळ, बेलकाचरी, मोचरस, बचनाग, अतिविष, सुंठ, मिरें, पिंपळी, धायटीचीं फुलें, भांग, हिरडे, कवठांतील गर, नागरमोथे, चित्रक, ओंवा, कोंवळीं डाळिंबें, टांकणखाराची लाही, इंद्रजव, धोतऱ्याचें बीं आणि तालीमखाना हीं प्रत्येकीं समभाग घेऊन त्यांच्या चतुर्थांश अफू (कांहीं भाषांतरकारांनीं या पाठाचा अर्थ सर्वांच्या चौपट अफू घ्यावी असा केला आहे; परंतु अफूचें इतकें मोठें प्रमाण वृद्ध वैद्यांना अभिमत नाहीं आणि व्यवहारतःहि एवढें मोठें प्रमाण सहन होणें कठिण आहे आणि म्हणून आम्ही चतुर्थांश अफू घ्यावी असा अर्थ केला आहे.) घेऊन सर्वांचें एकत्र मिश्रण करून धोतऱ्याच्या पाल्याच्या रसांत याचा खल करावा. (धोतऱ्याच्या पाल्याचा रस काढल्याबरोबर खलांत घालूं नये. दोन तीन तास तसाच ठेवून त्यांतील गाळ खालीं बसला म्हणजे वर राहिलेला पातळ रस घालावा.)

प्रमाणः—अर्धी ते दीड गुंज.

ग्रंथोक्त गुणधर्मः—

दत्ता सा ग्रहणीगदं सरुधिरं सामं सशूलं चिरा– ।
तीसारं विनिहन्ति जूर्तिसहितां तीव्रां विषूचीमपि ॥

हा रस तीव्र विकारांत उपयोगी पडणारा आहे. संग्रहणीच्या विकारांत तीव्र वेदनायुक्त वारंवार पुष्कळ व फेंसाळ असें शौचास होतें, त्याबरोबर रक्त व आंव

---

* गन्धं पारदमभ्रकं च दरदं लोहं च जातीफलं ॥
बिल्वं मोचरसं विषं प्रतिविषां व्योषं तथा धातकीम् ॥
भङ्गामप्यभयां कपित्थजलदौ दीप्यानलौ दाडिमम् ॥
टङ्कादभस्म कलिङ्गकात्कनकजं बीजं च पक्षेक्षणम् ॥ १ ॥
(यक्षेक्षणम्)
एतत्तुर्यमफेनमेतदखिलं संमर्द्य संचूर्णयेत् ॥
धत्तूरच्छदजै रसैश्च मतिमान्कुर्यान्मरीचाकृतिम् ॥ यो. र. ॥
दुःसाध्यामपि बिबिसीं परिहरेदुक्तानुपानैरयं ।
नाम्ना तु ग्रहणीमतङ्गजमदध्वंसीभकण्ठीरवः ॥ यो. र. ॥

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

असते, पोटांत शूल बराच असतो. पोटांतील दर कळेबरोबर शौचास थोडें आंव-रक्तमिश्र व थोडें चोथापाणी असें होतें. वारंवार कळा येऊन येऊन पोट आटून आटून शौचास होतें. बरगड्या, पोट, मांड्या, जांघाडे व मान यांतून कळा किंवा पेटके निघाल्यासारखे होतात, सर्वांगास सुया टोंचल्याप्रमाणें वेदना होतात. हृत्संन्निध भागांत व आमाशयांत वारंवार दाबल्यासारख्या पीडा होतात, पक्वाशय व ग्रहणी या भागांत वारंवार आंतून कातरल्यासारखी पीडा होते, यत्किंचित् कांहींहि खाल्लें तर थोडें बरें वाटतें; परंतु खाल्लेलें पचल्याबरोबर पोट पुन्हां फुगतें, पोटांत वारंवार गोळे उठतात, रोगी अगदीं कृश, दीनदुबळा असा फार थोडक्या अवधींत होतो, सर्व प्रकारचें अन्न खाण्याची इच्छा खरी, परंतु कोणत्याहि अन्नाची चव नाहींशी होते, मनांत कोणत्याहि प्रकारची उभारी राहात नाहीं, यत्किंचित् पीडा जास्त झाल्याबरोबर धैर्य सुटून जातें, गळून गेल्यासारखा होतो, कित्येक वेळां तर मन अशा प्रकारें अगदीं हळु झाल्यामुळें रोगी बसला असेल तेथेंच त्यास पोटांत जोरांत कळ येऊन शौचास होतें व ती आवरण्याची ताकद राहात नाहीं. अशा प्रकारें ग्रहणीच्या वातप्रधान अवस्थेमध्यें या औषधाचा उपयोग उत्तम होतो.

यांतील धोतऱ्याचा मोठा धर्म म्हणजे ग्रहणींतून किंवा ग्रहणीच्या पिच्छिल-त्वचेंतून होणारा अब्धातूचा स्राव नियमित करणें हा होय. मोठमोठे जुलाब व त्याबरोबरच पिच्छिल अशा आमाचा स्राव, ते जुलाब अनिच्छेनें किंवा आवरतां न आल्यानें बसल्या जागींच होणें, कित्येक रोग्यांना तर जुलाब इतके लवकर लवकर आणि पुष्कळ होतात कीं, एका तासांतून कमींत कमी वीस ते पंचवीस वेळां शौचास झाल्याचीं उदाहरणें आहेत. अशा प्रकारच्या अत्यंत त्रासदायक विकारांत या औषधानें प्रथमतः शूल कमी होतो, नंतर अब्धातुस्राव कमी होतो व नंतर त्याच्या वेळा कमी होतात. निवळ अफूसारखें एकादें स्तंभक औषध दिलें गेल्यास त्याचा इतका इष्ट परिणाम घडून येत नाहीं.

तीव्र ग्रहणींत शूलाबरोबर रक्त पुष्कळ वेळां पडतें. हें रक्त पडत असतां वारंवार कळा निघतात, पोट दाबून धरावेंसें वाटतें, पोटांत गुडगुड शब्द होऊन गोळे उठल्या-सारखे होतात, रक्त पडणें किंवा शौचास होणें यांवर ताबा राहात नाहीं. ग्रहणी व पक्वाशय हीं अगदीं कापसाच्या पेळूसारखीं लुळलुळीत होऊन जातात. त्यांत अत्यंत शैथिल्य प्राप्त झालेलें असतें, कांहीं कांहीं रोग्यांत तर हें शैथिल्य इतकें परमावधीला गेलेलें असतें कीं, जरा कुंथल्याबरोबर त्यांचा दाब गुदमार्गावर पडून गुदकांडाचा आंतला भाग गुदावाटे बाहेर येतो, त्यासच आपण 'कुला पडला' असें म्हणतों. याबरोबर रक्तहि पडतेंच. कित्येकांस केवळ रक्त पडतें, तर कांहीं, रोग्यांस रक्तमिश्र असें पाणी पडतें, किंवा मांस धुतलेल्या पाण्यासारखे तांबडे, घाणकट, काळसर, निळसर, अरुण वर्णाचे व त्यावर तेल काढल्याप्रमाणें तवंग असलेले

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

असे वारंवार जुलाब होतात; रोगी अगदीं विकल होऊन गेलेला असतो. रोगाच्या भीषणतेची त्याला वाजवीपेक्षां जास्त जाणीव होऊन मनानें हैबत खाऊन पडलेला असतो. ह्या स्थितींत ग्रहणीगजकेसरी रसाचा योग्य अनुपानाबरोबर उपयोग केल्यास उत्तम फायदा होतो.

आमातिसार किंवा आमग्रहणी या विकारांत प्रथमतः लंघन द्यावें. कांहीं रोग्यांना उपवास बिलकूल सहन होत नाहीं, त्यांना शोधनरूप लंघन द्यावें. हें शोधन देतांना स्नेहविरेचन देणें आयुर्वेदास मान्य नाहीं. स्नेहविरेचनानें आम जरी पडून गेला तरी पण आमाचें पचन होत नाहीं आणि त्यामुळें आमोत्पत्ति कमी होत नाहीं, हा स्नेह-विरेचनांत मोठा दोष आहे. म्हणून या विकारांत दीपनीय, पाचनीय अशा औषधां-बरोबर विरेचन द्यावें. इंद्रजव, नागरमोथा, महाळुंग, अतिविष अशा औषधांबरोबर किंवा कुड्यांबरोबर, बाहव्याच्या मगजासारखें मृदु स्रंसन पहिल्यानें देऊन आमाचा अनुबंध शक्य तितका कमी होईल अशी तजवीज करावी. कोष्ठशूल अत्यंत तीव्र व त्या शूलाबरोबर प्रत्येक वेगाबरोबर बरीचशी आंव पडणें; शूल झाला, कळ आली कीं, त्याबरोबर विशेष आयास न होतां आंवेचा बराच स्राव होणें, तोंडास वारंवार पाणी सुटणें, अरुचि, मळमळ, कोणत्याहि अन्नाची मनापासून अनिच्छा, आंव बरीच पातळ, निवळ पाण्यासारखी, बुळबुळीत व वारंवार पुष्कळ होत असलेली, अशा प्रकारची असते. यांत रक्तांश असतोच असें नाहीं, असलाच तर फार थोडा. आंवेच्या अत्यंत स्रावामुळें व शूलामुळें रोगी थोडक्या अवकाशांत अत्यंत क्षीण होऊन त्यास कोठेंहि चैन पडेनासें होतें, भ्रमल्यासारखा होतो, काळजीखोर, चिडखोर व मनानें अगदीं दुबळा असा होतो. या अवस्थेंत ग्रहणीगजकेसरी रस फार चांगलें कार्य करतो.

ह्या सर्व संग्रहणीच्या विकारांचें पर्यवसान प्रवाहिकेंत होतें. किंवा प्रथमपासूनच प्रवाहिका उत्पन्न होते. हा विकार फार त्रासदायक असतो. या विकारांत मुख्यतः आंतड्यांचें शैथिल्य असतें आणि त्यांचें संग्राहकत्व व पचनशोषणादि धर्म क्षीण झालेले असतात. त्यामुळें सारखें शौचास होत राहातें. पाणी सांठविलेल्या एकाद्या हौदाचा किंवा रांजणाचा बोळा काढून टाकला असतां त्यांतून जशी सारखी बुळकुंडी लागते, त्याप्रमाणें ह्या आजारांत कोष्ठांतून सारखा हळुहळू बुळबुळ स्राव चाललेला असतो. कोष्ठांत कळ निघते. शूल उत्पन्न होतो, पोटांत दाह होतो, तहान फार लागते, पिच्छिल पाण्यासारखा असा जुलाब होतो आणि कित्येक वेळां पोटांत मोठ-मोठाल्या वेणा येऊन रोगी अगदीं आकळून जातो. परंतु शौचाच्या वेगावर बिलकूल ताबा असत नाहीं. किंवा शौचास लागतें म्हणून कुंथावेंहि लागत नाहीं. यत्किंचितहि आयास न पडतां किंवा कित्येक वेळां बिलकूल न उमगतां शौचास होत राहातें आणि त्यानें रोगी अत्यंत जर्जरित होतो. या विकारांत कित्येक वेळां पोटांतील औषधां-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

बरोबर पिच्छावस्तीचाहि उपयोग करावा लागतो. संग्रहणीच्या विकारांतहि पिच्छावस्तीचा उपयोग पुष्कळ होतो. प्रवाहिकेच्या या अवस्थेंत ग्रहणीगजकेसरीचा उपयोग करावा. अमसुलाच्या तेलाबरोबर किंवा लोणी पातळ करून त्याच्या विरघळीबरोबर या औषधाचा उपयोग करावा.

परिणामशलाच्या विकारांत वातदोषाची दुष्टी जास्त असतां शूल, विबंध, आध्मान हे विकार असून सतत अशी वांति त्यांत होत असल्यास व ती सशूल, पुष्कळ, वेडीवांकडी, खवट, तुरट, किंवा कडवट घाणेरडी अशी होत असल्यास, ग्रहणीगज-केसरीची योजना करावी.

मध्यम कोष्ठांत उत्पन्न होणारा शूल, विशेषेंकरून पक्वाशय व ग्रहणी यांच्या शैथिल्यामुळें व आंतील पिच्छिलत्व कमी झाल्यामुळें शूल उत्पन्न झालेला असल्यास, वातवाहिन्यांच्या क्षोभामुळें किंवा पक्वाशयांतील वातप्रक्षोभ झाल्यामुळें यकृत्-पित्ताचा स्राव सम्यक् न झाल्यामुळें शूल उत्पन्न झालेला असल्यास ग्रहणीगजकेसरी उत्तम कार्य करतो.

वर निर्दिष्ट केलेल्या निरनिराळ्या विकारांत रोगी फार क्षीण होतो, बलहीन होतो, मांस क्षीण होतें, मनानें दुबळा होतो व अशा परिस्थितींत त्यास आपलें जीवित अगदीं जड होतें. ग्रहणी, अतिसारादि विकार कमी झाल्यानंतरहि असल्या प्रकारची शरीर व मन यांची निर्बल स्थिति नाहींशी करून पुन्हां शरीर सम स्थितींत आणण्याचा धातुसाम्य प्रस्थापित करण्याचा, महत्त्वाचा धर्म ग्रहणीगजकेसरींत आहे. यांतील अभ्रकलोहादिकांचा उपयोग ह्या अवस्थेंत फार चांगल्या प्रकारचा होतो. या औषधांतील विशेष द्रव्यसंयोगाचा परिणाम पक्वाशय ग्रहणी वगैरे पचनेंद्रियें व शोषणेंद्रियें यांवर होऊन वर लिहिलेल्या प्रकारचें विशेष कार्य घडतें. हा कज्जली–दरदकल्प आमाशय व ग्रहणी या दोन्ही ठिकाणीं कार्य करतो.

यांतील कज्जली—जंतुनाशक, योगवाही व रसायन; दरद—जंतुघ्न, आमाशयस्थ दोषघ्न, विशेषतः आमाशयस्थ कफाचें नियमन करणारा; अभ्रक—बल्य, रसायन, सूक्ष्मस्रोतोगामी, मनोदोष नाहींसे करणारा व धातुसाम्य प्रस्थापित करणारा; लोह—स्तंभक, संग्राही, बल्य, रसायन, योगवाही आणि रक्तांतील निर्बलता नाहींशी करून रक्त सकस करणारें; जायफळ—वेदनाहर, स्तंभक व संग्राही; बेल—आमदोषघ्न, आमपाचक, आमसारक व उपलेपक; मोचरस—उपलेपक व स्तंभक; बचनाग—वेदनाशामक, व आंत्रस्थ स्रावांचें नियमन करणारा; अतिविष—यकृतास शक्ति देऊन यकृत्पित्ताचा स्राव वाढविणारें; सुंठ, मिरें, पिंपळी—दीपक, पाचक आणि अग्निसंस्थापक; धायटीचें फूल—स्तंभक, संग्राही व आंत्रस्थित द्रव्यांची नासण्याची क्रिया नाहींशी करणारें; भांग—उत्तेजक, पाचक, संग्राही व दीपक; हिरडा—रसायन व तुरट; कवठ—स्तंभक व तुरट; नागरमोथा—

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आमपाचक; ओंवा—पाचक, दीपक व कोष्ठांतील संज्ञावाहिन्यांचीं टोंकें बधिर करून शूल नाहींसा करणारा; चित्रक—शैथिल्यनाशक, तीव्र पाचक व वातप्रक्षोभ प्रशमन करणारा; डाळिंब—स्तंभक व संग्राही; टांकणखार—आक्षेपनाशक व जंतुघ्न; इंद्रजव—यकृत्पित्तविरेचक, आंतड्यांस शक्ति देणारें, आमपाचक व आंवेस कारणीभूत जे विशिष्ट जंतू ते नाहींसे करणारें; धोतऱ्याचें बीं—वातप्रक्षोभनाशक, वेदनाहर, व आंतड्यांतील स्राव कमी करविणारें; तालीमखाना—उपलेपक व बल्य; आणि अफू—तीव्र शामक, वेदनाहर, स्तंभक व आंतड्यांतील शिथिलता नाहींशी करणारी. ह्या सर्वांस धोतऱ्याच्या रसाच्या भावना दिल्यामुळें ग्रहणीगज-केसरी रस, वेदनोपशामक, स्तंभक, तीव्र संग्राही, आंतड्यांतील वाढलेल्या अब्धातूचें नियमन करणारा, बल्य व रसायन बनलेला आहे.

३६. ग्रहणी वज्रकपाट

*पाऱ्याचें भस्म, अभ्रकभस्म, गंधक, जवखार, टांकणखाराची लाही, वेखंड, काळ्या टांकळीच्या मुळांचें चूर्ण, हीं सर्व समभाग घेऊन काळ्या टाकळीच्या पानांचा रस, माक्याचा रस व झामराचा रस यांत प्रत्येकीं तीन तीन दिवस खलून नंतर तो गोळा सुकेपर्यंत वाळवावा. कढईमध्यें तो गोळा ठेवून त्यावर एक परळ पालथा घालून संधिलेप करावा आणि मंदाग्नीवर दोन तासपर्यंत पक्व करावा. स्वांगशीत झाल्यास जितका हा रस तितकेंच अतिविष व मोचरस यांचें चूर्ण मिश्र करून त्यास भांगेच्या रसाची भावना देऊन खडखडीत वाळल्यावर पुन्हां भावना द्यावी. अशा तऱ्हेनें सात भावना द्याव्या. यास ग्रहणीवज्रकपाट रस असें म्हणतात.

प्रमाणः—एक ते चार गुंजा.

या रसास ग्रंथांतून वज्रकपाट अशी संज्ञा आहे. ग्रहणीरोगचिकित्सेंत याचा अंतर्भाव केलेला असल्यामुळें यास ग्रहणीवज्रकपाट म्हणणें युक्त आहे. या रसाचे गुणपाठ ग्रंथांतून स्पष्ट दिलेले नाहींत.

ग्रहणीवज्रकपाटरस विशेषें करून आमवातजन्य, वातरक्तानंतर उत्पन्न झालेली ग्रहणी किंवा ग्रहणींत आमवात, वातरक्त, आमसंचय व आमाजीर्ण यांचा अनुबंध असतां उत्तम काम करणारें औषध आहे. हें ग्रहणीच्या ठिकाणीं असलेला शोथ नाहींसा करून आमपाचन करणारें औषध आहे.

---

* मृतसूताभ्रकं गन्धं यवक्षारं सटंकणम् ॥
वचा जया समं सर्वं जयन्तीभृंगजद्रवैः ॥
सजम्बीरस्त्र्यहं मर्द्यं शोषयेत्तं च गोलकम् ॥
मंदवन्हौ शनैः स्वेद्यं यामार्धं लोहपात्रके ॥
रससाम्ये प्रतिविषा देया मोचरसस्तथा ॥
भावयेद्विजयाद्रावैः शोष्यं पेष्यं च सप्तधा ॥
रसो वज्रकपाटोऽयं निष्कार्धं मधुना लिहेत् ॥ र. र. स. ॥

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पुष्कळ दिवसांचा आमवात, राहून राहून बरा होऊन पुनः पुन्हां उत्पन्न होणारा आमवात, या विकाराचा परिणाम हृदिंद्रिय, यकृत् व ग्रहणी या इंद्रियांवर नाना प्रकारांनीं घडतो. आमवातास कारण असलेले दोष कांहीं काल संधिस्थित होतात, तर कांहीं कालानें ते धातूंच्या ठिकाणीं लीन होऊन अंतरिंद्रियांत प्रवेश करून यकृतादि इंद्रियांत दुष्टि उत्पन्न करितात. अशा प्रकारें या इंद्रियांतून दुष्टि उत्पन्न झाली असतां त्या त्या इंद्रियांचे तत्तद्दुष्टिप्रधान रोग उत्पन्न होतात. असल्या रोगांत मूळ दोषदुष्टी व ती ज्या ज्या स्थानांत गेली असेल त्या त्या स्थानाची दुष्टी आणि ज्या दूष्यांशीं ते संयुक्त झाले असतील तो दोषदूष्यसंयोग या सर्वांचा साकल्यानें विचार करावा लागतो. ग्रहणी आमवातजन्य दोषानें दुष्ट झाली असतां ह्या औषधाचा उत्तम उपयोग होतो. केवळ कफानें ग्रहणींतील पिच्छात्वचा जाड होऊन अब्धातूंची वृद्धि झाल्यामुळें पुष्कळ दिवस टिकणाऱ्या संग्रहणीच्या विकारांत घोडाचोळीसारख्या कफघ्न सारक औषधांचा उपयोग होतो हें घोडाचोळी प्रकरणांत स्पष्ट दिलें आहे.

या अवस्थेंत रोग्याचे सांधे बरेच दिवसांपूर्वी सुजलेले असतात. सांध्यांची सूज कमी होऊन नंतर कोष्ठविकृतीचीं लक्षणें थोडीं थोडीं होत राहातात. पोट फुगणें, पोटांत बारीक बारीक टोंचल्यासारखी पीडा होणें, अन्नाचें पचन नीट न होणें, विशेषतः द्विदल धान्यें, मांसयुक्त अन्न यांचें पचन बरोबर न होऊन हीं खाल्लीं असतां सर्वच लक्षणें जास्त होणें, पोटांत गुबारा जास्त धरणें, सर्व आंतडीं व ग्रहणी यांत एक प्रकारचा जडपणा, दुखरेपणा, पोटास कांहीं तरी चिकटलें आहे असें वाटणें, वारंवार शौचाची शंका व शौचास जाऊन आलें तरी पोट साफ न वाटतां पुन्हां शौचास जावेंसें वाटणें, वारंवार मुरडा, परंतु तो जास्त जोराचा नसणें, फार कुंथ नसणें, व प्रत्येक वेगाबरोबर आमयुक्त फेंसकट असें शौचास होत राहणें, यकृत्संन्निधभागांत किंचित् दुखणें, यकृताची थोडीशी वृद्धि, जडपणा, अरुचि, अग्निमांद्य, हे विकार पुष्कळ दिवस टिकून असणें, ग्रहणीच्या विकारांत दिसणारीं हीं लक्षणें कमी झालीं असतां पुन्हां थोडे फार सांधे दुखूं लागणें, अशा प्रकारें हा चक्रनेमिक्रम चाललेला असतो. असल्या प्रकारच्या ग्रहणीच्या विकारांत ग्रहणीवज्रकपाट हें औषध उत्तम कार्य करणारें आहे.

केवळ बुद्धीचें काम करीत बसणाऱ्या माणसास, मनोव्याघात झाल्यामुळें किंवा शोकादिकासारखे आत्यंतिक मनःस्वास्थ्यनाशक प्रसंग उत्पन्न झाल्यामुळें मन अस्वस्थ होतें, मनाच्या अस्वस्थतेचा परिणाम वातवाहिन्यांच्या केंद्रावर होतो आणि त्यांचा परिणाम वातवाहिन्यांच्या विद्यमानें सर्व अवयवसमूहांच्या व्यापारावर घडून अवयवांचे व्यापार विकृत होतात. असाच परिणाम पचनव्यापार करणाऱ्या अवयव समूहावर घडून ते अवयव व तत्सम धातू विकृत होतात. अशा प्रकारें वायूचें प्रेरकत्व कमी झाल्यामुळें व पचनेंद्रियें विकृत झाल्यामुळें अन्नरसोत्पत्ति विकृत होऊं लागते;

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आणि अशा पद्धतीनें ग्रहणींत दोषसंचय होऊं लागतो. ह्या सर्व दोषदूष्यसंयोगास कारण मानसिक विकृति असल्यामुळें ती मुख्यत: या रोगांत चिकित्सावी लागते. ही ग्रहणी कांहीं कालपर्यंत टिकून उपचार केले असतां किंवा उपचार न करतांहि बंद होते. ग्रहणी बंद झाल्यानंतर सांधे दुखूं लागतात, छाती दुखूं लागते व हें बंद झाल्यावर ग्रहणी सुरू होते. पोटांत दुखणें, वारंवार भोंवळ येणें, मोह उत्पन्न होणें, शौचास फेनयुक्त चिकट व घाणेरडें होणें; शौचाच्या वेळा फार नसून दिवसांतून दोन किंवा चारच वेळां मंद वेदना होऊन शौचास होणें, अग्निमांद्य, कोणत्याहि एका पदार्थाबद्दल फारशी वांछा नसणें,आज एक पदार्थ आवडला तर उद्यां त्याची अनिच्छा उत्पन्न होणें, त्याबरोबरच कोष्ठांत एक प्रकारचा शूल उत्पन्न होणें, तो शूल फारसा तीव्र नसून मंद असणें, पण मंद असला तरी असह्य होणें. असल्या स्थितींत इतर औषधांपेक्षां ग्रहणीवज्रकपाट या औषधाचा उपयोग जास्त होतो.

ग्रहणीच्या विकारानंतर उत्पन्न होणारा यकृत्विद्रधि ह्या विकारास मूळ कारण आमदोषज ग्रहणीविकार हें असून ग्रहणी सुरू असतां किंवा ग्रहणी बंद होऊन नंतर हा विकार उत्पन्न झालेला असल्यास व फार दिवसांचा जुनाट नसल्यास ग्रहणी-वज्रकपाट हें औषध उपयोगी पडतें. विद्रधि फार मोठा नसावा. पुष्कळ नसावेत, व त्यांचा जोर जास्त नसावा. यकृत्विद्रधी या विकारांत त्वचेला फिकट पिवळेपणा आलेला असतो. त्वचा टापसल्यासारखी होते, नखें पिवळट, फिकट व फुगल्यासारखीं दिसतात. वारंवार मोठी थंडी वाजून बराच ज्वर येतो. हा ज्वर पुष्कळ दिवस येत असतो. मध्यंतरीं ज्वर बिलकुल थांबल्यासारखा होऊन पुनश्च ज्वर सपाटून थंडी वाजून येतो. जीभ कोरडी तिच्या आंतील भागावर काळे डाग, पांढरी किंवा पिवळट अशी बुरशी येते, वारंवार कोरड, अंगाचा दाह, हीं लक्षणें असून यकृताच्या भागांत मंद वेदना व एकच भाग थोडा उचलून आल्यासारखा झालेला असल्यास त्या ठिकाणीं वज्र कपाटाचा उपयोग करावा. इंद्रजव, कुटकी किंवा कुडा, यांच्या काढ्याच्या अनुपानांबरोबर या रसाचा उपयोग विशेष होतो.

ग्रहणी वज्रकपाटांतील कज्जली–जंतुघ्न ग्रहणी दोषनाशक, योगवाही व रसायन; अभ्र क–मनोदोषनाशक, धातुपरिपोषणक्रम व्यवस्थित करणारें, योगवाही व रसायन; यवक्षार व टंकण–आमपाचक व दोषसंघातभेदक; वचा–(वेखंड) –आक्षेपकघ्न, मनोदोषनाशक व आमशूलघ्न; टाकळीचें मूळ–आमाचें पचन करणारें, आमवातनाशक व आमशूलघ्न; भृंगराज(माका)–वातघ्न, ग्रहणी दोषनाशक-आमशूलघ्न व रसायन; झावराचा रस–पाचक व अग्निप्रदीपक; अतिविष–यकृत्, त्पित्तस्रावक, यकृच्छक्तिवर्धक व विद्रधिनाशक, मोचरस–स्तंभक व प्रसादक; विजया–पाचक उत्तेजक व अग्निप्रदीपक; अशीं आहेत.

घोडाचोळी अश्वकंचुकी पहा.

पुस्तकालय गुरुकुल कांगड़ी

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri.

भिषग्विलास पुस्तकमाला.

लेखकः—वै. पं. गंगाधरशास्त्री गुणे

	भाग	किंमत
औषधी गुणधर्मशास्त्र	१	१॥ रु.
,,	२	१॥ ,,
,,	३	१॥ ,,
,,	४	१ ,,
दंडकज्वर अथवा डेंग्यु फीवर		८≡ ,,
वातकफप्रधान ज्वर अथवा इन्फ्ल्युएन्झा		१ ,,
सहस्त्रार व नाडीचक्रें		।= आ.

पुस्तकें मिळण्याचें ठिकाणः—

भिषग्विलास कचेरी, अहमदनगर.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar